मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

# निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.**

**सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.**

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ

# युगवाणी

दीपावली विशेषांक १९५६



विदर्भ साहित्य मंदिर रंगमंदिराच्या कोनशिलान्यासाच्या वेळीं
श्री. चिंतामणराव देशमुख कोनशिलेचें पूजन करीत असतांना

नोव्हेंबर १९५६

किंमत ८ आणे





अनुक्रमणिका

# *अनुक्रमणिका*

# विदर्भ साहित्य संमेलनाचें १९ वें अधिवेशन

## आमगांव, जि. भंडारा येथे

## येत्या डिसेंबर १९५६ मध्ये भरणार

गतवर्षी तुमसर येथे गोंदिया शाखेने दिलेल्या निमंत्रणानुसार विदर्भ साहित्य संमेलनाचें १९ वें अधिवेशन, भंडारा जिल्ह्यांतील भवभूतीच्या पद्मपूरजवळ, आमगाव येथे येत्या डिसेंबर मध्ये भरणार असून पूर्वतयारी तेथील कार्यकर्ते अत्यंत उत्साहाने करीत आहेत.

वि. सा. संघाचें मुखपत्र

# युगवाणी

संपादक :

पां. कृ. सावळापूरकर

संपादक मंडळ :

कृ. व्यं. पेशकार
मा. ल. व्यवहारे
व. कृ. वऱ्हाडपांडे
प्र. दे. कोलते
रा. ना. घाटोळे
भा. श्री. परांजपे
तु. ना. काटकर

वर्ष ११ वें    अंक ८ वा

नोव्हेंबर १९५६

## संपादकीय

### शुभचिंतन

'सर्वेऽपि सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः सर्वे भद्राणि पश्यन्तु माकश्चिद् दुःखभाग् भवेत्' याच सर्वप्रसिद्ध कव्युक्तीने 'युगवाणी' दीपावलीच्या निमित्ताने, सर्वांचें शुभचिंतन करीत आहे. दीपावलि व राज्याच्या सीमांची नवीन रचना या दोन्हींचा प्रारंभ बरोबरच होत आहे. तेव्हा दीपावलीचा प्रकाश, या नवीन अवस्थेंतहि, खऱ्या अर्थाने सर्वांस मार्गदर्शक होवो हीच परमेश्वरास प्रार्थना.

### रंगमंच

विदर्भ साहित्य मंदिराच्या संकल्पित रंगमंचाचा कोनशिलान्यास समारंभ श्री. चिंतामणरावजी देशमुख या ख्यातनाम कर्त्या विद्वानाच्या हातून गेल्या दि. १८ आक्टोबर रोजीं पार पडला. ही घटना विदर्भ साहित्य संघाच्या इतिहासांत चिरस्मरणीय ठरण्यासारखी आहे. या रंगमंचाची संपूर्ण कल्पना याच अंकांत त्यासंबंधी प्रसिद्ध होत असलेल्या श्री. नाना जोग यांच्या भाषणांत संपूर्ण येऊन गेली आहे. सर्व रसिक व कलाप्रेमी सज्जनांच्या सहाय्याने हें कार्य तडीस जाईल यांत आम्हाला शंका वाटत नाही.

### मध्यप्रदेश संशोधन मंडळ

सध्या विदर्भ साहित्य संघाच्या इमारतींतच आपलें संशोधनकार्य करीत असलेल्या मध्यप्रदेश संशोधन मंडळ या जुन्या संस्थेला यंदा थोडेसें सरकारी अनुदान मिळालें असून संस्था म. म. मिराशी यांचा 'संशोधन मुक्तावलि भाग २' व कै. डॉ. दफ्तरी यांचा 'जीवनसौख्य अर्थात् उपनिषदांचा वस्तुनिष्ठ व बुद्धिप्रत्ययक अर्थ (उपसंहार),' हे महत्त्वाचे ग्रंथ प्रकाशित करणार आहे हीहि गोष्ट आम्हांला फार उल्लेखनीय वाटते. फार उशिरा कां होईना पण राज्यसरकाराने या उपेक्षित विद्वत्संस्थेचा परामर्श घेऊन आपलें शासन हें विद्याभिलाषीहि आहे हें सिद्ध केलें ही संतोषाची गोष्ट आहे.

अनुक्रमणिका

## ललित साहित्य विशेषांक

उभयविध रसिकतेचें संतर्पण करील असें प्रभूत ललित साहित्य प्रसिद्ध करणारीं मराठी नियत-कालिकें सर्वत्र असतांना वि. सा. संघासारख्या प्रातिनिधिक संस्थेने 'युगवाणी' द्वारा आपलाहि तसाच एक फड उभा करावा हा संघशक्तीचा अपव्यय आहे अशी युगवाणीच्या संपादकाची धारणा असल्यामुळे 'युगवाणीं'त शक्य तों विवेचक स्वरू-पाचेच लेख प्रसिद्ध करावे असें त्याचें धोरण आहे. शिवाय रंजनाच्या सहायावाचून थोडेसेहि गंभीर विचार पचूंच नयेत इतकी ज्यांची पचनशक्ति नाजूक आहे असे वाचक 'युगवाणी'च्या परिसरांत असण्याचें प्रयोजनहि त्याला दिसत नाही. तथापि साहित्याच्या व्यापक कुटुंबामध्ये ललित विभागाचाहि समावेश होतो याची जाणीव असल्यामुळे क्वचित् एखादा अंक त्या साहित्याला द्यावयास हरकत नाही असें संपादकमंडळाने ठरविलें आहे. पृष्ठसंख्येच्या दृष्टीने नसला तरी विशिष्ट वाङ्मयप्रकारामुळे होणारा असा ललित साहित्य विशेषांक येत्या कांही महिन्यांत काढण्यांत येईल व त्यांत कथा–कविता–एकांकिका नाट्यछटा इ. प्रसिद्ध करण्यांत येतील. या अंकाचें संपादन प्रा. मा. ल. व्यवहारे यांनी करण्याचें मान्य केलें आहे. तरी प्रसिद्ध व अप्रसिद्ध सर्व लेखकांनी आपलें उत्कृष्ट ललित साहित्य या अंकासाठी त्वरित प्रा. मा. ल. व्यवहारे, खापर्डे बगीचा, अमरावती यांच्याकडे परस्पर पाठवावें.

---

## विदर्भ साहित्य संघ—सहकारी नाट्योत्सव समिति

### प्रकट विनंती

विदर्भ साहित्य संघ-नाट्यसमितीने येत्या डिसेंबर ५६ च्या ९ ते १९ तारखेपर्यंत नागपुरांत नाट्योत्सव करण्याचें निश्चित केलें आहे हें सर्वांना विदित आहेच.

या नाट्योत्सवाच्या उद्‌घाटनासाठी केंद्रीय आकाशवाणी आणि वार्तामंत्री डॉ. बाळकृष्ण केसकर यांस विनंती करण्यांत आली असून नाट्योत्सवाचे अध्यक्ष म्हणून नटवर्य केशवराव दाते यांना निमंत्रण देण्यांत आलें आहे.

या नाट्योत्सवाचा उद्देश समाजांत अभिजात नाट्याभिरुचि निर्माण करण्याचा जसा आहे तसाच विदर्भ साहित्य संघाच्या रंगमंदिराच्या कामासाठी निधि मिळवून व आधुनिक साधनांनी सज्ज असें रंगमंदिर नागपूरला होऊन तें काम पूर्णतेला जावें हाहि आहेच. हें रंगमंदिर सार्वभाषिक नाट्यविषयक व सांस्कृतिक कार्यांचें केन्द्रस्थान होईल असा आमचा विश्वास आहे. या कामासाठी अंदाजें तीन लक्ष रुपये तरी खर्च येईल. या रंगमंदिरांत निदान एक हजार प्रेक्षकांची सोय होऊं शकेल.

आम्ही तयार केलेल्या कार्यक्रमानुसार या नाट्योत्सवांत पांच प्रयोग सादर करण्यांत येतील.

१. **"होनाजी बाळा"**— यासाठी मुंबईतील मुंबई मराठी साहित्य संघाच्या नाट्यसंघाला आम्ही निमंत्रित केलें आहे.

२. " **मानापमान** "—यशवंत कलाकेंद्र, नागपूर.

३. " **माऊबंदकी** "--नागपूर नाटय मंडळ, नागपूर.

४. " **राणीचा बाग** "—अभिनव नाटयमंदिर नटसंच, नागपूर.

५. **विश्वविद्यालयीन** (नागपूर येथील) **नाट्यस्पर्धेत सर्वोत्कृष्ट ठरेल तो प्रयोग.**

[ या स्पर्धेसाठी श्री. मनोहरपंत खोल्कुटे यांनी त्यांचे वडील श्री. बाबासाहेब खोल्कुटे यांच्या षष्टयब्दिपूर्तीनिमित्त एक फिरती ढाल विदर्भ साहित्य संघाला दिली आहे.]

या सर्व नाटयप्रयोगांसाठी सीझन व प्रत्येक प्रयोगासाठी वेगळ्या अशा प्रवेश पत्रिकांची योजना केली असून लवकरच नाटयोत्सवाचे कार्यकर्ते नागपुरस्थ नाटय-रसिकांकडे तीं तिकीटें घेऊन येतील. सीझन तिकिटें, रु. १००, ५०, २५, १० व ५ चीं असून वर सांगितल्याप्रमाणे प्रत्येक प्रयोगाकरितां तेथली अशींहि तिकीटें ठेवण्यांत आलीं आहेत. शंभर रुपयांच्या वर देणगी देणाऱ्यांसाठी बसण्याची खास व्यवस्था केली जाईल.

हा नाटयोत्सव संघटित करण्यासाठी, विदर्भ साहित्य संघ नाटय समितीने, नागपुरांतील नाटयरसिकांच्या मदतीने सहकारी नाटयोत्सव समिति निर्माण केली असून रंगमंदिराच्या पूर्ती· साठी जनतेच्या साहाय्याने शक्य तितका अधिक निधि मिळविण्याचा या समितीने संकल्प केला आहे. हें कार्य आपल्या सर्वांचें आहे आणि आपल्या सर्वांच्या उदार सक्रिय साहाय्याने समितीचा संकल्प सिद्धीस जाईल असा आमचा दृढ विश्वास आहे.

नाटयोत्सवासंबंधी माहिती व गरजा यापुढे वेळोवेळीं आम्ही आपल्याला सादर करूंच.

आपले नम्र,

| | |
|---|---|
| **एस. जी. अण्णेगिरी** | **पुरुषोत्तम दिवाकर ढवळे,** |
| अध्यक्ष, | अध्यक्ष, |
| सहकारी नाटयोत्सव समिति. | विदर्भ साहित्य संघ. |

**ल. श्री. उर्फ बाबुराव देशमुख, सौ. सुशीलाबाई वैरामजी, सौ. सुमति धनवटे, डी. पी. आर. कासद, वा. रा. पुराणिक, ना. खं. तिरपुडे, वा. वा. भोळे**—उपाध्यक्ष.

| | | |
|---|---|---|
| **पां. वा. गडकरी,** | **द. रा. गोमकाळे,** | **मनोहर खोलकुटे,** |
| कोषाध्यक्ष. | सरचिटणीस. | संयुक्त चिटणीस. |

**सौ. अनसूयाबाई वाडेगावकर, डॉ. सौ. श्यामलाबाई चितळे,**
**सौ. कुसुम मोहनी, बापूसाहेब चोरघडे, केशव केळकर,**
सहचिटणीस.

विदर्भ साहित्य संघ, नागपूर.
ता. २१-१०-५६.

# बहिरा जातवेद व 'बहिरवी' टीका

प्रा. श्री. मा. कुलकर्णी

## ( उत्तरार्ध )

बहिरवी टीकेच्या आधारें कवि बहिरा जातवेद याच्या चरित्रासंबंधी थोडीशी माहिती मागील लेखांत दिली आहे. या लेखांत 'बहिरवी' टीकेचा थोडासा परिचय करून द्यावयाचा आहे.

प्रथम बहिरंगासंबंधी थोडेसें सांगावयाचें. यांत पोथीची, रुंदी, कागद–शाई, अक्षर इ. संबंधी सांगायला पाहिजे. वस्तुतः या गोष्टींना असलेंच तर फार थोडें महत्त्व आहे. स्वतः कवीच्या हस्ताक्षरांतील पोथी नसल्यामुळे तर या गोष्टींचें महत्त्व आणखी कमी होतें. पण संशोधकांच्या कुतूहलपूर्तिसाठी थोडक्यांत ही माहिती देऊन मी अंतरंगाकडे वळतों. पोथीच्या सर्व पानांची लांबीरुंदी सारखीच नाही. लांबी ९। इंचापासून तों १०।। इंचापर्यंत व रुंदी ५। इंचांपासून तों ६ इंचांपर्यंत आहे. याचें कारण संपूर्ण पोथी एकाच लेखकाने लिहिलेली नाही. कमींत कमी चार लेखकांनी ती लिहिली आहे. सामान्यतः पूर्वार्ध–म्हणजे ४९ अध्याय–दोघांनी व उत्तरार्ध दोघांनी लिहिलेला आहे. पूर्वार्धाच्या शेवटीं—

> **ग्रंथ लीखीतं हस्ताक्षर केशव गोपाळ सिंदखेडकर**
> **आध्ये चवतीसा पासुन येकुणवनास पंरियेत ।।**

असें लिहिलें आहे. ३४ पासून ४९ पर्यंतचे अध्याय लिहिणाऱ्या या केशव गोपाळ सिंदखेडकराचें शुद्धलेखन (?) या वाक्यावरून लक्षांत येईल. त्याचें अक्षरहि गचाळ आहे. यावरून संशोधकांनी एक गोष्ट ध्यानांत घेण्यासारखी आहे. जुनी पोथी छापतांना पोथींतील ऱ्हस्व–दीर्घादि लेखन जसेंच्या तसें ठेवण्याचा आग्रह व्यर्थ असून त्यावरून तत्कालीन भाषेंतील शब्दांचीं रूपें निश्चित करणें चुकीचें आहे, ही ती गोष्ट होय. असो. इतर तीन लेखकांपैकी एकाचें अक्षर सामान्य असून दोघांचें मात्र सुंदर आहे. त्यांचें लेखनहि पुष्कळच शुद्ध आहे.

पोथीचा कागदहि सर्व सारखा नाही. कांही थोडा पातळ व कांही बराच जाड असा आहे. जाड कागद अत्यंत मजबूत आहे. शाई काळी भोर असून स्पष्ट आहे. कांही ठिकाणीं संस्कृत श्लोक लाल शाईंत लिहिलेले आहेत. पोथी २००–२५० वर्षांची जुनी असावी असें वाटतें. पोथींत कोठेहि लेखकांनी लेखन शक दिलेला नाही. असो.

गुरु, संत, भक्त यांच्या आज्ञेने व कृपेने कवि कृष्णचरित्राकडे वळला व ही टीका त्याने लिहिली असें तो वारंवार सांगतो.

> कैसें कपाळ उमटलें । कृष्ण दासि हातीं धरलें
> या घोरतयां चेवविलें । थापटोनि ।।४।।
> म्हणति कृष्ण कृष्ण म्हण। तंव बाणलें सावधानपण
> तेथ कृष्णचरित्र वदन । जातवेदाचें वदे ।।५।।
>
> —अ० ७८
>
> या श्रीगुरू चिंतामणीचा । प्रसाद पावलों वाग्देवीचा
> आज्ञापीलो श्रीकृष्णाचा । जेणे रसाळ बोलवीलें ।।८।।
>
> —अ० ७६

संत श्रोत्यांना अनुलक्षून कवि ठिकठिकाणीं अशाच अर्थाचे उद्गार काढतांना दिसतो. पूर्वार्धाच्या शेवटीं कवि म्हणतो—

> हें दशमाचें पूर्वार्ध । सिद्धी पावले जी तुम्ही सावध
> तुमचीये कृपा उत्तरार्ध । वरी अंतर्यामीं श्रीकृष्ण ।।

५१ व्या अध्यायाच्या आरंभींच्या या ओव्याहि पहा—

> तुम्ही नित्य सावधान । जनामध्यें महाजन
> जेंहि कृष्णकथेसी मन । ठेविलें असे ।।

ऐसिया तुम्हां प्रति । वोलगड माझी मती
प्रभु तुमचे कृपेचि संगती । हेंची खरे ।।
मी नेणें साहित्य संगीत । नीपट न् कळे संस्कृत
ऐसीया मज वोलवित । तुम्हां संतांची कृपा ।।

यावरून श्रीकृष्ण, गुरु चिंतामणी व संतश्रोते यांच्या अनुग्रहाने, आज्ञेने व कृपेने कवि ही टीका लिहिण्यास उद्युक्त झाला असें उघड होतें.

ग्रंथारंभींच्या नमनांत ब्रह्मकुमरीचें हें स्तवन व वंदन पहा—

आता नमो वो ब्रह्मकुमरी । तुज कोण्हाशि न् पवे सरी
ज्याचे मस्तकीं निर्द्धारी । ठेविशी अभय कर ।।७।।
तो जऱ्ही असेल मूका । नावें बहिरा रूपें नसे नेटका
त्या हातीं करूनि विवेका । वोलविशी ग्रंथरचना ।।८।।
ऊंदरामधील किटकुलें । त्याचेनि जरी जाय ब्रह्मांड वर्णिलें
तरी मज तूझें स्वरूप वहिलें । वर्णवेल माये ।।११।।
आयकोनी बहिरियाची वाणी । वोले सरस्वती संतोषोनी
म्हणे श्रीकृष्ण कथा कवीखाणी । वदें आपुलिये मुखें ।।१२।।
माझेंहि हेंचि मनोगत । जे वदेल दशम भागवत
जेण्हें भाविक प्राकृत उद्धरत । ते टीका वदे भैरवी ।।१३।।

यापुढे संतश्रोते, सद्‌गुरु चिंतामणी, शुकसनकादिक भगवद्‌भक्त इ० चें गौरवपर वर्णन कवीने केलें असून तें अनेक ठिकाणीं सुंदर साधलें आहे. हा पहिला भाग ९३ ओव्यांचा आहे.

कवीने आपली ही टीका सुप्रसिद्ध टीकाकार श्रीधराच्या टीकेच्या आधारें रचिली आहे.

आता कृपाळु तुम्ही श्रोते । चित्त द्यावें श्रीकृष्ण कथे
मी श्रीधराच्या मागातें । पाहोनि चाले ।।

प्रत्येक अध्यायाच्या प्रारंभीं त्या अध्यायांतील कथाभागाचा थोडक्यांत उल्लेख कवि करतो व तो श्रीधराचार्यांच्या टीकेंतील श्लोक उद्धृत करून, त्याच्या आधारानेच करतो. तथापि मूळ भागवत व श्रीधरी टीका दोहोंनाहि सोडून कवि अनेक ठिकाणीं स्वतः आपल्या प्रतिभेचा स्वतंत्र प्रपंचहि करतो. रुक्मिणीच्या विवाहाचा सोहळा कवीने फारच विस्ताराने वर्णिला आहे. त्या वर्णनाच्या आरंभीं कवि म्हणतो—

हे वैदर्भी विवी मार्गे । परणिली श्रीरंगें
शुक इतुकेचि वेगें । वोलोनि गेला ।।

आपण मात्र हा कथाभाग विस्ताराने सांगितला. शुकाने विस्तार केला नाही याचें कारण त्याला सर्व कांही सात दिवसांत सांगायचं होतं—

जातवेदु विनवि श्रोतयांते । श्लोकिं नाही या विस्तारातें
परी म्यां धरिलें येका पदातें । तें परिसीजे स्वामी ।।६६७।।

जें शुक श्लोकीं वोलिला । कृष्णु विजयी जाला
मग विध्युक्त मार्गें केला । वीवाहो रुक्मिणीसी ।।६६८

ते विधिमार्ग वोलतां । पसरली नावरे कथा
जो चरित्रा अनंता । स्वामी माझा ।।६६९।।
आणि अल्पायुष परीक्षीती । सातां दिसां होआवी मुक्ती
म्हणौनि शुक या युक्ति । चरित्रें सावें ।।६७०।।
—अ०५४

रुक्मिणी-स्वयंवरावरील तीन अध्यायांतील कथाभाग कवीने सुमारें अडीच हजार ओव्यांत वर्णिला आहे. यावरून कथेच्या विस्ताराची कल्पना येऊं शकेल. सर्वांत अधिक विस्तार विवाहसोहळ्याच्या वर्णनाचा आहे. नुसत्या रुक्मिणीस्वयंवराच्या कथाभागाचा परिचय करून द्यायचा म्हटलें तरी एक स्वतंत्र लेख लिहावा लागेल. फळाशेने जमलेल्या ब्राह्मणांचे वादविवाद, त्यांची दक्षिणाप्रियता व हावरेपणा, त्यांचा आपसांतील कलह, वऱ्हाडिणींचा साजशृंगार इ० अनेक विषयांचें वर्णन मोठें चटकदार झालें आहे. असो.

या कथाभागांतील एकदोन गोष्टी लक्षांत घेण्यासारख्या आहेत. मूळ भागवतांतील 'गृहागतैर्गीयमाना' —इत्यादि पदांच्या आधारें मराठी कवींनी भीमकाच्या सभेंत आलेल्यांविषयीं निरनिराळ्या कल्पना केलेल्या आहेत. नरेंद्राचा 'किन्नर', एकनाथांचा 'कीर्तिनामा ब्राह्मण' सामराजाचे 'बंदीजन' इ० सर्वांना माहीत आहेत. बहिरा जातवेदाने या प्रसंगीं नारदाला आणलें आहे हें लक्षांत घेण्यासारखें आहे. भीमकाच्या

घरीं लक्ष्मी अवतरली आहे हें ऐकून अनेक 'हरिदास' कौडण्यपुरास येत असत असें म्हणून पुढे कवि म्हणतो—

अगा परीक्षिती नृपवरा । रुक्मिणी जाली उपवरा
आणि कृष्णें द्वारकापुरा । रचिले सागरी ।।
द्वारके त्रैलोक्यराजा । कौडण्यपुरी भीमकात्मजा
हें स्मरलें ब्रह्मजा । मना माजी ।।
तो नारदु म्हणे चित्ती । वैदर्भीसी वरू श्रीपती
होईल तव निश्चिती । परी वाढेल कळि ।।
होईल भीमकी हरण । जेथें रणनोवरा नारायण
ते प्रयत्नें देखेंन । युद्धाचा आनंदु ।।

अशा विचाराने नारद भीमकाच्या सभेस आला व त्याने श्रीकृष्णाचें वर्णन केलें, असा भाग पुढे आला आहे. नरेंद्राची किन्नराची कल्पना चमत्कृतिपूर्ण असली तरी नारदाला आणण्यांत बहिऱ्याने अधिक मार्मिकता दाखविली आहे.

रुक्मिणीने लिखित पत्रिका पाठविली असा स्पष्ट उल्लेख भागवतांत नसतांना मराठी कवींनी मात्र लिखित, मुद्रामुद्रित अशी पत्रिका सुदेवाबरोवर दिली असें वर्णिलें आहे. नरेंद्राच्या रुक्मिणी स्वयंवरांत हा लिखित पत्रिकेचा उल्लेख पहिल्यांदा आला असल्यामुळे त्या कल्पनेचें जनकत्व प्रा. डोळक्यांनी त्याच्याकडे दिलें आहे ( म. सा. पत्रिका, एप्रिल–जून ५६ पहा). प्रा. डोळक्यांचें हें म्हणणें व त्यांतून सूचित होणारा, एकनाथादिकांनी ही कल्पना नरेंद्रापासून घेतली असा आशय वरोवर नसल्याचें पत्रिकेच्याच जुलै–सप्टेंबर, ५६ च्या अंकांत एका पत्राद्वारें श्री. य. ग. फफे यांनी दाखवून दिलें आहे. श्री. फफे यांच्या एका विधानाच्या बाबतींत थोडीशी दुरुस्ती करायला पाहिजे व ती प्रस्तुत 'बहिरवी' टीकेच्या आधारें करतां येण्यासारखी आहे. श्री. फफे यांनी आपल्या उपरोक्त पत्रांत—

रूक्मिण्या स्वयमेकान्ते लिखित्वा दत्तपत्रिकाम्
मुद्रामुन्मुच्य कृष्णाय प्रेमचिन्हमदर्शयत् ।।

हा श्लोक दिला असून तो श्रीधराचार्यांनी भागवताच्या एखाद्या प्रतींतून उद्धृत केलेला असावा असें म्हटलें आहे. एकनाथहि हा श्लोक भागवतांतीलच मानीत होते असेंहि त्यांनी म्हटलें आहे. पण तें बरोवर नसून हा श्लोक श्रीधराचार्यांचाच असून एकनाथकाळींहि तो तसाच मानला जात होता ही गोष्ट 'बहिरवी' टीकेच्या प्रस्तुत हस्तलिखित प्रतीवरून दिसून येण्यासारखी आहे. प्रस्तुत टीकेंत आधी भागवतांतील श्लोक देऊन त्यावरील कवीची टीका लिहिली आहे. मधून मधून श्रीधरी टीकेंतील श्लोकहि कवि देतो व तेहि लिहिलेले आहेत. अशा श्लोकांच्या आरंभीं '**श्लोक टीकाकाराचा**' असा स्पष्ट उल्लेख केलेला आढळतो. श्लोक भागवतांतील असेल तर मात्र नुसतेंच 'श्लो०' असें लिहिलेलें असतें. ५२ व्या अध्यायांत 'श्रुत्वा गुणान् भुवनसुंदर–इ० भागवतांतील श्लोकांच्या आरंभीं वरील 'रुक्मिण्या स्वयमेकान्ते' हा श्लोक लिहिला असून त्याच्या पूर्वी '**श्लोक टीकाकाराचा**' असा उल्लेख केला आहे. यावरून हा श्लोक श्रीधराचार्यांचाच होय असें सिद्ध होतें. असो. सर्वच मराठी कवींनी—नरेंद्राने सुद्धा लिखित पत्रिकेची कल्पना श्रीधरी टीकेवरून घेतली असावी असें यावरून म्हणतां येण्यासारखें आहे.

प्रस्तुत ग्रंथांतील कवीची गुरुभक्ति अनेक ठिकाणीं उत्कटत्वाने व्यक्त झाली आहे. हीं सर्व ठिकाणें वाचून ज्ञानेश्वरांची गुरुभक्ति वाचकांना आठवण्यासारखी आहे. ५० व्या अध्यायाच्या आरंभींच्या ह्या ओव्या पहा—

कैसें आश्चीर्य त्रिभुवनीं । लावलों गुरुकृपा जननी
कृष्ण स्मरण थान देऊनी । मज अज्ञानासी ।।१।।
तेणें सर्वांगें नीवाळीं । पूर्ण बोधाची ढुकली देखिली
मग शांतवी माउली । आनंद पालकि ।।२।।
ह्या बोधनिद्रे जागे सुते । देखीले मज बाळकातें
मग वैखरीया स्वसुखातें । हालरू गाये ।।३।।

गुरुकृपेवरील जननीचें हें रूपक ज्ञानेश्वरींतील १२ व्या अध्यायाच्या आरंभींच्या रूपकाची आठवण करून देणारें आहे.

आतापर्यंत पोथीचें बहिरंग व टीकेच्या अन्तरंगापैकी कवीचा टीकालेखनांतील हेतु, त्याच्या टीकेचा आधार, त्या आधाराला सोडून त्याने केलेला स्वतंत्र विस्तार, त्याचें रुक्मिणी–स्वयंवर, त्याची गुरुभक्ति

अनुक्रमणिका

९० विषयांचा त्रोटक परिचय करून दिला. यापुढे या टीकेंतील काव्याचा मासला दाखवून कवीच्या कवित्व-शक्तीचा परिचय करून द्यावयाचा आहे.

शब्दयोजनेंतील कवीचें कौशल्य व सामर्थ्य पुढील उताऱ्यावरून लक्षांत येण्यासारखें आहे. रुक्मिणी-हरणानंतर झालेल्या युद्धांत रुक्मीचा पराभव व त्याची फजिती झाल्यानंतर त्या एकंदर प्रकारामुळे खिन्न झालेल्या रुक्मिणीचें सांत्वन बळिराम करतो. त्याप्रसंगीं तिचा गौरवहि तो करतो. त्यांतील या ओव्या आहेत—

अवो कृष्णु चंद्र तूं कळा। कृष्ण हेम तूं अळंकारमेळा
कृष्ण रत्न तूं किळा। शोभसी माये ॥३४४॥
कृष्ण भानु तं प्रकाशु। कृष्ण गगन तूं अवकाशु।
कृष्ण वायु तूं स्पर्शु। नित्य पाही ॥३४५॥
कृष्ण कर्पुर तूं दृति। कृष्ण प्रतापु तूं कीर्ति
कृष्ण निर्गुण तूं मूर्ति। साकारपणें ॥३४६॥
कृष्ण जळ तूं द्रवत्व। कृष्ण अग्नि तूं उष्णत्व
कृष्ण पृथ्वी तूं परमाणुत्व। मीरविसी सुंदरी ॥३४७॥
कृष्ण अमृत तूं स्वादु। कृष्ण तंतु तूं पटु भेदु
कृष्ण तृप्तु तूं आनंदु। तृप्ताचा तया। ॥३४८॥
कृष्ण देह तूं अवेव। कृष्ण मन तूं स्वभाव।
कृष्ण ब्रह्म तूं माया सर्व। हे वैदर्भीये सत्य ॥३४९॥

—अ० ५४

श्रीकृष्णाचा जन्म, त्याच्या बाळपणाच्या लीला इ. भाग कवीने प्रसादपूर्ण रीतीने पण चटकदार वर्णिला आहे. 'कित्येक ठिकाणचीं वर्णनें स्वभावोक्तिपूर्ण व प्रत्ययोत्पादक उतरलीं आहेत. तान्ह्या श्रीकृष्णाला न्हाऊं घालण्याचें हें वर्णन पहा—

तुळी तुळी पाणि घालितां। जननी हात दे माथां
ते करचरण धूतां। गोळा करूनि ॥३७॥
ऐसा कृष्णु न्हाणिला। करोदकें वोवाळिला
दोन्हीं कानीं फुंकिला। जगन्नाथ ॥३८॥—अ० ७

सर्व गोपी जमून बाळकृष्णाला खेळवीत असत. त्याचें हें वर्णन पहा—

एकी ईडपीड घेती। एकी वदन चुंविती
एकी करें लिंग स्पर्शती। देती दाम ॥४२॥
एकी कृष्ण पाउलें दोन्ही। लाविती आपुला वदनी
एकी हृदयीं स्पर्शुनी। कुचावरी ॥४३॥
एकी चुंविती कृष्ण स्तन। तो खदखदा हास्यवदन
एकी उतरीती लोण। एकी नाभी चुंविती ॥४४॥

—अ० ७

स्त्रिया एकत्र येऊन बोलायला लागल्या म्हणजे त्यांच्या होणाऱ्या हालचाली वेचक असतात. त्यांचें मोठें सूक्ष्म व मार्मिक वर्णन कवीने केलें आहे. कृष्ण-जन्माच्या पूर्वी देवकीच्या बाळांचा कंसाने वध केल्याच्या वार्ता ऐकून नगरीच्या स्त्रिया नंदाच्या घरीं जमून बोलत असतां कवि म्हणतो—

ऐस्या नगरीचिया स्त्रिया। अधरीं करूं ठेउनीया

पुढे कंसवधाच्या निमित्ताने श्रीकृष्णाचें मथुरेस येणें झालें. त्या वेळीं पुरांगनांची अवस्था काय वर्णावी ?

एकीतें कृष्णें न्याहारिलें। त्या लज्जा अधोदृष्टि पाहिलें
परि दृष्टि बैसली ना हाले। वदनोहुनी ॥१३६॥
अंचळु सरिसा करोनी। कर्ण मागे खाजोनि
जाली हास्यवदनी। शोभत असे ॥१३७॥
सर्वेचि कटाक्षें पाहे। तों कृष्णु न्याहारीतुची आहे
तें समईं जें मनीं होये। तें तेची जाणे ॥१३८॥

—अ० ४३

स्त्रियांनी साजशृंगार केला. त्यांतील एकीने आरसा घेऊन रूप पाहिलें. तों विडा चांगला रंगला होता. चेहऱ्यावर हास्य आणून (आपण सुहास्यवदना कशा शोभतों हें) पाहिलें—

आरिसा घेउनी नेहारीला। विडा सुरंगरंगासी आला
हास्य उद्भवू पाहिला। आपला आपण ॥१४५॥अ. ४३

श्रीकृष्णाला पाहण्यासाठी स्त्रीपुरुषांची दाटी झाली. त्यांत अंगनांचीं हृदयें तर ठिकाणावर नव्हतींच. तेव्हां त्यांना आपल्यापुढे पुरुष आहे का स्त्री आहे याचें भान कुठून असणार ? श्रीकृष्णाला पाहण्यासाठी आतुर झालेल्या स्त्रिया, पुढे उभ्या असलेल्या पुरुषांना रेटून पुढे पाहण्याचा प्रयत्न करायला लागल्या. पुरुष त्यांना 'मागे सरा' म्हणायला लागले. परंतु ते पुरुष आहेत हें न समजून त्या काकुळतीने म्हणायला लागल्या 'अगे मागे सर म्हणूं नकोगे'—

कृष्णा वरपडी पाहाती । पुढे पुरुष आहे नेणती
स्तन पाठी रुतती । तो परती म्हणे ।। १४७।।
परते म्हणो नको गे मातें । तो म्हणे 'मी नंदखसी पुरुषातें'
ऐसीं चोरिलीं चित्तें । पुरांगनांचीं ।।१४८।।
—अ. ४३

घरकामावर लक्ष नसलेल्या स्त्रियांचीं उपहासात्मक विनोदी वर्णनेंहि कवीने केलीं आहेत. त्यावरून त्याच्या गृहिणीजीवनविषयक कल्पनांवर प्रकाश पडण्यासारखा आहे. ६९ व्या अध्यायांत श्रीकृष्ण आपल्या पत्न्यांशीं नानापरीने विनोद करीत असल्याचीं वर्णनें केलीं आहेत. त्यांत एकीला उद्देशून श्रीकृष्ण म्हणतो—

कृष्ण म्हणे तुजसारिखी । येकाची बाईल होती नेटकी
तीसी गोष्टी अनेकी । नित्य पाहिजेति ।।२१८।।
ऐसी गोष्टि वेल्हाळ नारी । चित्त नाही घरावरी
वेळवेळा श्रृंघारू करी । अति नेटाचा ।।२१९।।
केळांचि शिखरीणी केली । त्यासी फोडणी दिधली
अमृतफळें वाघारिली । सुगरणि तिया ।।२२१।।
—अ. ६९

पति व पुत्र यांना चोरून स्वतः चांगले चांगले पदार्थ खाणाऱ्या स्त्रियांचें हें वर्णन पहा—

आणिकि स्त्रिया घराचारि । भरिति आपुलिचि गारी
सेजारियाचे रिण करी । धनियातें वंचुनि ।।३४।।
रडतु कसमुसतु घरधणी । वाहेरि जाय जेउनि
खेळासि लेकरे गोउनि । मग सावकाश जेवी ।।३५।।
अॅसा* आपुलाचि पिंडु पोसी । लेकुराचा कुटका माखि
अॅश्या स्त्रिया मृत्युलोकिं । नांदति घरि ।।३६।।
—अ. ८०

स्त्रियांच्या सासुरवासाचें वर्णन एके ठिकाणीं थोडक्यांत आलें आहे. तेंहि लक्षांत ठेवण्यासारखें आहे. सूर्यग्रहणाच्या निमित्ताने श्रीकृष्णादिक सर्व कुरुक्षेत्रीं गेले असतां तेथे आलेल्या गोकुळच्या सर्व लोकांच्या भेटी झाल्या. त्या प्रसंगीं कृष्णाचे चरण नित्य आपल्या चित्तांत राहावेत असें गोपिका त्याच्याजवळ मागतात. तें चित्तीं न राहण्याला कारणें कोणतीं? गोपिका म्हणतात—

ज्या आम्ही गृहसेवापरा । गुंति पडे विषय व्यापारा
तत्समयीं तुझें दातारा । स्मरण कंचें ? ।।३३६।।
सासू रागेजे कामासि । सासुरा कोपे आचार चुकीसी
देर भावें सन्मानासि । चुकलेयां गोपती (कोपती ?) ।।३३७।।
या भ्रताराची चित्तवृत्ती । न राखवे गा श्रीपती
आणि लेकुरें थाया घेती । नाना परीचा ।।३३८।।
नणदा वोहनी काहटागळया । लावालावी करूनि वेगळया
ऐस्या क्रोधेंचि पाजळल्या । तनु आमुचिया ।।३३९।।
तव रात्रिचा अवसरीं । कामु धरी फरारी
मा तुझें तेधवा श्रीहरी । स्मरण कंचें ।।३४०।।

वर्णनाच्या साहाय्याने कोणतेंहि दृश्य वाचकांच्या पुढे उभें करण्याचें सामर्थ्य कवीने अनेक ठिकाणीं दाखविलें आहे. कृष्ण–चाणूर, बळराम–मुष्टिक यांचें मल्लयुद्ध विस्ताराने वर्णिलें असून त्यांत वारकाईहि आहे. तसेंच कुवलय नामक हत्तीशीं श्रीकृष्णाने जी झुंज घेतली तिचेंहि साधेंच परंतु परिणामकारक वर्णन लक्ष वेधून घेणारें आहे. या वर्णनांतील या दोनतीनच ओव्या पहा—

कृष्ण वाटला पडला । हस्ती कोपें रिचवला
तव निमिषमात्रें उठिला । नातुडेचि कृष्णु ।।६२।।
खवळिला करी मत्त । क्रोधातें न संभाळीत
भूमी हाणीतले दांत । जेथें कृष्ण होता ।।६३।।
केवढा चुकला घातु । जरी कृष्णासीं लागतां दांतु
परी पहाताहे समर्थु । जनु म्हणे ।।६४।। —अ० ४३

शृंगारिक वर्णनें करण्यांतहि कवि पटाईत आहे. रुक्मिणीच्या सौंदर्याचें वर्णन, पुरांगनांच्या शृंगारांचें वर्णन, श्रीकृष्णाच्या इतर पत्न्यांचें वर्णन, गोपिकांचें वर्णन इ० स्थळें या दृष्टीने पहाण्यासारखीं आहेत. शिवाय रासक्रीडा, कात्यायनीव्रत इ० स्थळें तर आहेतच. याशिवाय अन्यत्र असलेल्या वर्णनांतलींच एकदोन स्थळें येथे देतो. श्रीकृष्णस्त्रिया, द्रौपदी व अन्य राजस्त्रिया एकत्र वसून आपापल्या लग्नाच्या गोष्टी सांगत आहेत असा प्रसंग ग्रंथाच्या शेवटीं शेवटीं आला आहे. त्या स्त्रियांचें वर्णन कवि असें करतो—

(पुढील मजकूर पान ३८ वर)

* अशी सावरकरी लिपि दोन ठिकाणीं वापरली आहे.

# ललित वाङमयांतील सुबोधता

भास्कर कविमंडन

उत्तम ललित वाङ्मय कोणतें ?

प्रथमच हा प्रश्न विचारून उत्तर देणे कांहीसें कठीण आहे. निदान आज तरी कठीण आहे. तरीहि अकरणात्मक उत्तर देतां येईल. सध्या कांही सिद्धहस्त नवलेखक सोडून इतर जे पंथाभिमानी बहुतेकांना समजावें म्हणून सोप्या घटना अगदी सुबोधतेने लिहितात; त्यांचें तें उत्तम ललित वाङ्मय नाही.

बहुजनसमाजाच्या आकलनशक्तींत जें चपखल बसेल तें निर्मावें असा वारा प्रचलित असतांना, सोप्या घटना सुबोधतेने सांगणारें साहित्य, लालित्यहीन असूं शकतें, असें विधान बऱ्याच लोकांना खटकण्यासारखें आहे.

आज वाङ्मयीन मंडळींत कांही संकेत रूढ केले जात आहेत. व त्या संकेतांच्या साहाय्याने प्रतिमासीं ढीगभर ललित वाङ्मय निघत आहे. तें वाचल्यास या रूढ होऊं पाहणाऱ्या संकेताची सरळ साखळी हातीं लागते. ती अशी—जीवनापासून फटकून राहणारें स्वप्नाळू (म्हणून पोकळ) साहित्य नको. दैनंदिन जीवनांत न दिसणाऱ्या घटना रंगविणें वाचकांच्या दृष्टीने कुचकामी असल्याने हें साहित्य पण वाचकांकडे पाठ फिरविलेलेंच होईल. म्हणून तुमच्या आमच्या रोजच्या जीवनांत जें कांही आंबट-गोड घडतें तेंच वास्तवतेने चित्रित करणें, हें खऱ्या साहित्याचें आदर्श राहावें.

वरील निष्कर्ष अद्याप या संगतींत कोणी मांडले नसतीलहि; पण त्यांचें फुटकळ रूपांत विवेचन व त्या आधारावर उभें राहणारें आजचें साहित्य पाहतां असेच निष्कर्ष काढावे लागतात. आजच्या ललित साहित्याचा बहुतेक भाग अडविणाऱ्या कथेचें, या दहा वर्षांतील सर्रास लिखाण पाहिल्यास वरील निष्कर्ष मान्य करावे लागतील.

साहित्याने 'दैनंदिन जीवनाचें चित्रण वास्तवतेने' केलें पाहिजे म्हणजे, त्यांत एक प्रकारचा सोपेपणा, सुबोधता व जिव्हाळा राहूं शकतो, असें त्याचें म्हणणें दिसतें. ललित वाङ्मय एका अर्थाने सुबोध असावेंच. याविषयी प्रश्न नाही. पण सुबोध व सोपें या शब्दांचे अर्थ तरी आम्ही कोणते घेत आहोंत, हा खरा प्रश्न आहे.

ललित कृतीला शास्त्रीय व गंभीर स्वरूप देण्याच्या प्रयत्नांत जसें तिला क्लिष्ट व दुर्बोध करून टाकण्याची चूक केली जाते, तशीच, जणु याचा बचपा म्हणून अत्यंत सोपें लिहिण्याची चूकहि केली जाते. अर्थात हें सोपें-साहित्य एकदाहि वाचावेसें वाटत नाही. सर्वांना समजावें आणि मान्य व्हावें म्हणून मुद्दाम असें सामान्य व सोपें लिहिणाऱ्यांचा हा प्रयत्न व अभिमान व्यर्थ आहे. थोडा विचार केल्यास कळून येईल की जर लेखकाचें निरीक्षण सामान्यांतून (किंवा अन्य ठिकाणांहून) असलें तरी असामान्य नसेल, त्याची त्या निरीक्षणावरील पकड स्पष्ट व बळकट नसेल आणि नंतर होणारा आविष्कार जर संपूर्ण व जिवंत नसेल तर, तो प्रसंग दैनंदिन-जीवनांतील सोपा आहे, भाषा साधी आहे, वगैरे समर्थनपर विधानें कुचकामी ठरतील. कलेला रोजच्या प्रसंगांचें किंवा साध्या भाषेचें जरी मुळीच वावडें नसलें तरी फक्त तेवढ्याच निकस खाद्यावर कला कधीच जगली नाही. जगूं शकत नाही. ज्यावेळीं रोजचे प्रसंग व रोजचीच भाषा हेच फक्त साहित्यांत स्वीकारले जातात त्या वेळीं अमर्याद सोपेपणा किंवा सुबोधता ललित कृतीला त्रास द्यायला लागते. आणि

ही अमर्यादा ललित कृतीला किती पांचट व निष्क्रिय बनविते हें आजचे वाचक सहज अनुभवूं शकतात. उत्तम वाचक ललितकृति वाचतात त्या केवळ जीवनाचें प्रतिबिंब त्यांत सापडावें म्हणून नाही किंवा तें प्रतिबिंब प्रामाणिकपणाने सापडावें म्हणूनहि नाही. नेमकी याच ठिकाणीं गल्लत केली जाते. ललितकृतीला जीवनाचें नुसतें प्रतिबिंब करून कलेचें पाऊलहि कधी हातीं लागावयाचें नाही. कलाकृति ही केवळ जीवनाचें प्रतिबिंब देणारा एक निर्जीव आरसा होऊं शकत नाही. मग हें प्रतिबिंब कितीहि साध्या जीवनांगाचें असो व अगदी वास्तव असो, रसिकांचें त्याने समाधान होणार नाही. व अशी साहित्यकृति टिकून पण राहणार नाही.

वाङ्मय ही एक कला आहे. कला ही जीवनाचें प्रतिबिंब असावी हें अधुरें विधानहि ठीक आहे. पण कला जीवनाचें प्रतिबिंब असण्याचें कारण काय, निकड कोणती व कोण मागतो हें प्रतिबिंब, या प्रश्नांचीं उत्तरें दिल्यासच मागील अधुरें विधान सर्वांगीण होऊं शकेल. अर्थात हीं सर्व उत्तरें या लेखकक्षेत बसत नाहीत. पण या उत्तरांचा उल्लेख करूनच विवेचन पुढे न्यावें लागेल.

जगांतील बहुतेक माणसांची स्थिति जीवनाच्या बाबतींत डोळे असून आंधळ्यासारखी असते. किंवा ज्या व्यक्तीला शस्त्रक्रियेनंतर नुकतीच दृष्टि आली आहे, सर्व नुकतेंच दिसत आहे अशा व्यक्तीप्रमाणे असते.

समोरचें जग दिसत असतांना जर मी विचारलें की 'हें काय ?' आणि याचें उत्तर म्हणून दुसऱ्या महाभागाने एक स्वच्छ आरसा आणून समोरचें जग हुबेहूब प्रतिबिंबित करून मला दाखवलें तर माझें समाधान तर होणार नाहीच, पण समोरचें दृश्य त्याच मख्खपणाने दाखविणाऱ्या आरशाचा मला तिटकारा वाटेल. जो आरसा प्रश्नचिन्ह फक्त हुबेहूब दर्शवितो तो आरसा मला उत्तराचें समाधान कसें देणार ? मला तर समोरच्या जगाचें उत्तर हवें असतें, अर्थ हवा असतो, गती आणि दिशा हवी असते. 'केवळ प्रतिबिंब' नको असतें.

प्रणयाने बावरलेल्या तरुणाला स्वतःच्या चेहऱ्यावर हावभावांत कांहीतरी (प्रश्नचिन्ह) बदल जरूर जाणवत असतो. त्याने मोठ्या संकोचानेच विचारलें. 'हा बदल कसा आहे ?' तर याचें उत्तर 'आरशांत तुझा चेहरा पहा' असें देतां येईल का ? केव्हांहि नाही. स्वतःचा चेहरा, स्वतःचें जीवन त्याला दिसत असतें. तें पुन्हा तसेंच' 'प्रामाणिकपणाने' दाखविण्याचें वास्तविक कारणच नाही. त्याला त्या जीवनाची लय मात्र कळत नसते, त्या चेहऱ्याचा अर्थ कळत नसतो. व तो सांगण्यासाठी त्याचें, निर्जीव दर्पणांत बघून चालत नाही, तर प्रेयसीच्या जिवंत डोळ्यांत त्याला शोध घ्यावा लागतो.

रसिकाला कलाकृतींत केवळ एक निर्जीव दर्पण नको असतो तर प्रेयसीचे असे जिवंत डोळे हवे असतात. जे प्रामाणिक प्रतिबिंब तर देतातच (मग तें कितीहि साध्या जीवनांगाचें असो) पण त्याहून अधिक कांही तरी त्यांच्याकडून मिळतें, की जें फक्त अशा जिवंत दर्पणाकडूनच अपेक्षिलें जातें.

ज्या वेळीं साहित्यांत असे जिवंत दर्पण, कोणत्याहि कारणाने का होईना फोडले जातात त्याच वेळी सोपेपणाची मर्यादाहि मोडून ओलांडली जाते. साहित्य अमर्याद, सुबोध, पण एक निर्जीव प्रतिबिंब होऊन बसतें.

वाङ्मयांत सुबोधता आपआपल्या शक्तीनुसार प्रत्येक लेखकाने आणण्यास हरकत नाही. पण प्रत्येकाने ही काळजी अवश्य घेतली पाहिजे की ललित–कृतींत अर्थसंभाराचें केंद्र उध्वस्त होणार नाही. जो सोपेपणा अर्थ नासवून टाकतो, तो निर्जीव असतो. व निर्जीव चीज ही कलाकृती नसते. कलाकृतींतील अर्थभरित लकेर कायम ठेवण्यासाठी जर (सामान्य वाचकाच्या दृष्टीने) गूढ लिहिणें भाग पडलें तर न कचरतां रेखाटन झालेंच पाहिजे. धक्का सोपेपणाला, सुबोधतेला लागूं शकतो. त्या प्रमाणांत फरक होऊं शकतो, पण अर्थाच्या गाभ्यांत थोडाहि फरक करणें अत्यंत मारक असतें. वाङ्मयीन सुबोधतेने अर्थभरित संवेदना उध्वस्त करण्यास कधीहि आक्रमण करूं नये. वाङ्मयांतील सुबोधतेसाठी ही पहिली महत्त्वाची मर्यादा झाली.

वाङ्मयीन सुबोधता कशी नसावी हें सांगितल्यावर ती कशी असावी हें सुद्धा स्पष्ट सांगावें लागेल.

जगांतील अव्वल दर्जाच्या साहित्यांत सोपेपणा (रूढ अर्थाने) फारच कमी प्रमाणांत दिसतो हें

लक्षणीय आहे. म्हणजे उत्कृष्ट कलाकृतींत सुबोधतेला मज्जाव अ नाही. अव्वल दर्जाच्या कलाकृति असामान्य तांनी निर्मिल्या आहेत. व त्यांना तांत्रिक स ी गरज वाटली नाही इतकाच त्यांतून अर्थ ल. उत्कृष्ट कलाकृतीला अत्यंत अवश्य जर कांही सेल तर नैसर्गिक आणि जिवंत असे मनोभाव (S ntiments). हे जर नसतील तर कलाकृतीहि उर ार नाही. कलाकृतींत नैसर्गिक जिवंत मनोभाव जे हवेत त्यांचें प्रमाण प्रत्येक ठिकाणी किती असावें हें अर्थात ज्या त्या कलावंतावर अवलंबून आहे. एका डोळ्यांतून दुःखाचें पाणी व दुसऱ्यांतून उल्हासाचा झरा चित्रित करताच येणार नाही असें नाही. तो प्रतिभेचा प्रश्न आहे. व याच ठिकाणीं सुबोधतेचा एक नीट अर्थ लावून सामान्यतः अनुकरणीय असा नियम केला जाऊ शकतो.

एकाच कलाकृतींत एकाहून अधिक जिवंत मनोभाव सिद्धकौशल्याने बेमालूम गुंफणें हें अत्यंत बिकट कार्य आहे अशी परिणतप्रतिभा प्रत्येक कलावंताला लाभेलच असें नाही. शिवाय, असे, एकाहून जास्त मनोभाव ज्यांत मिसळून दिले आहेत ती कलाकृति त्याच प्रमाणांत अधिकाधिक गूढ होत असते. व तिचा स्वाद घेण्यास रसिकाला फार सूक्ष्म व तरल व्हावें लागतें. शक्य आहे की सामान्य जगांत असे रसिक फारच कमी असतील. बहुतेकांना गूढता अगम्य वाटत असेल. पण त्यांना सुद्धा, या नैसर्गिक मनोभावांच्या अर्थपूर्ण दर्शनापासून वंचित करणें सहृयतेचें लक्षण ठरणार नाही. म्हणून त्यांना या मनोभावांचें दर्शन घडवितांना सुबोधता कलाकृतींत आणावी लागते. ही सुबोधता म्हणजे काय ?

ही सुबोधता म्हणजे आजचा सोपेपणा वास्तवता वगैरे कांहीहि नाही. कलाकृतींतील सुबोधता म्हणजे नैसर्गिक जिवंत मनोभावांची एकेरी व एकसंधी रचना. त्यांतील शुद्धता किंवा साधेपणा. पूर्ण कलाकृतींत जेव्हा आद्यापासून अंतापर्यंत एकच एक मनोभाव असतो तेव्हा त्या कलाकृतीला एकसंघ (Homogeneous) म्हणावें. सलग म्हणावें. या ठिकाणीं एकसंघ हा शब्द विसंगत या शब्दाचा विरोधार्थी म्हणून व सलग हा तुटक याचा विरोधार्थी म्हणून वापरला नाहीं हें लक्षांत घ्यावें. कलाकृति जशी एकसंध किंवा सलग असूं शकते तशीच अनेकांग (ज्यांत जिवंत सुसंगति असते.) व विलग (जी विलगता अखेर सलगतेकडेच जाते पण पद्धतींत मोहकता आणते) पण असूं शकते. जेव्हा आकृतींत अनेक मनोभावांचा वृथा गोंधळ नसून एकाचाच प्रशांत आविष्कार असतो तेव्हा त्या कलाकृतीला शुद्ध किंवा साधी ( pure & simple ) म्हणतां येईल. हे शब्द पण अशुद्ध किंवा क्लिष्ट यांच्या विरोधांत वापरले नसून एकसंध कलाकृतीचे स्वतंत्र विशेष दर्शविण्यास वापरले आहेत. कलावंताच्या मगदुराप्रमाणे कलाकृति अनेकांग ( complex ) किंवा गूढ (deep and subtle ) होऊं शकते.

वाङ्मयीन सुबोधतेविषयी इतकीच अपेक्षा करतां येईल. नैसर्गिक मनोभाव एकसंध व शुद्ध स्वरूपांत जेथे चित्रित केले जातात तेथेच सुबोधता असते. आणखी यापेक्षा जास्त सोपेपणा ही काय चीज आहे हें आजपर्यंतच्या महान कलावंतांना तरी कळालें नाही ! आणि तें योग्यच आहे. कारण महान कलावंत सुबोध होऊं शकतात पण 'बिनबोध' व पोकळ होऊं शकत नाहीत !

तेव्हा, सर्वसामान्य रसिकांनी वाङ्मयाचा स्वाद घेतांना वास्तवतेच्या सोपेपणाच्या, अत्यंतिक कल्पना सोडून द्याव्यात व केवळ सोपेपणा किंवा प्रतिबिंब कधीहि स्वीकारूं नये. जर कलेच्या प्राणाला धक्का लागला, तर मग सोपेपणा व वास्तवता करायची काय ?

अनुक्रमणिका

# काव्य–संगीताचा मधुर संगम गीतगोविन्द

प्रा. गो. श्री. बनहट्टी

संस्कृत साहित्यांत जयदेवाच्या गीतगोविन्द काव्याचें स्थान मोठें वैशिष्टयपूर्ण आहे. राधाकृष्णांच्या शृंगारावर लिहिलेलें हें अपूर्व काव्य महाकाव्य, खंड-काव्य इत्यादि काव्यप्रकारांमधून आरपार जाऊन स्वतःचा एक वेगळाच वर्ग स्थापूं पाहतें. त्या वर्गाला गेयकाव्य हें नांव देणें योग्य होईल. गीतगोविन्द काव्य वीणेच्या साथीवर गावयाचें असल्याने त्याला वीणा काव्य असेंहि सार्थ नांव दिलें गेलें आहे. गीतगोविन्दांतील बहुतेक भाग शास्त्रीय पद्धतीने गावयाच्या मंजुळ गीतांनी व्याप्त आहे. या गीतांमध्ये प्रायः आठ–आठ कडवीं असून, प्रत्येक गीताच्या शेवटीं कवीने स्वनाम-निर्देश करणारें नववें कडवें रचलेलें आहे. म्हणून या गीतांना अष्टपदी असें नांव असून प्रत्येक अष्टपदीच्या प्रारंभीं कवीने ती कोणत्या रागांत व तालांत गावयाची याचा स्पष्ट निर्देश केलेला आहे. जयदेवाची वाणी अत्यंत रसाळ, मधुर व प्रासादिक आहे. जयदेवाने स्वतः रचलेल्या पुढील श्लोकांत केलेलें आपल्या वाणीचें वर्णन पूर्णपणे सार्थ वाटतें.

साध्वी माध्वीक चिन्ता न भवति भवतः
शर्करे कर्कशासि
द्राक्षे द्रक्ष्यन्ति के त्वाममृत मृतमसि
क्षीर नीरं रसस्ते ।
माकन्द क्रन्द्र कान्ताधर धर न तुलां
गच्छ यच्छन्ति भावं
यावच्छृङ्गारसारं शुभमिव जयदेवस्य
वैदग्ध्यवाचः ।।

[ जोपर्यंत जयदेवाची प्रौढ वाणी शृंगाराचें शुभ सार प्रकट करत आहे, तोपर्यंत, हे मद्या, तुझी चिन्ता व्यर्थ आहे; हे शर्करे, तूं कर्कश आहेस; हे द्राक्षा, तुझ्याकडे कोण पाहील ? हे अमृता, तूं मृत आहेस. हे दुधा, तुझी चव पाण्यासारखी आहे. हे आंब्या, तूं रडत बैस. हे कान्तेच्या ओष्ठा, तूं स्वतःची तुलना करूं नकोस, जा.]

## कविविषयक माहिती

कोपरापासून नमस्कार करून 'कालाय तस्मै नमः' म्हणण्याची तीव्र इच्छा जर केव्हा होत असेल तर ती प्राचीन कवींचा कालनिर्णय करतांना. भारतीय कवींचाच कालनिर्णय व चरित्रनिर्णय करतांना फार क्लेश होतात व म्हणून प्राचीन भारतीयांना ऐतिहासिक दृष्टि नव्हती असा भ्रम अनेक आधुनिकांच्या मनांत असतो. विशेषतः पाश्चात्य लेखकांपैकी अनेकांनी हा भ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. पण ही गोष्ट सर्वथा असत्य होय. ख्रिस्तशतकाच्या प्रारंभीं झालेल्या प्राचीन भारतीय वाङ्मयांतील पुराणग्रंथांत भरपूर ऐतिहासिक माहिती ग्रथित केली गेली आहे. प्राचीन भारतीय वाङ्मयांत 'इतिहासग्रंथ' हा एक वेगळा विभाग होता हें अनेक ठिकाणीं येणाऱ्या त्याच्या उल्लेखावरून स्पष्ट दिसतें.

'धर्मार्थकाममोक्षाणामुपदेशेन समन्वितम् ।
पूर्ववृत्तं कथायुक्तमितिहासं प्रचक्षते ।। '

या इतिहासाच्या लक्षणावरून तो प्रकार जरी आधुनिक इतिहासाप्रमाणे निर्भेळ नव्हता तरी तो अस्तित्वांत होता हें स्पष्ट होतें. पुराणग्रंथ हे इतिहासग्रंथांच्या आधारें लिहिले गेले हें प्रसिद्ध आहे. महाभारताचें मूळ स्वरूप 'जय' हें इतिहास म्हणूनच प्रसिद्ध आहे. याच्या जोडीला संस्कृत साहित्यांतील हजारो ग्रंथ नष्ट झालेले आहेत हें लक्षांत घेतलें म्हणजे प्राचीन संस्कृत साहित्यांत इतिहासग्रंथ कमी आहेत याचें आश्चर्य वाटावयास नको.

विशेषतः युरोपांतील ग्रीस व कांही अंशीं रोम हीं राष्ट्रें सोडल्यास बाकीच्या राष्ट्रांच्या साहित्यिक व राजकीय इतिहासाच्या दारिद्र्याच्या तुलनेने भारतवर्ष इतिहासाच्या बाबतींत नवकोटरामायण आहे यांत शंका नाही. ज्ञानेश्वरानंतर शे-दीडशें वर्षांनी झालेल्या चॉसर या पहिल्या प्रमुख इंग्रज लेखकापासून आजपर्यंतच्या इंग्रजी साहित्याच्या इतिहासांतील अनेक लेखकांचे जन्ममृत्युशक व चरित्रें निश्चितपणे सिद्ध झालेलीं नाहीत. इतकेंच नव्हे, फक्त साडेतीनशें वर्षांपूर्वीच्या शेक्सपीयरच्या नांवावर प्रसिद्ध असलेलीं नाटकें त्याने लिहिलेलीं नसून मार्लोव या समकालीन नाटककाराने लिहिलेलीं आहेत असाहि एक पक्ष अस्तित्वांत आहे. असो.

सुदैवाने गीतगोविन्दकार जयदेवकवीच्या बाबतीत बरीच विश्वसनीय माहिती उपलब्ध आहे. जयदेव श्रीकृष्णाचा परमभक्त होता. चन्द्रदत्ताने लिहिलेल्या भक्तमाला या ग्रंथांत ३९ ते ४१ हे तीन सर्ग जयदेवाच्या चरित्रवर्णनास दिले आहेत. खुद्द जयदेवाने आपल्या काव्यांत स्वतःविषयीं तुरळक माहिती दिली आहे. हा कवि उत्कल किंवा ओरिसा किंवा उडीसा प्रान्तांतील किन्दुबिल्व किंवा बिन्दुबिल्व गावचा रहिवासी होता. तो स्वतः गीतगोविन्दाच्या तिसऱ्या सर्गांत म्हणतो—

वर्णितं जयदेवकेन हरेरिदं प्रवणेन।
किन्दुबिल्वसमुद्रसम्भवरोहिणीरमणेन ।।

(या किन्दुबिल्वग्रामरूपी समुद्रांतून उत्पन्न झालेल्या चन्द्रासारख्या जयदेवाने हरीचें हें चरित्र भक्तीने वर्णिलें आहे.) भक्तमालेंत याच गावाचा उल्लेख बिन्दुबिल्व असा केलेला उल्लेख असून तें जगन्नाथपुरीच्या जवळ व 'ब्राह्मणसंकुल' अर्थात ब्राह्मणांनी गजबजलेलें होतें, असें म्हटलें आहे. गीतगोविन्दाच्या शेवटच्या भागांतील

श्रीभोजदेवप्रभवस्य रामादेवीसुतश्रीजयदेवकस्य ।
पराशरादिप्रियवर्गकण्ठे श्रीगीतगोविन्दकवित्वमस्तु ।।

या श्लोकावरून जयदेवाच्या मातापित्यांचीं नांवें अनुक्रमें रामा (किंवा राधा) देवी व भोजदेव हीं असावीं असें दिसतें. तसेंच काव्य गाणाऱ्या गायकांत पराशर हा प्रमुख असावा असेंहि अनुमान होतें.

जयदेवाच्या कालासंबंधीं एक निर्णायक शिलालेख सापडलेला असल्याने तो प्रश्न सुटला आहे. वंगदेशांत ख्रिस्तशकाच्या अकराव्या शतकाच्या समाप्तीपर्यंत राज्य करीत असलेल्या लक्ष्मणसेन राजाच्या दरबारीं जयदेव होता, असें या शिलालेखावरून दिसतें. हा शिलालेख लक्ष्मणसेनाच्या सभागृहाच्या दारावर खोदलेला सापडला. त्यांत वरील अर्थाचा पुढील श्लोक आहे--

गोवर्धनश्च शरणो जयदेव उमापतिः ।
कविराजश्च रत्नानि समितौ लक्ष्मणस्य च ।।

गोवर्धनादि समकालीनांचा उल्लेख जयदेवाने आपल्या गीतगोविन्दांत केला आहे. त्यावरून या श्लोकांतील जयदेव म्हणजेच गीतगोविन्दकार जयदेव हें निष्पन्न होतें.

जयदेवाचा गीतगोविंद हा एकच ग्रंथ उपलब्ध आहे. संस्कृतसाहित्यांत 'प्रसन्नराघव' हें नाटक लिहिणारा व 'शृङ्गारमाधवीयचम्पू' हें चम्पूकाव्य लिहिणारा असे आणखी दोन तरी जयदेव ज्ञात आहेत. पण त्यांच्याशी नामैक्याशिवाय गीतगोविंदकाराचा कांहीहि संबंध नाही. गीतगोविंद या एकाच काव्याच्या द्वारें जयदेवाने आबालवृद्ध संस्कृतज्ञ रसिकांच्या हृदयांत व मुखांत अमर स्थान मिळवलें. या काव्याचा तावडतोब अखिल भारतांत प्रसार झाला. तें सार्वजनिक गीत बनलें व त्यांतील अष्टपद्यांवर बसवलेलीं नृत्येंहि होऊं लागलीं. गीतगोविंदावर दोन टीका प्रसिद्ध आहेत. चौदाव्या शतकांतील मेवाडचा महाप्रतापी राणा कुंभ हा राज्यसंचालनांत जितका कुशल तितकाच विद्याकलांचाहि रसिक भोक्ता होता. त्याने गीतगोविंदाचा आस्वाद घेऊन त्यावर रसिकप्रिया नांवाची विस्तृत टीका लिहिली. ही गोष्ट कुम्भाच्या रसिकतेची जितकी द्योतक आहे तितकीच गीतगोविंदाच्या दूरवर पसरलेल्या कीर्तिसुगन्धाचीहि निदर्शक आहे. गीतगोविंदावर शंकरमिश्रानेहि रसमंजरी नांवाची टीका लिहिलेली आहे.

अनुक्रमणिका

## कथानक

जयदेवानें आपल्या काव्याचा प्रारंभ संस्कृत-साहित्यांतील परंपरेला अनुसरून 'राधामाधवविलासांचा जय असो' अशा जयवंदनेने केला आहे. नंतर थोडी स्वतःची व गोवर्धनादि समकालीनांची स्तुति करून त्यानें विष्णूच्या दहा अवतारांचें दहा सुंदर कडव्यांत गेय स्तोत्र रचलें आहे. या अवतारांत नेहमीच्या कृष्णावताराऐवजीं बलरामाचें अवतार म्हणून वर्णन केलें आहे. आणि नंतर दहाहि अवतारांचें अन्तःस्वरूप श्रीकृष्ण यालाहि विस्तृत नमन केलें आहे. नंतर राधासखी राधेला सांगते, "फलाफुलांच्या मनोहर शोभेनें, चन्दनगन्धयुक्त वाऱ्यानें व इतर सर्व प्रकारच्या उत्तेजक सौंदर्यानें प्रेमीजनांना आवाहन करणाऱ्या वसन्तश्रींत हरि विलास करीत आहे. या पीताम्बरधारी वनमालीच्या कानांतील कुण्डलें त्याच्या गालांवर डुलत आहेत. सरोवरांतील कोमल कमलापेक्षाहि हरीचें मुखकमल न्याहाळण्यांत गोपींचे नेत्र मग्न आहेत. मग तूं अशी मागे कां?" दुसऱ्या सर्गांत रुसलेली राधा सखीला सांगते, "कृष्णानें माझे अनेक अपराध केले आहेत तरी पण माझें मन त्याचे गुण गात आहे तरी तूं माझी दूती बनून त्याला वश कर." तिसऱ्या सर्गांत कृष्णहि राधेप्रमाणेच प्रियेच्या विरहामुळे तळमळत असलेला दिसतो. तो म्हणतो, "इतर गोपींशीं मी संगत करतों म्हणून रागावून राधा निघून गेली. आता हें जीवन तरी काय कामाचें? हा कमलहार मला सर्पराजाप्रमाणे वाटतो. असें तर झालें नाही ना की माझें नांव हरि नसून हर आहे असें वाटून हरानें भस्म केलेला मदन मला पीडा देत आहे!" चौथ्या सर्गांत राधासखी माधवाकडे जाऊन आपलें नाजूक काम करूं लागते. 'सा विरहे तव दीना' या ध्रुवपदानें सुरू होणाऱ्या सुंदर अष्टपदीच्या गायनानें ती कृष्णाला आळविते. कृष्णहि राधेसाठी तसाच झुरत असतो. ही बातमी ती सखी पांचव्या सर्गांत राधेला सांगते. राधा तें ऐकून अधिक उत्सुक व विह्वल होते. सहाव्या सर्गांत सखी राधेची विकलावस्था एका लहान पण सुंदर अष्टपदीच्या द्वारें कृष्णाला सांगते. इकडे सातव्या सर्गांत रात्रीं चंद्रोदय झाल्यामुळे राधेची पीडा शतगुणित होते. कृष्णाविना आलेल्या सखीला पाहून ती वेगवेगळचा शंका घेते. शेवटीं ती सखीला सांगते, 'विरहमारामुळे फुटत असलेलें हें माझें हृदय आता स्वतःच त्याच्याकडे जाईल.' आठव्या सर्गांत राधेनें स्वतः कृष्णाला उद्देशून म्हटलेलें भैरवी रागांतील सुंदर गीत आहे. नवव्या सर्गांत राधेची सखी कृष्णाची वकिली करून राधेला धीर धरायला सांगते. त्यामुळे प्रसन्न झालेला कृष्ण दहाव्या व अकराव्या सर्गांत राधेचा अनुनय करतो. शेवटच्या बाराव्या सर्गांत राधाकृष्णांच्या विलासांचें बहुतेक सांकेतिक वर्णन करून कवि वाचकांचा निरोप घेतो.

वरील हकीकतीवरून हें स्पष्ट होतें की या काव्याला कथानक असें फारसें नाही. राधामाधवांचा परस्परांविषयी रुसवा व सख्यांकडून परस्पर निरोपांची देवघेव व शेवटीं समेट येवढेंच कथानक आहे व म्हणून हें काव्य प्रामुख्यानें संभाषणप्रचुर आहे. हीं संभाषणें, विशेषतः सहाव्या, सातव्या व आठव्या सर्गांतील गीतयुक्त संभाषणें बहारीचीं वठलीं आहेत.

## या काव्याची रचना

गीतगोविन्दाचें संस्कृत साहित्याच्या परंपरेंतील विशिष्ट स्थान मुख्यतः त्याच्या रचनेमुळे आहे. कल्पनांची उत्तुंगता, विचारांचें गांभीर्य, व्यापक अवलोकन, शृंगारकरुणवीरादि रसांचें मनोहर आविष्करण, पात्रांचें प्रभावी चित्रण इत्यादि अनेक काव्यगुणांच्या बाबतींत कालिदास, भवभूति, भारवि, माघ वगैरे संस्कृत साहित्यांतील दिग्गज जयदेवाला मागे टाकतात यांत शंका नाही. पण एका गुणाच्या बाबतींत मात्र गीतगोविन्दानें आघाडी गाठली आहे. तो गुण म्हणजे गेय रचना हा होय. काव्य आणि संगीत या दोन्ही कलांचा मधुर संगम गीतगोविन्दांत झालेला आहे, हें त्या काव्याचें अमर वैशिष्ट्य आहे. आपल्या संगीताच्या खोल ज्ञानाला जयदेवानें गीतगोविन्दांत काव्यगुणांचा प्रकर्ष साधण्यासाठी पुरेपूर राबवलें आहे. गीतगोविन्दांतील प्रत्येक गीताच्या प्रारंभीं जयदेवानें तें गीत कोणत्या रागांत व तालांत गावयाचें याची नोंद करून ठेवली आहे. गीतांचे राग व गीतां-

अनुक्रमणिका

तील रस यांचें अवलोकन केलें म्हणजे रसाला पोषक असे राग, ताल व वर्ण यांची निवड करण्याचें जयदेवाचें कसब स्पष्ट दिसून येतें.

गीतगोविन्दाच्या गेय रचनेचा विचार करतांना त्या काव्याकडे छन्दोरचना व वर्णरचना या दोन दृष्टींनी पाहणें क्रमप्राप्त होतें. गीतगोविन्दांतील गीतें वाद्यांच्या साथीवर रागांत व तालांत गावयाला योग्य अशाच वृत्तांत रचलेलीं आहेत. छंदाचे किंवा वृत्ताचे अक्षरगण व मात्रागण हे जे दोन प्रकार त्यांपैकीं बहुतेक श्रेष्ठ कवींनी वापरून झिजलेला अक्षरगणवृत्त हा प्रकार सोडून जयदेवानें मात्रागणवृत्तांचा अवलंब केला यांत त्याची स्वतंत्र योजकता दिसून येते. कालिदास-भवभूति-शूद्रकादींनी आपल्या नाटकांतील श्लोकांसाठी शार्दूलविक्रीडित, प्रहर्षिणी हरिणी आदि अक्षरगणवृत्तांचीच सरसहा योजना केलेली आढळते. मात्रागणवृत्तांपैकी आर्या हें एकच वृत्त या नाटकांत पुष्कळदा योजलेलें दिसतें. आमच्या मराठी नाटककारांनी ही पद्धत सोडून देऊन आपल्या नाटकांत मात्रागणवृत्तांची योजना केली व त्या वृत्तांत योजलेल्या पदांचें गायन अजूनहि ध्वनिमुद्रिकांच्या द्वारें कसें दुमदुमत आहे हें सर्वविश्रुत आहे. कालिदासादींच्या नाटकांतील श्लोकहि नटांकडून गायिले जात असतीलच. पण तें गायन पंगतींत गायिल्या जाणाऱ्या 'रामो राजमणिः सदा' सारख्या शार्दूलविक्रीडित श्लोकांच्या गायनासारखेंच होत असलें पाहिजे !

तात्पर्य, अक्षरगणवृत्त हा प्रकार गायनास गैरसोयीचा व मात्रागणवृत्त हा सोयीचा असतो. याचें कारण अगदी स्पष्ट आहे. अक्षरगणवृत्तांत गण मोजण्याचें माप अक्षर हें असतें. जसें अनुष्टुम् छन्द या अक्षरवृत्तांत एक चरण ( एक चतुर्थांश भाग ) आठ अक्षरांचा असतो. मात्रागणवृत्तांत गण किंवा गट मोजण्याचें माप मात्रा हें असतें. उदाहरणार्थ, गीतगोविंदांतील पुढील काव्यांत प्रत्येक चरण १६ मात्रांचा आहे, त्या प्रत्येक चरणांत अक्षरांची संख्या मात्र वेगळी आहे. (मात्रा मोजण्याची पद्धति अशी आहे. ऱ्हस्व स्वर म्हणजे एक मात्रा व एक दीर्घ स्वर जे दोन मात्रा. ऱ्हस्व स्वरानंतर अनुस्वार, विसर्ग किंवा जोडाक्षर असल्यास तो ऱ्हस्व स्वर दोन मात्रा दाखवतो.)

विहितविशदबिसकिसलयवलया ।
जीवति परमिह तव रतिकलया ॥
मुहुरवलोकितमण्डनलीला ।
मधुरिपुरहमिति भावनशीला ॥

या कडव्यांमध्ये प्रत्येक चरणांत मात्रा सोळाच, पण अक्षरें मात्र अनुक्रमें पंधरा, चौदा, बारा व तेरा आहेत.

अक्षरगण व मात्रागण या वृत्तांच्या दोन प्रकारांतील भेद लक्षांत घेतला म्हणजे अक्षरगण हा प्रकार साहित्याला जवळचा व मात्रागण हा प्रकार संगीताला जवळचा कां याचा उलगडा होतो. मात्रागणवृत्तांत गण मोजण्याचें माप जी मात्रा तीच संगीतांतील ताल मोजण्याचें माप असते. संगीतांतील ताल व लयी या मात्रांवर बसवलेल्या असतात, अक्षरांवर नव्हे. त्यामुळे गायनाला योग्य अशी रचना मात्रागणवृत्तांत करणें व उलटपक्षीं मात्रागणवृत्तांत रचलेल्या गीतांना चाली बसवून तीं गाणें हें सोपीचें असतें. अक्षरगणवृत्त तालावर बसवणें हें वजनी मापानें घेतलेला पदार्थ आकारमानाच्या मापानें विकण्यासारखें कटकटीचें असतें. हा भेद ओळखून जयदेवानें आपलीं गीतें मात्रागणवृत्तांत रचलीं व तीं सरसहा गायिलीं जाऊं लागलीं. हें गीतगोविन्दाचें श्रेष्ठ वैशिष्ट्य होय.

जयदेवाच्या गीतांतील वृत्तरचना जशी गेयतेला अत्यंत पोषक आहे तशीच त्यांतील वर्णरचना आपल्या मधुर निनादानें कुशल नर्तकींच्या पायांतील नूपुरांच्या किणकिणाटाची आठवण करून देते. स्वतःच्या भाषेसंबंधी जयदेवानें काढलेले

यदि हरिस्मरणे सरसं मनो
यदि विलासकलासु कुतूहलम् ।
मधुरकोमलकान्तपदावलीं
शृणु तदा जयदेवसरस्वतीम् ॥

हे उद्गार अत्यंत सार्थ आहेत. गीतगोविन्दांतील वर्णरचना अतिशय कोमल व मधुर आहे व तींत स्वरांचे आरोहावरोह कलात्मक रीतीनें साधलेले आहेत. जयदेवाच्या वर्णरचनेचें सामर्थ्य इतकें प्रचंड आहे की एकहि

अक्षराचा अर्थ कळला नाही तरी केवळ उच्चारसुखास्तव, नादमाधुर्यामुळे व लयबद्धतेमुळे त्याच्या अष्टपदी नेहमी गुणगुणाव्याशा वाटतात व प्रत्येक वेळीं श्रवणसुखाचा गुणाकारच होतो ! हल्ली बोलपटसंगीताची मगरमिठी लोकांच्या गळयांना बसलेली आहे. गीतगोविन्दाचा योग्य प्रचार गायकांद्वारें झाला तर त्याची मिठी त्यापेक्षाहि घट्ट बसेल असें वाटतें. गीतगोविन्दांतील जवळ जवळ प्रत्येक ओळ जयदेवाच्या वर्णरचना-प्रभुत्वाची साक्ष देते. उदाहरणार्थ, वसंत ऋतूचें वर्णन करणाऱ्या पुढील ओळी पाहा—

ललितलवङ्गलतापरिशीलनकोमलमलयसमीरे
मधुकरनिकरकरम्बितकोकिलकूजितकुञ्जकुटीरे ।।
उन्मदमदनमनोरथपथिकवधूजनजनितविलापे ।
अलिकुलसङ्कुलकुसुमसमूहनिराकुलबकुलकलापे ।।

गीतगोविन्दाचें वैशिष्टय हें की त्यांत कुठेंहि शब्दालंकार साधण्याच्या भरांत, वर्णाची मधुर रचना करण्याच्या भरांत, अर्थाला गौणत्व आलेलें दिसत नाही. वर्ण जितके कोमल तितकाच अर्थहि मनोहर हें शब्दालंकारयुक्त काव्यांत क्वचित दिसणारें तारतम्य गीतगोविन्दांत सर्वत्र दिसतें.

## एक दोष

शृंगारप्रधान सर्वच संस्कृत काव्यांत कमी जास्त प्रमाणांत आढळणारा अश्लीलता हा दोष गीतगोविन्दांतहि आढळतो यांत आश्चर्य नाही. प्रारंभीं व शेवटीं केलेलें राधाकृष्णांच्या शृंगाराचें उत्तान वर्णन या दोषानें लिप्त झालेलें आहे. आजच्या भारतीय शिष्ट अभिरुचीला शृंगाराचें वर्णन डोळयांवाटें, चेहऱ्यावरून, भावदर्शक शब्दांद्वारें किंवा प्रेमिकाच्या देहाशीं फार संबंध नसलेल्या क्रियेद्वारें—उदाहरणार्थ, प्रेयसीच्या डोक्यांत किंवा प्रियकराच्या कोटावर फूल खोवणें, होणाऱ्या भावप्रदर्शनापुरतें मर्यादित असलेलें आवडतें. या मर्यादा ओलांडून तें वर्णन प्रेमिकांच्या शरीरांशीं अधिक संबंध असलेल्या क्रियांशीं खेळूं लागलें की तें आम्ही अश्लील मानतों. थोडक्यांत शारीरिक वर्णनें अश्लील, भाववर्णनें श्लील असा सामान्यतः आजचा भारतीय संकेत आहे. संस्कृत शृंगारिक काव्यें ज्या काळीं रचलीं गेलीं त्या काळीं या मर्यादेच्या पुष्कळ पुढे जाणारीं वर्णनें सदभिरुचीला संमत होतीं, म्हणूनच तशा वर्णनांचें प्राचुर्य त्या काव्यांत दिसून येतें. श्लीलाश्लीलतेचा प्रश्न शेवटीं समकालीन वातावरणाच्या व अभिरुचीच्या निकषावरच सोडवला जातो. हिन्दी–मराठी बोलपटांतील अश्लील दृश्यांना नांवें ठेवणारे अनेक लोक त्यापेक्षा कितीतरी पटीनें अधिक अश्लील दृश्यें असलेले इंग्रजी बोलपट आवडीने पाहतांना दिसत नाहीत काय ? भारतीय नायक–नायिकांचें चुंबन पडद्यावर दिसलें तर जे आकाशपाताळ एक करतील तेच लोक चुंबनहीन इंग्रजी बोलपट पाहूनहि हसतील. दोन्ही गोष्टींचें तारतम्य बोलपटांतील विशिष्ट वातावरणावरून ठरवलें जातें. हाच न्याय शृंगारिक संस्कृत काव्यांना लावला व तत्कालीन वातावरण लक्षांत ठेवलें तर त्यांतील अश्लीलता त्या काव्यांतील गुण पाहण्याच्या आड येणार नाही. हें जरी खरें असलें तरी संस्कृत काव्यांतील अनेक भाग आबालवृद्ध स्त्रीपुरुष वाचकांच्या सरसकट वाचनाला अयोग्य झालेले आहेत. गीतगोविन्दांतीलहि बराच भाग या अयोग्य वर्गांत मोडतो, हा या सुंदर काव्याचा एक मोठा दोष होय.

## गायकांकरिता

गीतगोविन्दाचें गायन सध्या प्रायः लुप्त झालेलें आहे. या काव्यांतील गीतें ललित शास्त्रीय प्रकारच्या गायनाचीं मोहक लेणीं आहेत. आधुनिक गायकांनीहि या गीतांचा गाण्यासाठी अवलंब करून त्या गीतांचें पुनरुज्जीवन करावें व मराठी, हिन्दी, इत्यादि भाषांतील गीतांमध्ये या सुंदर संस्कृत गीतांची भर घालून गायनकलेलाहि एक आगळी छटा आणावी.

# पुस्तकपरीक्षण 'माझें चिंतन'

## रा. ना. घाटोळे

आज लोकमान्य टिळक शताब्दीच्या बरोबरच परलोकवासी आगरकर ह्यांच्याहि शताब्दीचा योग जनतेने साधला आणि त्या निमित्ताने लोकमान्य व आगरकर ह्यांच्या विचारांचें व कार्याचें पुष्कळसें मूल्य-मापन होऊन विचाराला एक नवी चालना मिळालेली आहे. अशा वेळीं आगरकरांचे एक-विष्ठावंत-बुद्धि-वादी अनुयायी डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे ह्यांच्याहि 'चिंतना'चें परिशीलन करण्याचा सुयोग येत आहे. खरें पाहिलें तर सहस्त्रबुद्धे ह्यांनी आपल्या 'चिंतनां'तून जीं कांही विचाररत्नें जनतेस अर्पण केलीं आहेत त्यांचें यथायोग मूल्य ठरविणें ही गोष्ट कांही सावी नाही. असें म्हणतात की नैषध काव्य लिहून झाल्यावर श्रीहर्षानें तें काव्य आपले मामा मम्मट ह्यांस दाखविलें. तेव्हा मम्मटाने असा खेद प्रदर्शित केला की मी काव्य-प्रकाश लिहण्यापूर्वी हें काव्य अवलोकनांत आलें असतें तर बरें होतें, म्हणजे काव्यदोषाचीं उदाहरणें मला दुसरीकडे धुंडाळावीं लागलीं नसतीं. अगदी तसेंच जरी नाही तरी असें म्हणतां येईल की मोठमोठ्या चिंतन-शील विद्वानांच्या लिखाणांतहि तर्कदृष्ट्या किती विसंगति असूं शकते ह्याचा नमुना म्हणून हें पुस्तक दाखवितां येईल. परंतु तसें करावयाचें म्हटलें म्हणजे अर्थातच स्वतंत्र पुस्तक लिहावें लागेल. डाग सहज पडतो परंतु तो धुवून काढावयाला पुष्कळ वेळ व परिश्रम लागतो. म्हणून या पुस्तकाचें सविस्तर परीक्षण न करतां केवळ त्याचें स्वरूप दिसण्यापुरतेच विचार ह्या छोट्याशा लेखांत मांडावयाचे आहेत.

पुस्तक वाचून झाल्यावर प्रथम दर्शनींच दोन गोष्टी लक्षांत येतात. त्यांपैकी पहिली ही की आगर-करांच्या बरोबरच त्यांचे हे अनुयायीहि हल्लीच्या विज्ञानाच्या मानानें कैक शतकें मागासलेल्या मिल-स्पेन्सरच्या युगांतच रेंगाळत आहेत. कैक शतकें म्हटले म्हणून गैरसमज होण्याचें कारण नाही. काळ हा सापेक्ष असून त्याचें मापन निरनिराळया रीतीने होऊं शकतें, ही गोष्ट आता शास्त्रसंमत झाली आहे. अॅलेक्सीस कॅरेलने तर आपल्या पुस्तकांत शारीर घटनांवरून मनुष्याचें आयुर्मान (Physiological Age) देखील सांगितलें आहे. आगरकरांच्या युगापेक्षा, नुसती रसायन, पदार्थविज्ञान हीं शास्त्रेंच नव्हे तर जीवनाशीं संबंध असलेलीं सर्व शास्त्रें आता कोणीकडच्या कोणीकडे वाढलेलीं आहेत आणि ज्या बुद्धिप्रामाण्याचें समर्थन डॉ. सहस्रबुद्धे करूं पहात आहेत त्या बुद्धीचीच त्यांनी कशी रेवडी उडविली आहे ह्याचा डॉक्टर साहेबां-सारख्या विद्वानास पत्ता नसेल असें म्हणवत नाही.

दुसरी गोष्ट जी चटकन लक्षांत येते ती ही की डॉक्टर साहेबांस युरोपच्या इतिहासानें भारून टाकलेलें दिसतें. त्यामुळे त्या इतिहासाच्या चष्म्याशिवाय अन्य चष्मा त्यांच्या डोळयांस लागतच नाही. त्याचा परि-णाम साहजिकच असा झाला आहे की अलकेच्या १९६३ च्या दिवाळी अंकांत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी ह्यांनी ज्याप्रमाणे युरोपचा इतिहास अनेक दृष्टीने भारताच्या इतिहासाहून भिन्न आहे असें दाखविलें आहे त्याचप्रमाणे भारतीय संस्कृति, भारतीय समाज, भारतीय विज्ञान आणि भारतीय घटना ह्यांचें सुसंगत ज्ञान होण्यास आणि हृद्गत समजण्यास बुद्धीची कांही अभ्यासपूर्वक तयारी करावी लागते ह्याची त्यांना दादहि नाही व पर्वाहि दिसत नाही. "इतिहास-चिकित्सा, तज्जन्य कार्यकारणनिष्ठा आणि क्रांतिवृत्ति या इहलोकीच्या अभ्युदयाला अत्यंत उपकारक अशा

शवित आहेत" ( माझें चिंतन पृ. ९० ) हें डॉक्टर साहेबांचें म्हणणें सर्वस्वी खरें आहे. परंतु तशा त्या राष्ट्रदृष्ट्या उपयुक्त होण्यास चिकित्सक बुद्धि पूर्वग्रह-दूषित नसली पाहिजे हें उघड आहे. डॉक्टर साहेबांच्या सर्व चिंतनासंबंधी एक गोष्ट सहज लक्षांत येते की त्यांत कांही नवनिष्पत्ति आहे असें नाही. त्यांनी चिंतिलेले अनेक विचार गेल्या पाऊणशें वर्षांत पूर्व-पक्षरूपाने चांगल्या चांगल्या समर्थांकडून मांडले गेले आहेत व तेथेच त्यांचे उत्तरपक्षहि प्रसिद्ध झाले आहेत. परंतु न्यायमूर्ति वुड्रॉफने म्हटल्याप्रमाणे जें आपल्या बुद्धीस आकलन होऊं शकत नाही तें सर्वच खुळचट आहे. (what I do not understand is absurd) अशी धारणा घेऊन त्यांनी चर्वितचर्वण केलें आहे. त्यामुळे भारतीय घटनांची त्यांनी केलेली मीमांसा, भारताच्या चिरकाल दुर्दैवाचीं निदानें इत्यादि अगदी सौम्यपणे म्हणावयाचें झालें तर केवळ एकांगी म्हणजे अर्धवट झालीं आहेत. उदाहरणार्थ, संतकार्याचें मूल्यमापन करतांना त्यांनी देशाच्या सर्व दुर्दैवाचें खापर संतांच्या माथीं फोडण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु वस्तुस्थिति अशी आहे की संतकार्य सुरू होण्या-पूर्वीच देशाचा सर्वांगीण ऱ्हास झाला होता. म्हणजे ऱ्हासाचें कारण संतकार्य नसून दुसरेंच कांही तरी होतें. त्यांच्या विचारसरणीप्रमाणे संतांनी कांही केलें असेल तर हा ऱ्हास दूर करण्याचाच प्रयत्न केला. संतांचें कार्य यशस्वी झालें नाही असेंहि त्यांच्या म्हणण्याप्रमाणे घटकाभर मान्य केलें तरी देखील अशी गोष्ट संभवते की त्याचा दोष संतांकडे नसून परिस्थितीच्या भीषणते-कडे असेल. अशा रीतीने परिस्थितीची भीषणता उत्तम कार्याचाहि विघात करूं शकतें ह्याचें एक डॉक्टर साहेबांना समजेल असें साधें उदाहरण देतां येईल. त्यांच्या मताने आगरकरी कार्य व संप्रदाय हाच सर्व-तोपरी तर्कशुद्ध व शहाणपणाचा आहे. असें असूनहि आज पाऊणशें वर्षांमध्ये तो संप्रदाय जिवंत आहे असें म्हणण्यापलिकडे तो जास्त कांही कार्य कां करूं शकला नाही ?

डॉक्टर साहेबांच्या विचारसरणींतील एक मुख्य दोष असा आहे की बुद्धिप्रामाण्य आणि निष्ठा म्हणजे मनुष्याची बुद्धि व त्याच्या निष्ठा ह्यांची कधी संगति नसतेच असा त्यांचा सिद्धांत दिसतो. खरोखरच अशी परिस्थिति असेल तर योगी अरविंद, स्वामी विवेकानंद, लो. टिळक इत्यादि भारतवर्षांतील फार मोठमोठ्या बुद्धिमान लोकांची कीवच करावी लागेल. हे सारे लोक बुद्धिमान होते ह्याविषयी कुणी शंका घेईल असें वाटत नाही. त्याचप्रमाणे ते निष्ठावान होते, इतकेंच काय, परंतु आगरकरांइतकेच नव्हे तर सॉक्रेटीस-सारखे आपल्या निष्ठेकरता बलिदानास सिद्ध होते हीहि गोष्ट संशयातीत आहे; मग हें त्यांचें बलिदान डॉक्टर साहेब कोणत्या वर्गांत घालणार? ह्या संदर्भांत डॉक्टर साहेबांच्या लिहिण्यासंबंधी श्री. अप्रबुद्ध ह्यांनी काढलेले उद्गार सहज आठवतात. श्री. अप्रबुद्ध म्हणतात—"डॉ. सहस्रबुद्धे म्हणतात की धर्मासाठी, स्वार्थासाठी उन्नत भावनेने आत्मबलिदान करणारे, अनेक होऊन गेले आहेत. पण विवेकनिष्ठेकरता आत्मयज्ञ करणारे आगरकरच झाले. येथें आगरकरां-विषयीं वाद नाही. पण वरील लोक विवेकनिष्ठ नसतात, मनुष्याचीं मतें आणि विवेकनिष्ठा वेगळीं असतात, अथवा उदात्तभावनेने आत्मार्पण करणें हें मतास अनुसरून नसतें, असे कित्येक अद्भुत सिद्धान्त या लेखांत आहेत! त्यांनीच दिलेल्या उताऱ्यांत सॉक्रेटीस म्हणतो "तुमच्या पेक्षा मी माझ्या चित्तांत स्फुरणारी परमेश्वराची आज्ञाच जास्त प्रमाण मानीन!" असें उद्गारतांना तो बहुतकरून विवेक-भ्रष्ट झाला असावा! हा त्याचा परमेश्वर विवेक-विरुद्ध होता, हा डॉक्टर साहेबांचा शोधहि तर्क-शास्त्राच्या अभिनवपणाचा द्योतक आहे" (ब्राह्मण—एक राष्ट्रीय प्रश्न, पृ. २ प्रस्तावना)

डॉक्टर साहेबांनी आगरकरांना साक्रेटिसच्या सिंहासनावर नेऊन बसविलें आहे. त्याविषयी कुणास कांहीहि वाटण्याचें कारण नाही. तो एक भक्तीचा प्रकार म्हणून समजतां येईल. आगरकरांविषयी व त्यांच्या कार्याविषयी आमच्याहि मनांत अतिशय आदर आहे. हिंदुस्थानच्या नव्हे तरी महाराष्ट्राच्या इति-हासांत त्यांचें कांही निश्चित स्थान आहे हेंहि निर्विवाद आहे. तरी पण डॉ. सहस्रबुद्धे ह्यांच्या

भक्तीमुळे एका ऐतिहासिक घटनेची आठवण झाल्या-खेरीज राहत नाही. मराठी साम्राज्याची सर्व शक्ति इरेस घालून मशीर उल्मुल्काला पुण्यास आणल्यामुळे नाना फडणवीसाला अतिशय आनंद झाला; परंतु सवाई माधवरावांच्या चेहऱ्यावर मात्र फार खिन्नता दिसून आली. त्याचें कारण त्यांनी असें सांगितलें की यःकश्चित, मशीरउल्मुल्क ताब्यांत घेण्याकरता साम्राज्याची शक्ति खर्चावी लागली हें सामर्थ्याचें द्योतक नसून सामर्थ्याविषयीची कल्पना निकृष्ट झाल्याचें द्योतक आहे. ब्रिटिश सरकारच्या संरक्षणाखाली महाराष्ट्रांतील समाजाच्या विरोधक परिस्थितींत आगरकरांनी जो त्याग केला त्याची कांही किंमत निःसंशय आहे; परंतु तो त्याग एकवीसशें वर्षांच्या इतिहासांत अनन्य-साधारण वाटू लागणें हें कशाचें द्योतक आहे ?

'चिंतन' काराची एक तक्रार अशी आहे की युरोपमध्ये ज्या रीतीने ग्रंथलेखन झालें आणि त्या ग्रंथांची जोपासना झाली त्या रीतीने आपल्याकडे कधी झालेंच नाही, किंबहुना त्या गोष्टीचें महत्त्वच आपल्या लोकांना कळलें नाही. हा आक्षेप संतकार्य ज्या काळांत झाले त्यालाच अनुसरून असल्यास त्याला उत्तर देण्याचेंहि कारण नाही. स्वत्व राखून कसें बसें जगणें व आपली अस्मिता नष्ट न होऊं देणें हाच ज्या काळांतला मोठा पराक्रम, त्या काळांत ग्रंथलेखनाची अशी उपेक्षा होणें प्राप्तच होतें. त्यापूर्वीच्या काळा-संबंधी ही तक्रार असल्यास त्याचा विचार स्वतंत्रपणे करावा लागेल व ह्या लेखाच्या मर्यादेबाहेर ती गोष्ट होईल.

'चिंतना'च्या कांही विषयांसंबंधीं एवढें दिग्दर्शन केल्यानंतर त्यांच्या प्रतिपादनशैलीबद्दलहि थोडें लिहिणें अवश्य आहे. म्हणून एक दोन उदाहरणांनी त्याचें दिग्दर्शन करूं.

'सरस्वतीची हेळसांड' या पहिल्याच लेखांत त्यांनी असें प्रतिपादिलें आहे की, समर्थांच्या पूर्वी निवृत्तिमार्गाचें फार प्राबल्य होतें. समर्थांनी तें नष्ट करून लोकांना राजकारणाचें, ऐहिक आकांक्षांचें व स्वराज्य साम्राज्याचें तत्त्वज्ञान शिकविलें. समर्थांच्या कार्यांत ह्या गोष्टी आहेत हें अगदी सूर्यप्रकाशासारखें स्पष्ट आहे. परंतु हेंच त्यांचें खरें कार्य असून त्याला त्यांच्या वाङ्मयांत अगदी गौण व अल्प असें स्थान मिळालें आहे असें ते म्हणतात. समर्थांच्या वाङ्मयांत शेकडों विषय आलेले आहेत. कारण तें वाङ्मय ग्रंथनिविष्ट असलें तरी पुष्कळसें प्रासंगिक आहे. दासबोधाच्या रचनेचा इतिहास प्रसिद्धच आहे, म्हणून त्याचा येथे पुनरुच्चार करण्याचें कारण नाही. ह्या अनेक विषयांची संगति कशी लावावी हेंहि खुद्द समर्थांनीच सांगितलें आहे. वेद बोलिला पूर्वपक्ष। मूर्खे तेथेचि लावी लक्ष। साधु आणि व्युत्पन्न दक्ष। त्यास हे न मने ॥ ७।६।२७) ही खुद्द समर्थांची शिकवण बाजूला सारून त्यांच्या कार्याचें व आदेशाचें हवें तें रहस्य काढतां येईल. परंतु डॉक्टर साहेबांस आवडो अथवा न आवडो ते म्हणतात त्याप्रमाणे आपलें कार्य कवीच नव्हतें असें समर्थांनी मात्र निःसंदिग्ध शब्दांत सांगितलें आहे. आपलें खरें कार्य "मुख्य हरिकथा निरूपण" हें असून ह्या साध्याचें साधन म्हणून प्रपंच व राजकारण ह्याचें महत्त्व आहे असें त्यांनी वेळोवेळीं सांगितलें आहे. "मुख्य हरिकथा निरुपण। दुसरें तें राजकारण।" असें त्यांनी कां म्हटलें आहे ? राजकारण हेंच माझें खरें कार्य आहे असें उघड म्हणण्यास त्यांना कसली लाज होती ? का सर्व प्रकारच्या सुरक्षित परिस्थितीमध्ये डॉक्टर साहेबांसारख्या मनुष्याला जें बोलण्याचें धैर्य होतें तें मराठी राज्याचें उदक हातावर घेऊन राजध्वजाकरता लंगोटी अर्पण करणाऱ्या ह्या फकिराला नव्हतें ?

पूर्वग्रंथांचें परिशीलन करून त्यांचें तात्पर्य काढण्याची डॉ. सहस्त्रबुद्धे ह्यांची करामत खरोखरच अपूर्व म्हटली पाहिजे. भगवद्गीतेच्या अभ्यासावरून त्यांनी असा निष्कर्ष काढला आहे की श्रीकृष्ण हा अत्यंत मोठा व्यवहारपंडित होता. आणि हे ह्यांचें म्हणणें खरें आहे; परंतु तो युटिलिटेरियन अथवा प्रॅग्मटिस्ट छापाचा होता म्हणजे तो केवळ तेवढाच होता हें म्हणणें अगदीच एकांगीपणाचें व असंबद्ध आहे. समर्थ काय किंवा श्रीकृष्ण काय, ज्या भारतीय परंपरेंत वाढलेले होते तिचें एक व्यवहार पांडित्य असें आहे की "अधिकार तैसा करूं उपदेश।"

आणि हें लक्षांत ठेवूनच त्यांच्या एकंदर वर्तनाची व वचनांची संगति लावावी लागते; नाहीतर तो समर्थांच्या वर उद्धृत केलेल्या पूर्व परिस्थितींत पडतो. अर्थातच डॉक्टर साहेबांच्या ह्या 'चिंतनां' तहि नवीन असें कांहीच नाही. हे सर्व वादविवाद पूर्वी होऊन गेलेलेच आहेत. 'समाजाचें कल्याण हाच धर्म होय' अथवा 'धर्म हें समाजनिरपेक्ष तत्व नव्हे' ह्या गोष्टीहि निर्विवाद आहेत. कारण धर्म हा मनुष्यांनी आचरण करण्याकरता आहे. तेव्हा तो समाजनिरपेक्ष असूंच शकत नाही. हें एखादें लहान पोरहि समजूं शकेल. परंतु लोकसंग्रह, कल्याण, धर्म इत्यादि शब्द असे आहेत की, निरनिराळ्या ठिकाणीं त्याचे निरनिराळे अर्थ येतात. म्हणून तेवढ्यावरून जर कोणी असें भासवील की त्याच्या स्वतःच्या बुद्धीला वाटेल तेंच कल्याण, व त्या कल्याणापेक्षा दुसरा कांही धर्म श्रीकृष्ण जाणत नव्हता, तर ती गोष्ट "मुखमस्तीति वक्तव्यम्" ह्याच सदरांत घालावी लागेल. ह्याची जाणीव असल्यामुळेच की काय कोण जाणे पण श्रीकृष्णाचें मत सांगत असतां लेखकाने भगवद्गीतेची साक्ष कोठेहि घेतलेली नाही. आज तरी भगवद्गीता हेंच श्रीकृष्णाचें मत आहे असें विद्वन्मान्य आहे व सुदैवाने भगवद्गीतेचें रहस्य उघडें करून दाखविणारा 'गीतारहस्यां'सारखा एक ग्रंथहि मराठी भाषेंत लोकमान्यांसारख्या अधिकारी विभूतींनी लिहला आहे. त्या ग्रंथाचें परिशीलन डॉक्टरसाहेबांनी जर ती गोष्ट त्यांच्या विवेकनिष्ठेंत बसत असेल तर पुनः एकदा निर्मळ मनाने करावें अशी त्यांना नम्र सूचना करतों.

भारतवर्षाचा व भारतीय समाजाचा अनेक कारणांनी आज कैक वर्षें ऱ्हास झाला असल्यामुळे त्याच्या ठिकाणीं आज अनेक बाबतींत कित्येक न्यूनें उत्पन्न झालीं आहेत हें अक्षरशः खरें आहे व त्यापुढे कुणाहि देशाभिमानी पुरुषाचें हृदय तळमळणें साहजिक आहे. तशा प्रकारची तळमळ व कळकळ डॉक्टरसाहेबांच्या 'चिंतनां'त मूर्तिमंत दिसून येते; आणि ह्याबद्दल कोणालाहि आनंद झाल्याखेरीज राहणार नाही. परंतु ह्या तळमळीचें पर्यवसान अनेक प्रकारच्या न्यूनगंडांत झालेलें पाहून थोडासा खेदहि उत्पन्न होतो. त्यांची भाषा, साधी सरळ, प्रतिपाद्य विषयाला एकदम हात घालणारी व सडेतोड आहे. 'चवथ्या दशांशाच्या दक्षते'सारख्या त्यांच्या उद्बोधक सूचना कोणासहि मान्य होतील. परंतु तेवढ्याकरता भारताने आपली परमार्थवृत्ति अथवा अध्यात्मवृत्ति ही अजिबात सोडून दिली पाहिजे असें ठरत नाही. सोव्हिएट रशियावर त्यांनी जें चिंतन केलें आहे तेंहि व्यासंगपूर्ण व मार्मिक आहे; परंतु त्यावरूनहि भारताची खरी अस्मिता कोणती आणि ती अस्मिता टिकवून ऱ्हासांतून वर यावयाचें म्हटलें तर भारताने काय केलें पाहिजे ह्याविषयी विधायक सूचना कांहीच मिळत नाही. त्यांच्या साऱ्या चिंतनाचा आस्थेवाईक वाचकांच्या मनावर एकच परिणाम घडतो आणि तो म्हणजे हा की भारताचा जो आजपर्यंत विनाश झाला तो जीवनाच्या अनेक अंगांसंबंधी त्याने जीं भ्रामक मूल्यें उराशीं बाळगलीं त्याच्यामुळे झाला. त्यांच्या मतें हीं मूल्यें टाकून दिलीं पाहिजेत. सुप्रसिद्ध लेखक वि. स. खांडेकर ह्यांनी कांही दिवसापूर्वी 'केसरी'तील आपल्या एका परीक्षण लेखांत म्हटल्याप्रमाणे, जुनीं मूल्यें आता बहुतांशीं नष्ट झालेलीं आहेत, त्यांच्या जागीं नवीं मूल्यें कोणतीं घ्यावयाचीं हाच राष्ट्रापुढे खरा प्रश्न आहे व त्या दृष्टीने एवढ्या 'चिंतनां'तून वाचकांचे हातीं कांहीच लागत नाही असें म्हणणें भाग आहे. डॉक्टरसाहेबांनी रंगविलेलें श्रीकृष्णाचें सारें चित्र खरें धरलें तरी ह्या खऱ्याखोट्यासारख्या साध्या गोष्टीपासूनहि समाजकल्याणाच्या दृष्टीने मूल्यमापन कसें करावें हाच खरा प्रश्न आहे व त्याचें उत्तर कोठेच नाही. श्रीकृष्णाचें अनुकरण करून सामान्य बुद्धीचा मनुष्य व्यवहारांत वागू लागला तर आमची खात्री आहे की तो अस्सल बदमाष ठरल्याशिवाय राहणार नाही. ही गोष्ट डॉ. सहस्रबुद्धे ह्यांना सम्मत आहे काय ?

अगदी थोडें म्हटलें तरी इतकें लिहावें लागलें. ज्या उत्कट कळकळीने डॉक्टरसाहेबांनी लिहलें आहे तिच्या प्रेरणेमुळेच इतकें निर्भीडपणे लिहावें लागलें. कांहीहि झालें तरी हल्लीच्या काळीं मूल्यमापनाचा प्रश्न उत्पन्न झाला असतां पूर्वपक्ष म्हणून कां होईना

(पुढील मजकूर पान २१ वर)

# औद्योगिक विकासाच्या योजना

प्रा. भा. ह. मुंजे

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अंतर्गत असलेल्या औद्योगिक विकासाच्या योजनांचें स्वरूप व त्यांचें महत्त्व कळून येण्यासाठी दुसऱ्या पंचवार्षिक योजनेची पार्श्वभूमि पाहणें आवश्यक आहे. स्वातंत्र्यप्राप्तीच्या अगोदर म्हणजे आगष्ट १९४७ पूर्वी इंग्रज सरकारने भारताच्या आर्थिक विकासाकडे सामान्यतः दुर्लक्षच केलें. परकी सरकारचें धोरण मुख्यतः भारतांत वसाहतीची अर्थव्यवस्था स्थापण्याचें होतें. भारताने इंग्लंडला उद्योगधंद्यासाठी लागणारा कच्चा माल व धान्यें पुरवावी आणि ह्यांच्या मोबदल्यांत इंग्लंडच्या कारखान्यांत तयार झालेला माल भारताने बापरावा, असें वसाहती अर्थव्यवस्थेचें स्थूल स्वरूप होतें. भारताची अर्थव्यवस्था इंग्लंडच्या भरभराटीला पूरक अशी ठेवण्यांत आली होती. सारांश, इंग्लंडला धान्य व कच्चा माल पुरविणारें कोठार व इंग्लंडच्या कारखानी मालाची बाजारपेठ अशी देशाची स्थिति झाली होती. यामुळे उद्योगधंद्यांच्याच नव्हे तर शेतीच्याहि विकासाकडे दुर्लक्ष झालें असल्यास नवल नाही.

या परिस्थितींत स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राष्ट्रीय सरकारवर देशाचा सर्वांगीण आर्थिक विकास घडवून आणण्याची मोठी जबाबदारी येऊन पडली. त्यांत महायुद्ध व देशाची फाळणी ह्यामुळे आणखी गुंतागुंत निर्माण झाली. राष्ट्रीय सरकार सत्तारूढ झाल्यानंतर वाढलेल्या किंमती, अन्नधान्यें व कापूस, ज्यूट इ. कच्चा माल ह्यांची कमतरता आणि उद्योगधंद्यांचा मागासलेपणा ह्या परिस्थितीशीं सामना देण्याचा भीषण प्रसंग सरकारवर आला. परंतु सरकारने न डगमगतां थोडें स्थिरस्थावर होतांच पहिली पंचवार्षिक योजना आखली आणि आर्थिक विकासाचा श्रीगणेशा केला. अन्नधान्यें व कच्चामाल ह्यांच्या बाबतींतील स्वयंपूर्णता लोकजीवनाच्या सुरक्षिततेची व देशाच्या आर्थिक विकासाची प्राथमिक व पायाभूत गरज आहे हें ओळखून पहिल्या पंचवार्षिक योजनेंत शेतीला प्राधान्य दिलें आणि शेतीच्या विकासासाठी शेती, पाणीपुरवठा, पूरनियंत्रण इ. कार्यांवर एकूण २३ अब्ज ५६ कोटी रुपयांपैकी ७ अब्ज ५८ कोटी रुपये म्ह. शेंकडा ३२.१ खर्च करण्याचें ठरविलें होतें. लहानमोठे उद्योगधंदे व खाणी ह्यांच्या विकासासाठी १ अब्ज ७९ कोटी म्हणजे फक्त शेंकडा ७.६ खर्च करण्याची योजना होती.

प्रथम पंचवार्षिक योजना बव्हंशीं यशस्वी झाल्यामुळे अन्नधान्यें व कच्चामाल ह्यांचा प्रश्न पूर्णतया जरी नव्हे, तरी बऱ्याच प्रमाणांत सुटला. यामुळे आर्थिक विकासाचा दुसरा टप्पा—म्हणजे उद्योगधंद्यांचा विकास—गाठण्यासाठी अवकाश मिळाला. आणि दुसरी पंचवार्षिक योजना त्या दृष्टीनेच तयार करण्यांत आली. या योजनेंतील औद्योगिक विकासाच्या योजनांचा विचार करण्याच्या अगोदर संपूर्ण योजनेची

---

( पान २० वरून )

त्याला उपयोगी पडतील असे विचार मोठ्या आवेशयुक्त भाषेंत जनतेसमोर मांडण्याबद्दल कोणीहि डॉक्टर साहेबांचें अभिनंदनच करील आणि त्यांच्या 'चिंतना'चें स्वागत करील.

[ 'माझें चिंतन'—ले. डॉ. पु. गो. सहस्रबुद्धे; प्रकाशक—न. शं. कुलकर्णी, S. T. C.; T. D., दी टीचर्स आयडियल पब्लिशिंग हाऊस लि. ७७, शनिवार पेठ, पुणें २. ]

उद्दिष्टें व तिचें सामान्य स्वरूप लक्षांत घेणें आवश्यक आहे. आर्थिक विकासाची योजना आखतांना कोणत्या प्रकारच्या अर्थव्यवस्थेंत या योजना पार पाडावयाच्या आहेत ही मूलभूत गोष्ट प्रथम निश्चित करावी लागते. अर्थव्यवस्थेचे मुख्यतः दोन प्रकार आहेत, एक भांडवलवादी अर्थव्यवस्था व दुसरी समाजवादी अर्थव्यवस्था. भांडवलवादी अर्थव्यवस्थेंत उद्योगधंद्यांची मालकी व त्यांचें नियंत्रण पूर्णतया खासगी व्यक्ति व संस्था ह्यांच्या हातांत असतें. समाजवादी अर्थव्यवस्थेंत तो मालकी व नियंत्रण समाजाची प्रतिनिधिभूत संस्था म्हणून सरकारकडे असतें. दुसरी पंचवार्षिक योजना आखतांना समाजवादी अर्थव्यवस्था स्थापन करणें हें सरकारचें अंतिम ध्येय आहे अशी घोषणा करण्यांत आली. स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी भांडवलवादी अर्थव्यवस्था भारतांत प्रचलित होती. राष्ट्रीय सरकारने सरकारी मालकीचें उद्योगधंद्यांचें क्षेत्र वाढवावयास प्रारंभ केला. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत मिश्र अर्थव्यवस्था अस्तित्वांत आली. या व्यवस्थेंत खाजगी संस्थांबरोबरच सरकारकडेहि कांही धंद्यांची मालकी असते आणि कांही धंद्यांत तर सरकार व खासगी भांडवलदार ह्यांची भागीदारी असते. यापुढे सरकारी मालकीचें क्षेत्र वाढत जाणार, असाच निष्कर्ष सरकारी घोषणेवरून निघतो. या ध्येयाला अनुसरून दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत जास्त भर सरकारी मालकीच्या उद्योगधंद्यांवर दिला आहे.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचीं मुख्य उद्दिष्टें चार आहेत. पहिलें उद्दिष्ट राष्ट्रीय उत्पन्नांत सुमारें २५ टक्क्यांनी वाढ करणें हें आहे. उद्योगधंद्यांचा—विशेषतः मूलभूत व अवजड उद्योगधंद्यांचा—विकास जलद घडवून आणणें हें दुसरें उद्दिष्ट आहे. रोजगार मिळण्याच्या सोयी वाढवून बेकारी पुष्कळ प्रमाणांत नाहीशी करणें आणि उत्पन्न व संपत्ति तसेंच आर्थिक सत्ता ह्यांच्या वाटणीची विषमता कमी करणें हीं उरलेलीं उद्दिष्टें आहेत. या उद्दिष्टांवरूनच औद्योगिक विकासाला दुसऱ्या योजनेंत अतिशय महत्त्व दिलें आहे, हें सहज लक्षांत येतें.

दुसऱ्या योजनेवर एकूण ४८ अब्ज रुपये सरकार खर्च करणार आहे. यांपैकी ८ अब्ज ९० कोटि रुपयें म्हणजे १९ टक्के औद्योगिक विकासाच्या वाट्यास आले आहेत. या रकमेची विभागणी अशी आहे—मोठे उद्योगधंदे ६१७ कोटी रु., खाणी ७३ कोटी रु. व ग्रामोद्योग नि छोटे उद्योगधंदे २०० कोटी रु. औद्योगिक विकास करावयाचा म्हणजे मालाची नेआण करण्यासाठी वाहतुकीच्या साधनांची वाढ करणें आवश्यकच आहे. वाहतुक व दळणवळणाच्या विकासासाठी १३ अब्ज ८५ कोटी रु. राखून ठेवले आहेत. यांपैकी रेल्वेवर ९०० कोटि व रस्त्यांवर २४६ कोटी खर्च व्हावयाचे आहेत.

औद्योगिक विकासाला प्राधान्य देण्यांत आलें तरी शेतीच्या विकासाकडे दुर्लक्ष झालें नाही हें ध्यानांत बाळगावयास पाहिजे. शेतीसाठी ५६८ कोटी, पाणीपुरवठा ३८१ कोटी, पूरनियंत्रण १०५ कोटी याप्रमाणे एकूण १० अब्ज ५४ कोटी रुपये शेतीच्या विकासासाठी खर्च होणार आहेत. विजेच्या उत्पादनासाठी ४२७ कोटी रु. निश्चित केले आहेत. विजेचा उपयोग शेती आणि उद्योगधंदे ह्या दोन्हींच्याहि विकासासाठीं होणार आहे. सामाजिक कार्यासाठी ९४५ कोटी रुपये मंजूर झाले आहेत.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचा समाजवादी दृष्टिकोन, तिचीं उद्दिष्टें व सामान्य रूपरेषा पाहिल्यानंतर आता तिच्यांतील औद्योगिक विकासाच्या योजनांचा तपशीलवार विचार करणें क्रमप्राप्त आहे. औद्योगिक विकासाच्या कार्यक्रमांत लोखंड व पोलादाच्या धंद्याचा पहिला क्रमांक लागतो. कारण कोणत्याहि उद्योगधंद्यासाठी यंत्रें व अवजारें ह्यांची जरूर भासते. ह्यांचा पुरेसा पुरवठा करण्याच्या दृष्टीने लोखंड व पोलादाच्या मूलभूत धंद्याचा विकास करणें आवश्यकच आहे. याकरिता पोलादाचे तीन नवीन कारखाने काढण्याचें निश्चित केलें आहे. रूरकेला येथे १२८ कोटी रुपयांचा, मध्यदेशांत भिलई येथे ११० कोटि रुपयांचा, व पश्चिम बंगालांत दुर्गापूर येथे ११५ कोटि रुपयांचा याप्रमाणे या तीन कारखान्यांचा तपशील आहे. प्रत्येक कारखान्याची उत्पादनशक्ति अंदाजें १० लक्ष टन राहील. याचबरोबर म्हैसूर पोलाद कार-

खान्याची उत्पादनशक्ति १ लक्ष टनांनी वाढविण्याची व्यवस्था केली आहे.

पोलादाचें उत्पादन झाल्यानंतर त्याचा उपयोग करून लहानमोठीं यंत्रें व अवजारें करण्याचे कारखाने निघाले पाहिजेत हें ओघानेच आलें. चित्तरंजन येथें इंजिनें तयार करण्याचा कारखाना पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत स्थापन झाला आहे. पुढील पांच वर्षांत त्याची उत्पादनशक्ति १२० पासून ३०० इंजिनां-पर्यंत वाढविण्याची योजना करण्यांत आली आहे. याच्या जोडीस रेलवेचे डबे व सुटे भाग तयार कर-ण्याचा पेराम्बुर इंटिग्रेटेड कोच फॅक्टरी नांवाचा कारखानाहि पेराम्बुर येथे काढण्यांत आला आहे. १९५९ नंतर या कारखान्यांतून ३५० डबे तयार होतील असा अंदाज आहे. विजेची यंत्रसामुग्री व यांत्रिक अवजारें ह्यांच्या उत्पादनासाठीं जवळ जवळ ३० कोटि रुपये खर्च करण्याचें ठरलें आहे.

दक्षिणेंतील कोळशाची टंचाई लक्षांत घेऊन दक्षिण अर्काट लिग्नाईट योजना आखली आहे. हिच्या-वर जवळपास ७० कोटि रु. खर्च होतील. या योज-नेमुळे दरवर्षी ३५ लक्ष टन लिग्नाईट खाणींतून काढला जाईल व त्याचा उपयोग मुख्यतः वीज व नैट्रोजन खतें ह्यांच्या उत्पादनासाठी होईल.

शेतीच्या विकासासाठी आवश्यक असणाऱ्या खतांची निर्मिति करण्याच्या उद्देशाने सिंद्री येथील कारखान्याशिवाय नानगल व रूरकेला येथे दोन खतांचे कारखाने काढण्यांत येणार आहेत.

रेलवेप्रमाणेच जहाज बांधणीच्या धंद्याचा विकास करण्याचीहि तरतूद दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत केली आहे. विशाखापट्टण येथे एक नवीन गोदी बांधण्यांत येणार असून जहाजें बांधण्याच्या कारखा-न्याचा व्याप वाढविण्यांत येणार आहे.

या मोठ्या उद्योगधंद्यांशिवाय मध्यम प्रमाणाचे कारखानेहि स्थापण्यांत येणार आहेत. या कारखान्यांतून डी. डी. टी., पेनिसिलीन, स्ट्रेप्टोमायसीन, कागद वगैरे तयार होतील.

केवळ यंत्रें, कारखाने इत्यादि तयार केल्याने औद्योगिक विकास होऊं शकत नाही. त्यांचा योग्य वापर करणारे तंत्रज्ञ व कुशल कारागीर देखील हवे असतात. उच्च दर्जाचे तंत्रज्ञ निर्माण करण्यासाठी जर्मनी, रशिया, इंग्लंड इ० राष्ट्रांशीं भारतीयांना तांत्रिक शिक्षण देण्यासंबंधी करार करण्यांत आले आहेत.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत सरकारनें मोठ्या उद्योगधंद्यांसंबंधी कोणत्या योजना आखल्या आहेत याचें दिग्दर्शन केलें. पण या कालावधींत भारतांत मोठ्या उद्योगधंद्यांचा विकास किती होईल याची कल्पना केवळ सरकारी योजनांवरून होऊं शकणार नाही. कारण याच काळांत खाजगी उद्योगधंद्यांचाहि कांही विकास झाला पाहिजे व होईल ही गोष्ट योजनेंत अपेक्षित धरली आहे. खाजगी क्षेत्रांतून मोठ्या उद्योग-धंद्यांत ५७५ कोटि रुपये गुंतविले जातील असा अंदाज आहे. पोलाद, सिमेंट, पेट्रोलियम, प्लास्टिक, कागद, साखर, वनस्पति, कापड इत्यादि धंद्यांत ही वाढ होईल अशी अपेक्षा आहे.

लहान उद्योगधंद्यांचाहि विचार केल्याशिवाय औद्योगिक विकासाचें चित्र पूर्ण होऊं शकत नाही. भारताच्या आजच्या आर्थिक परिस्थितींत ग्रामोद्योग व लहान धंदे ह्यांना महत्त्वाचें व विशिष्ट स्थान आहे. औद्योगिक विकासाच्या काळांत तांत्रिक बेकारी वाढूं नये, लोकांना रोजगारधंदा उपलब्ध होऊन असलेली बेकारी कमी व्हावी, आणि विकेंद्रित अर्थव्यवस्थेच्या धर्तीवर उद्योगधंद्यांचा विकास व्हावा अशा तिहेरी उद्देशाने लहान उद्योगधंद्यांची विकास करण्याची कर्वे समितीने शिफारस केली होती. आणि तदनुसारच योजनेंतील कार्यक्रम ठरविण्यांत आला आहे. लहान उद्योगधंद्यांचा विकास करतांना सुधारलेलीं अवजारें व सुधारलेली उत्पादनाची तांत्रिक प्रक्रिया ह्यांवर विशेष भर दिला आहे. सहकारी तत्त्वांचा अवलंब केल्यास लहान उद्योगधंद्यांचा विकास जलद, कमी खर्चांत व मोठ्या प्रमाणावर होऊं शकतो हें जाणून मालाच्या खरेदीविक्रीसाठी व उत्पादनासाठी देखील सहकारी समित्यांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग करून घ्यावयाचा आहे. दुसऱ्या योजनेंत सहकारितेसाठी ४७ कोटी रुपयांची तरतूद आहे. याचा फायदा शेती व

(पुढील मजकूर पान २८ वर)

# ग्रं थ स मा लो च न

## श्रीतिलकचरितम्

१९५६ हें वर्ष. लोकमान्य टिळकांच्या जन्मशताब्दीचें वर्ष. म्हणून त्यांच्या लोकोत्तर व राष्ट्रपावन चरित्राचें पुण्यस्मरण सर्व भारतीय जनतेने मोठ्या समारंभाने व उत्साहाने केलें यांत कांहीच आश्चर्य नाही. देशांत इंग्रज सरकारविरुद्ध असंतोष पसरवून भारतीय स्वातंत्र्याचा पाया भरण्यांत उभें आयुष्य वेचणाऱ्या ह्या देशभक्ताचा गुणगौरव आपल्या केन्द्रीय व प्रांतीय शासनांद्वारेंही औपचारिकपणें कां होईना पण केला गेला, हें महाराष्ट्राचें भाग्य होय. इतर स्वतंत्र राष्ट्रांत देखील तो झाला हें विशेष.

लोकमान्यांचें समग्र चरित्र यापूर्वी अनेक भाषांतून लिहिलें गेलें आहे. तरी जन्मशताब्दीनिमित्त लिहिलीं गेलेलीं दोन संस्कृत चरित्रें विशेष महत्त्वाचीं म्हणावीं लागतील. लोकमान्यांचे एके काळचे सहकारी व अनुयायी **लोकनायक** बापूजी अणे यांनी रचलेलें

---

(पान २३ वरून)

लहान उद्योगधंदे ह्यांना विशेषेंकरून मिळणार आहे. हातमाग, खादी, हातसडीचे तांदूळ, तेलघाणी, जोडे व चामडें कमावणें, गूळ आणि विभिन्न हस्तव्यवसाय ह्यांचा लहान उद्योगधंद्यांत समावेश केला आहे. ह्यांच्या विकासासाठी २०० कोटि रुपयांची व्यवस्था दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत केली आहे.

सारांश, देशांतील प्राप्त परिस्थिति व जनतेच्या आकांक्षा पूर्णतया विचारांत घेऊनच लहान व मोठ्या उद्योगधंद्यांच्या विकासाच्या योजना दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत आखण्यांत आल्या आहेत, असें म्हणावयास हरकत नाही.

( नागपूर आकाशवाणीच्या सौजन्याने )

काव्यमय चरित्र एक, व सोलापूरचे साहित्याचार्य वासुदेव शास्त्री बागेवाडीकर यांनी मुलांसाठी मुद्दाम लिहिलेलें सुबोध गद्यमय **'श्री तिलक चरितम्'** हें दुसरें.

श्री. बागेवाडीकर शास्त्री यांनी "आपल्या उपास्य देवतेची उपासना स्वतःला सहजसाध्य व प्रिय अशा प्रकारानें (म्हणजे देववाणी संस्कृत द्वारें) तिच्या प्रांगणांतील एका कोपऱ्यांत बसून केली आहे" निवेदनांत सांगितल्याप्रमाणे त्यांचा उद्देश "वीरपुरुषांचीं रोमहर्षक चरित्रें आपल्या देशांतील तरुणांच्या समोर मांडलीं पाहिजेत; त्यांनीच देशाचा विकास होईल." असा स्पष्ट आहे. टिळकांच्या आदर्शाप्रमाणेच संस्कृत भाषेचा सुबोधपणा व सरसपणा आधुनिक तरुणांना पटवावा हाहि एक हेतु हें चरित्र लिहिण्यामागें आहे असें निवेदनावरून दिसतें. "घनदाट अंधारांतून देखील तुडविलेल्या मार्गानें व शीघ्रगति वाहनाने रानावनांतून प्रवास करणारे लोक अनेक आढळतात; पण त्याच अरण्यांत एकाकीपणें कष्ट करून नवी वाट निर्माण करणारा विरळाच !" आणि साहित्याचार्यांच्या मतें हाच लोकमान्यांच्या चरित्राचा विशेष होय. अनेकांस कठिण वाटणाऱ्या संस्कृत भाषेचें माध्यम स्वीकारून देखील "वाक्यांत संधि न करून, लांबलांब समास टाळून, व अपरिचित अशीं क्रियापदादिकांचीं रूपें न वापरतां" सोपेपणा आणला हे शास्त्रीबुवांनी तरुण मुलांच्या दृष्टीने योग्यच केलें आहे. अशा रीतीने लेखकाचे दोन्ही उद्देश पूर्णपणें सफल झाले म्हणावयास प्रत्यवाय नाही.

या छोटेखानी चरित्रांत चार प्रकरणें आहेत. प्रथमांत जन्मापासून १८९५ पर्यंतचा वृत्तांत आला आहे; दुसऱ्यांत, राजद्रोहाच्या खटल्यापासून तो काशी येथील राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनापर्यंत हकीकत

सांगितली आहे; तिसऱ्यांत कलकत्ता कांग्रेस ते मण्डालेंत कारावासाचा इतिहास दिला आहे; चौथ्यांत, तेथून मुक्ततेनंतर अखेरच्या आजारापर्यंतचें वर्णन आहे. त्यांतहि अमृतसरच्या अधिवेशनाचा इतिहास सविस्तर दिला आहे. ह्या प्रतिपादनांत टिळकांचें निष्कलंक चारित्र्य, निर्भीड मतप्रतिपादन, समंजस निःपक्षपातीपणा व अद्वितीय राजकारणपटुत्व ठसठशीतपणें प्रतिबिंबित झालें आहे, एकूण सुटसुटीत पण समतोल, साधें पण स्फूर्तिदायक असें हें चरित्र वठलें आहे. दत्तोपंत पोतदारांनी अभिप्रायांत म्हटल्याप्रमाणें "टिळकांचें राजकीय स्वरूपच यांत विशेषेंकरून प्रगट झालें आहे" म्हणूनच लोकनायकांनी "अयं ग्रंथः राजनीतिजिज्ञासूनां पठनाय उचितः" अशी शिफारस प्रस्तावनेंत केली आहे. टिळकांचें संशोधनकार्य, साहित्यनिर्मिति, इतर सामाजिक चळवळी यांचा फक्त उल्लेख या चरित्रांत आला आहे, विस्तृत विवरण नाही. ही एकमात्र उणीव येथे भासते. एकंदरींत पुस्तक सामान्य जनांस देखील वाचनीय वाटेल.

भाषाशैली सरस, सरल व हृदयग्राही आहे. 'प्रयोक्तानि' (पृ. २०), विदधातुं (पृ. २०), समाहूयते इव भाति", इ. चुकीचे प्रयोग दुर्लक्ष्य झाल्यामुळें राहून गेले असावेत. व्यायाम व सक्तमजूरीची शिक्षा या दोन्ही अर्थानें 'श्रम' (पृ. २ व १२), वंदूक या अर्थानें "प्रक्षेपणी" व "लोहनाडी" (पृ. ४४), तारेसाठी (Telegram) 'तंत्री', अफूसाठी 'अफेन' (पृ. ३१); "निष्पेषण लेख्य" इ. संस्कृत-पर्याय विचारणीय आहेत.

छपाई बरी आहे, पण मुद्रितें घाईनें तपासलीं गेलीं असावीत, म्हणूनच शुद्धिपत्राशिवायहि पुष्कळ चुका राहून गेल्या आहेत. संबंधी वाक्यापुढे पूर्णविराम दिले आहेत, ते बरोबर वाटत नाहीत. अवतरण चिन्हांचा वापरहि अनेकदा चुकीचा झाला आहे-विशेषतः अवतरण बन्द करतांना. अर्ध्या पुस्तकांत सनांची संख्या "रसबाणवसुभूमिते" (१८५६) अशी शब्दांत दिली आहे. पण अखेर अखेरमात्र नुसते आकडेच दिलेले दिसतात. किंवा "नवैकनवैकमिते" (१९१९) अशी रूक्ष-संकेतशून्य झाली आहे, आर्टपेपरच्या मुखपृष्ठावरील लोकमान्यांचें छायाचित्र सुंदर आहे. किंमत १२ आणे माफकच म्हणावी लागेल.

दि. वि. ब.

## मऱ्हाटी लावणी

[लेखक—मधुकर वासुदेव धोंड, प्रकाशक—वा. पु. भागवत, मौज प्रकाशन लि०, खटाववाडी, गिरगांव मुंबई ४, किं. ६ रु.]

मराठ्यांच्या काळांत झालेल्या अनेक शाहिरांच्या लावण्यांपैकी निवडक अशा एकसष्ट लावण्यांचा संग्रह या पुस्तकांत केला असून त्याला ७२ पृष्ठांनी विवेचक प्रस्तावना जोडली आहे. यापूर्वी लावण्यांचे संग्रह तुरळकपणे प्रसिद्ध झाले असले तरी त्यांत लावण्यांची पाठशुद्धि अर्थानुसंधानानें पारखून घेतली नव्हती. प्रस्तुत पुस्तकांत अर्थ व छंद या दोन्ही दृष्टींनी पाठ शुद्ध करून घेतले आहेत.

लावणी म्हटली की 'उत्तान शृंगारात्मक ग्राम्य गीत' अशी जी आपली समजूत झालेली असते ती अपुरी असून लावणीमध्ये अन्य रस असूं शकतात व शृंगारहि नागरपणे व प्रौढ भाषेंत व्यक्त झालेला असतो असें प्रस्तावनेंत श्री. धोंड यांनी साधार सिद्ध केलें आहे. पाठचिकित्सेबरोबरच लावणीची व्याख्या, मूल्यमापन, लावणीवाङ्मयाच्या वेळची राजकीय, सामाजिक व धार्मिक स्थिति, लावणीकार आणि संत व पंडित कवि, लावणीचा उगम व विकास आणि लावणी वाङ्मयांतील काव्य, या विषयांचा परामर्श लेखकांनी मोठ्या समतोलपणे घेतला आहे. लोकगीतांची एकांगी तरफदारी करणाऱ्याकडून संत व पंडित कवींचा अधिक्षेप जो कधी कधी केला जातो तो चुकीचा असल्याचेंहि श्री. धोंड यांनी प्रतिपादन केलें आहे तें यथार्थ आहे. बहुतेक लावणीकार हे राजपुरुषाचे आश्रित आणि म्हणून हांजी हांजी व तोंडपुजेपणा करणारे होते. त्यामुळे त्यांच्या गीतांची नैतिक पातळी खालची होती हें तर असोच, पण स्वार्थीपणानें दुसऱ्या बाजीरावासारख्याला त्यांनी ईश्वराच्या पंक्तीस नेऊन बसविल्यामुळे, ऐतिहासिक पुराव्याच्या दृष्टीनेंहि

लावण्या कुचकामी ठरल्या आहेत. कांही असो, पण लावणी हा गेय प्रकार सामुदायिक करमणुकीचा व कधी कधी स्फूर्तीचा विषय असल्यामुळे त्यांत कलात्मकता आलेली आहे. ज्ञानेश्वर, एकनाथ इत्यादि कवींनी केलेली कांही प्रतीकात्मक स्वरूपाची अध्यात्मपर काव्यरचना ही 'मऱ्हाटी लावणी'च्या पूर्वजांच्या ठिकाणीं आहे असे लेखकाचें मत दिसतें. प्रस्तुत संग्रहांत अध्यात्मपर, उपदेशपर, श्रीकृष्णभक्तिपर, अशा ज्या लावण्या आहेत त्यांची जात निःसंशय स्वतंत्र आहे. पण इतर श्रृंगारपर लावण्या आहेत त्यांत सर्वतोपरि रूढ नीतिनियमांना विपरीत भासणाऱ्या स्वैर क्रीडांचा मनसोक्त अंगीकार शाहिरांनी केला असल्यामुळे त्या वेगळयाच श्रोतृसमुदायासाठी रचल्या असल्या पाहिजेत असें म्हणावें लागतें.

कित्येक लावण्यांच्या शेवटीं प्रभाकर, महादेव, गंगू हैबती इत्यादि तीन तीन नांवें आलीं आहेत. त्यांपैकी एक रचयिता व बाकीचे म्हणणारे व साथीदार आहेत. पण लावणीच्या उल्लेखावरून कोण काय आहेत त्याचा नीट बोध होत नाही. संपादकांनी कवीचें नांव जाड टाइपांत छापलें आहे हें खरें; पण तोच कवि तेथें कां मानावा याला कारण दिलें असतें तर बरें झालें असतें.

लावणी वाङ्मयांत देखील मराठी भाषेचें सामर्थ्य किती आणि केवढें आहे याची प्रतीति वाचकास आल्यावाचून राहात नाही.

रसिकता आणि संशोधनप्रीति या दोन्हींचा यथोचित समन्वय असलेलें प्रस्तुत पुस्तक प्रसिद्ध केल्याबद्दल आम्ही लेखक व प्रकाशक यांचें अभिनंदन करतों.

## हुतात्मा बाबूराव थोरात

(ले०—आवळे-सरदेशपांडे, प्रकाशक, साहित्य सेवा मंडळ, चांदा. मू. १० आणे.)

गोवा येथील सत्याग्रह संग्रामांत हुतात्मा झालेले चंद्रपूर येथील एक तरुण श्री. थोरात यांचें हें लहानसें चरित्र मोठ्या जिव्हाळ्याने लिहिलें आहे.

—पां. कृ. सा.

## पाऊस

[लेखक—ज्ञानेश्वर नाडकर्णी, मनीषा प्रकाशन, मूल्य २ रुपये]

१९५१-५२ सालीं सत्यकथा मासिकांत प्रसिद्ध झालेल्या इंग्लंडविषयक प्रवासवर्णनाने मराठी रसिकांना परिचित झालेले तरुण कथालेखक श्री. ज्ञानेश्वर नाडकर्णी यांच्या लघुकथांचा हा पहिला कथासंग्रह आहे. या अकरा कथांतील बहुतेक कथा १९५० ते १९५४ या अल्पशा कालावधींतल्या असून शेवटल्या चार कथा या खास दिवाळी अंकांत प्रसिद्ध झालेल्या दिसतात. दिवाळी अंकांतल्या प्रसिद्ध होणाऱ्या कथांचें स्वरूप हें बहुतेक आजकाल ठरल्यासारखें झालें आहे. तथापि एकाच वर्षांतल्या चार दिवाळी अंकांत या तरुण लेखकाच्या कथा याव्यात ही गोष्ट जशी त्याच्या शीघ्रलेखनाची तशीच त्याच्या लोकप्रियतेचीहि साक्ष पटविणारी ठरेल. या कथांतील बहुतेक पात्रें तरुण मध्यमवर्गांतील असून साधारणपणे वैवाहिक सुखदुःखाच्या व तारुण्यांतील उन्मादाच्या लाटांवर विहरतांना आढळतात. दुसरी लक्षांत घेण्याजोगी गोष्ट म्हणजे अकरा कथांपैकी जवळजवळ ४-५ कथांत तरी (अंगद, विश्वस्त, ताजवा, भेट, घुसफूस या कथांत) निवेदनाचीं सूत्रें 'मी' या व्यक्तीने हातांत घेतलेलीं दिसतात आणि कदाचित त्यामुळे या सर्व गोष्टींत एकप्रकारचा तोच तो पणा कांहीवेळ तरी वाचकाला जाणवल्याखेरीज राहत नाही. नाही म्हणायला या गोष्टींतील व्यक्तिरेखा आपल्या वैशिष्टयाची वाचकांना चांगली ठळक जाणीव करून देतात यांत शंका नाही.

'घुसफूस' मधील कारकुनांच्या जगांत वावरणारी पण स्वतःच्या कर्तृत्वाने आपल्या आकांक्षांचा दरवाजा खुला करणारी निर्मला भांडारे, 'विश्वस्त'मधील महात्मे कुटुंब, 'ताजवा'मधील विश्वनाथ व दमयंती, 'सावली'-मधील जोसफाईन हीं पात्रें अशा तऱ्हेचीं उदाहरणें होत. पण या कथानकांत वावरणारा 'मी' मात्र पदोपदीं असंतुष्ट, व्यथित आणि निराश दिसतो आणि हा आत्मनिष्ठेचा रोग जास्त बळावला तर कदाचित या तरुण कथालेखकाच्या लघुकथालेखनाच्या या वाढाळ

लतेला रोगटपणाची कीड लागेल की काय ही आशंका मनाला क्षणभर बेचैन केल्याशिवाय राहत नाही.

पण ही आशंका फार वेळ राहूं नये अशाहि एक दोन गोष्टी याच संग्रहांत पाहावयास मिळतात. अशा निराश गंभीरतेवर 'मालक' ही गोष्ट चांगला उतारा देईल तर पाऊस ही गोष्ट मनाला अंतर्मुख करील. पण या दोन्ही कथांहून सरस व वस्तुनिष्ठ चित्रणाचा सुंदर नमुना 'वल्कल' या गोष्टींत आढळेल. आपल्या एकुलत्या एक पुत्राच्या मृत्यूने गांगरलेले पण त्यामुळेच की काय सुनेशीं कन्याभावाने वागणारे अण्णा केळूसकर यांच्यावर या आधुनिक जीवनाने जो दारुण 'कन्या-विरहा'चा प्रसंग आणला तो नाडकर्णी यांनी कसा रंगविला आहे तें मुळांतच वाचकांनी पाहावें. म्हणजे त्यांच्या आत्मनिष्ठ निवेदनाइतकेंच किंबहुना त्याहून वस्तुनिष्ठ निवेदन किती सरस व सकस असतें याचा थोडासा प्रत्यय त्यांतून आल्याशिवाय राहणार नाही.

—भा. श्री. प.

## मिथिला

(लेखक—अरविंद गोखले, लाखाणी बुकडेपो प्रकाशन, मूल्य ३ रुपये)

दहा वर्षांपूर्वी मराठी वाचकांना थाटाचा नवा 'नजराणा' देणाऱ्या श्री. अरविंद गोखले यांचा हा दहावा लघुकथासंग्रह.

श्री. गोखले यांच्या कथाविश्वाचें प्रथमदर्शनीं लक्षांत येणारें वैशिष्टय म्हणजे त्यांच्या कथांचें वृत्ति-प्राधान्य. त्यांच्या कथांतील घटना काय किंवा व्यक्ति काय, येतात त्या 'हृदयाच्या अंतर्द्वंदयांत' लपलेल्या वृत्तींना जागृत करायला. आणि मग त्या वृत्तींचा खेळ आठवणींना बिलगत सुरू होतो. 'मिथिला' 'वेडी बाभूळ, 'वावटळ' 'एरुशा' यासारख्या कथांतून हा खेळ विशेष दिसतो.

'डाग' सारख्या कथेंत तर आठवणींचाच आधार विशेष. आपल्या सुखी संसारांत एका क्षणाच्या वासनेचा तैलबिंदु पसरविणाऱ्या कलावतीबाई घुमटकरांच्या मनाची अवस्थाच लेखकाला प्राधान्याने रंगवावयाची दिसते. ज्या व्यक्तींच्यामुळे हें सारें घडतें तो 'परदेशी' आहे आणि पुन्हा जीवनांत कधी न डोकावली नाही म्हणूनच ठीक. नाहीतर साध्या व उपेक्षित वाटणाऱ्या या घटनेला किती निराळा आशय आला असता, जीवनाला केवढी कलाटणी मिळाली असती ! पण लेखकाला तसें कांही करावयाचें नव्हतें. कारण त्यामुळे कथेंत 'घटनाप्राधान्य' विशेषत्वाने आलें असतें आणि 'घटनेचें ओझें' तर लेखकाला जडच जात असावें. भारावलेली वृत्ति हीच त्याच्या कथांची आधारभूमि व त्या वृत्तींवर संथ तरंगत राहणें हेंच त्यांच्या लघुकथांचें कार्य. पण यामुळेच पुष्कळदा कथेंतला 'सामाजिक आशय' लपून बसतो आणि कथेला एखाद्या स्वप्नाळू गूढरम्य अशा 'रोमँटेसिझम'ची छटा येते. १९४२ च्या लढयाची ध्येयरम्य पार्श्वभूमि असलेली 'मिथिला' घ्या किंवा गोऱ्या साम्राज्यवादाच्या सुखलालसेचें भंगलेलें स्वप्न प्रतीकत्वाने दाखवणारी 'एरुशा' पहा. दोघींच्याहि चित्रणांत अशीच गूढता आलेली दिसते.

कधी कधी मानवी जीवनांतील विसंगति तर कधी एखादी लोकविलक्षण कल्पना यांच्या आधारानें कथा नटविण्याचा लेखकाचा हव्यास दिसतो. 'नकार' मधील सदाफुलीचें चित्र क्षणभर का होईना व्यथित करतें तर 'शर्थ' मधील गीताबाईंचा नकार एक वेगळेंच विलक्षण सत्य सांगून वाचकाला भांबावून सोडतो. गीताबाईंसारख्या व्यक्तीने, एका साध्याभोळ्या अडाणी स्त्रीने लेखकाच्या 'कारुण्यवृत्ती'ची कशी मातीमोल अवस्था केली आणि त्याला क्षणभर दिङ्मूढ केलें ! पण ही गोष्ट वाचतांना गीताबाईच्या तोंडची 'संसारापेक्षा, मातृत्वापेक्षा, स्वातंत्र्य श्रेष्ठ' अशी भाषा ऐकली म्हणजे वाचकहि कमी दिङ्मूढ होत नाही.

लोकविलक्षण गोष्ट सांगण्याची ही हौस कधी आम्हाला निळया गुंफेंतल्या 'एरुशा'कडे घेऊन जाते तर कधी कोलारांकडे टक लावून नरदर्शनासाठी आसावलेल्या आभा सावंतला भेटविते. प्रथमवयसाकाळीं अंगनेच्या अंगप्रत्यंगावर उमटणारी आणि मनांत उकळणारी लावण्याची नव्हाळी 'आभा सावंत' या गोष्टींत वर्णिलेली आहे. लावण्याच्या नवनवतीचें वर्णन शब्दांकित करण्याचा चाळा पुष्कळ लेखकांच्या आव-

डीचा पण तितकाच नाजुक. सुकुमार शब्दांनाहि जेथें लज्जा वाटावी, ध्वन्यर्थानेहि जेथे मुकुलित व्हावें आणि 'जडताच गडे शोभते असा प्रसंग ये तदा' असें कविप्रतिभेला वाटावें अशी ही अवस्था. श्री. गोखले यांच्या कुशलतेवर मात करून हा प्रसंग अचपळपणे त्यांच्या हातून निसटून जातो आणि केवळ डोळ्यापुढे उभें राहतें तें आभाचें सुदृढ शरीर आणि आसावलेलें मन.

पण ही लोकविलक्षण गोष्टी सांगण्याची आवड आणि हें वृत्तिप्राधान्य अगदी वाया जातें असा याचा अर्थ नाही. कधी कधी या दोन्हींचा सुंदर मिलाफ 'कथ्थक', 'वेडी बाभूळ' आणि 'वावटळ' सारख्या कथांत पाहावयास मिळतो.

पण या दोन वैशिष्टयांत जेव्हा काव्यात्मतेची भर पडते तेव्हा लेखक 'एका अपरात्रीं—' सारखी सुंदर गोष्ट लिहून जातो. 'काळपुरुषानेहि क्षणभर निरखून पाहावें' असें तें दृश्य ! कठोर नियति आणि कोमल भावना यांच्या उभ्या आडव्या धाग्याने विणलेलें जणु सुंदर रेशमी दुकूलच !

—भा. श्री. प.

## मनाची मुशाफरी

(लेखक—प्रा. म. ना. अदवंत, ३५४, नवी पेठ, जळगांव पू. खा., मुद्रक व प्रकाशक : दा. त्र्यं. जोशी, बी. ए. (टिळक), चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ, पुणें २, किंमत २॥ रु.)

जळगावचे प्रा. म. ना. अदवंत यांचा हा दुसरा लघुनिबंध–संग्रह. यांत एकूण लघुनिबंध १४ आहेत व दोन लघुनिबंधांखेरीज इतर सर्वच दिवाळी अंकांच्या निमित्ताने लिहिले गेले आहेत.

गंभीर विषयसुद्धा खेळकर पद्धतीने मांडण्याची जी एक विशिष्ट शैली प्रा. अदवंत यांनी अंगिकारलेली आहे ती 'लघुनिबंध' या वाङ्मयप्रकाराच्या मूळ प्रकृतीला अनुसरूनच. प्रत्येक लघुनिबंधांत एक नवी दृष्टि देण्याचा प्रयत्न केला आहे व कांही निबंधांत तर तो कमालीचा यशस्वी झाला आहे. विशेषत: 'मनाची मुशाफरी', 'महिना अखेर', 'सुख पर्वताएवढें' आणि 'अहंकाराची प्रेरणा' ह्या चार लघुनिबंधांद्वारा मिळणारी जीवनविषयक दृष्टि सर्वस्वी नवी वाटते.

"आपण इतरांपेक्षा निराळे आहोंत या कल्पनेंतच माणसाच्या जीवनांतील नव्या नव्या प्रेरणा निर्माण होत असतात" किंवा "आम्ही चांदण्या रात्रीं विजेच्या दिव्याच्या कृत्रिम प्रकाशांत रमी खेळण्यांत रंगून गेलेलों असतों" हे किंवा असल्या प्रकारचे मनुष्यजीवनविषयक सिद्धान्त जसे मार्मिक आहेत तसेच ते ज्या सहजतेनें निबंधांत आणलेले आहेत ते सहजमनोवेधक आहेत; आणि हें साधतांना लिखाणांतील संयमाच्या मर्यादा मात्र उल्लंघिलेल्या नाहीत. "साधारण काळोख पडला असतांना समुद्रांतून दूरवरून प्रकाशाची रांग तरंगत येतांना दिसावी, आपणासमोर अधांतरीं ती उभी असतांना तिच्या प्रकाशकिरणांनी समुद्राच्या लाटांवर आकर्षक नृत्य करावें आणि कांही वेळाने ती रांग तशीच तरंगत जाऊन क्षितिजावर अदृश्य व्हावी..." हें आणि असल्या प्रकारचीं वर्णनें करतांना निरीक्षणाची सूक्ष्मता आणि प्रकृतींतील सौंदर्यशोधकता लेखकाचे ठिकाणीं आवश्यक नाहीत असें कोण म्हणेल ?

कांही निबंधांत पुनरुक्तीचा दोष आढळतो तर कांहींमध्ये प्रतिपादनांतील अट्टाहास प्रकर्षाने जाणवतो. हे क्षुल्लक दोष वगळल्यास निबंध उत्तम आहेत. "या संधिकाळांत ज्यांचें कर्तृत्व या वाङ्मयप्रकाराच्या विकासाला उपयोगी पडूं शकेल अशा हाताच्या बोटांवर मोजतां येण्याजोग्या लेखकांपैकी अदवंत हे एक आहेत" हा प्रस्तावनाकार श्री. खांडेकरांचा आशावाद सार्थ ठरावा असेंच एकूण संग्रहाचें स्वरूप आहे. मुखपृष्ठावरील श्री. फडणीस यांचें चित्रहि चांगलें आहे.

—ना. वा. ठें.

## पश्चिमेचा वारा

( ले. प्रा. श्रीपाद महादेव माटे, मू. ४॥ रुपये )

महाराष्ट्रांतील एक ख्यातनाम लेखक प्रा. श्री. म. माटे यांची ही पहिली कादंबरी. या कादंबरीच्या प्रारंभीं लेखकानां जें लहानसें आत्मनिवेदन केलें आहे त्यांतील कांही भाग पुढे दिला आहे.

अनुक्रमणिका

"वयाला एकाहत्तरावे वर्ष लागल्यावर मी माझी पहिली कादंबरी प्रसिद्ध करीत आहें. प्रकृतीच्या सध्याच्या कठिण अवस्थेंतून पार पडलों तर आणखीहि लिहीन अशी उमेद वाटते. कादंबरी वाङ्मयाच्या प्रांगणांत पाऊल टाकतांना मला खरोखरच भीति वाटत आहे. पंचावन्नाव्या वर्षी मी कथावाङ्मय—लघुकथावाङ्मय नव्हे—लिहूं लागलों तेव्हा असाच भ्यायलों होतों. ती भीति हळूहळू नाहीशी झाली. प्रस्तुतची भीतीहि तशीच नाहीशी होण्याचा योग आला तर बरें होईल! धुरंधर लेखकांनी समृद्ध केलेल्या क्षेत्रांत आपण कोणची किमान पदवी पावूं याची कल्पनाहि होत नाही. कारण माझें कादंबरी-वाचन फार म्हणजे अतीव अल्प आहे; जवळ जवळ नाहीच. आणि तंत्रादिकाचीहि कांही माहिती मला नाही. केवळ लेखनाची हौस म्हणून या टापूंत शिरत आहें.

"ही कादंबरी म्हणजे एक प्रदीर्घ कथा आहे म्हणा; किंवा कांही माणसांच्या जीवनाचा इतिहास आहे म्हणा. या कादंबरीचें नायकत्व तिघांनी व नायिकात्व दोघींनी वाटून घेतलें आहे! पण खरें म्हटलें म्हणजे कादंबरीचा नायक 'पश्चिमेचा वारा' च आहे. त्याने सारें घडविलें आहे."

वरील दोन छेदकांवरून लेखकांची विनयशील प्रामाणिक वृत्ति आणि कादंबरीचें अंतःस्वरूप या दोन्हीचा उलगडा होत असल्यामुळे ग्रंथपरिचयलेखकाला फारच थोडें काम शिल्लक उरतें. जीवनाचा दीर्घकाल अनुभव घेऊन परिणतप्रज्ञ अवस्थेला प्राप्त झाल्यानंतरच श्री. माटे यांनी लेखनाला प्रारंभ केला म्हणूनच तें 'शुकमुखात् अमृतद्रवसंयुतं' आणि 'रसमालयं' असें उतरलें आहे यांत शंका नाही. आतापर्यंतच्या त्यांच्या ललित आणि निबंध लिखाणांत रसिकत्व, व्यासंग, सूक्ष्म निरीक्षण, युक्तिवाद, आणि त्यापेक्षाहि जनहिताची तळमळ व निश्चित दृष्टि यांचा आढळ आपणाला होत आला आहे. प्रस्तुत कादंबरीहि त्याला अपवाद नाही.

ही कादंबरी वाचल्यानंतर, आजच्या प्रचलित कादंबरीप्रकाराहून 'पश्चिमेचा वारा' कांही वेगळ्या प्रकारचा आहे याची जाणीव वाचकास चटकन् होते. कदाचित् आजच्या विशिष्ट तंत्राचा अभिमानी माटे यांनाहि 'इक्षुक्षेत्रांत शिरलेल्या सूकरराजाची' पदवी बहाल करण्याचा संभव आहे. पण जे तंत्रपरतंत्र नाहीत व भांड्याच्या आकाराप्रमाणेच तंत्राचेहि अनेक आकार असूं शकतात व ते आपापल्या परी सारखेच सुंदर असूं शकतात असें ज्यांना मनापासून वाटतें ते प्रा. माटे यांच्या या तंत्राचेंहि मनापासून स्वागत करतील यांत आम्हाला शंका वाटत नाही.

'प्रदीर्घ कथा किंवा कांही माणसांच्या जीवनाचा इतिहास' असें जें या कादंबरीसंबंधी माटे म्हणतात तें अगदी यथार्थ आहे कारण कादंबरीलेखकच स्वतः सर्व हकिकत वाचकास सांगत आहेत. यांत पात्रांचीं संभाषणें व त्यांच्या सूक्ष्म हालचालीचीं वर्णनें दोन तीन स्थळें सोडलीं तर जवळ जवळ नाहीतच. त्यामुळे स्वाभाविक व्यक्तिचित्रणाची अपेक्षा जी आजचा वाचक करतो ती पूर्ण होत नाही. मात्र जें आहे तें कादंबरीच्या ठेवणीला पूर्ण सुसंगत असेंच आहे.

कादंबरीचें थोडक्यांत कथानक असें. थियासफिस्ट मताचे व संपन्न असे विश्वासराव. त्यांचा मुलगा माधव हा अत्यंत हुशार. येथील शिक्षण आटोपून पदवी घेतल्यावर आय. सी. एस्. परीक्षेसाठी त्याला इंग्लंडला पाठवितात पण तेथे तो मॉड् नावाच्या एका नार्वेजियन तरुणीच्या प्रेमपाशांत सापडतो व अभ्यासाकडे दुर्लक्ष झाल्यामुळे दोनदा त्या परीक्षेंत नापास होतो. शेवटी ट्रायपॉसची पदवी घेऊन तो हिंदुस्थानांत येतो. पण त्यापूर्वी त्याने मॉड्शीं विवाह केलेला असतो. मॉड गरोदर अवस्थेंत आपल्या देशांत जाते. तिथे तिला अलेव् हा मुलगा होतो. इतक्यांत दुसऱ्या महायुद्धाचो वावटळ उठते व जर्मन सैनिक मॉडला ती रशियाच्या नव्या मताची म्हणून पकडून नेतात. मॉड् तुरुंगांतच मरते. अलेव्चें पालनपोषण प्रथम मॉडचा बाप मॅथ्यू व नंतर तिची वहिण हेन्रीएटा ही करते. मॉड् मरण पावली हें माधवला कळल्यावर तो दुःखी होतो, पण कालांतराने वडील माणसांच्या आग्रहाने शरयू हिच्याशीं विवाहबद्ध होतो. शरयू सुशिक्षित पण अगदी भाळीभोळी व खरी पतिनिष्ठ होती. माधवची आई सरस्वतीबाई हिला सुनेचें वर्चस्व न खपून ती

काशीस जाते व मरते. कालांतराने विश्वासरावाचाहि देहान्त होतो. युद्ध संपल्यावर अलेक्‌ला त्याचा खलाशी मावसा माधवकडे हिंदुस्थानांत आणून घालतो. फोटोवरून अलेक्‌ला आईबापाचा परिचय होता. तो मराठी शिकला व शरयूनेहि आपल्या या सावत्र पोराला फार प्रेमाने वागविलें. अलेक्‌ची पहिली परीक्षा झाली. त्याला स्कॉलरशिप मिळाली व तो शिक्षणाच्या निमित्ताने परदेशास गेला व पुढे नार्वेस जाऊन आपल्या आईच्या समाधीचें त्याने दर्शन घेतलें.

याच कालखंडांत कोकणांतील श्रीराम पटवर्धन नांवाचा अल्पशिक्षित तरुण आपलें नशीब काढण्यास इंग्लंडांत गेला असतो. त्याची व माधवची तेथें गाठ पडते. ते मित्र होतात व एका सभेमध्ये हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्याविरुद्ध निर्भयपणे मतप्रदर्शनहि करतात. अनेक हुन्नर शिकून पटवर्धन कोकणांत येतो. लग्न करतो. पण कालांतराने पश्चिमेच्या वाऱ्याची आठवण होऊन परत विलायतेस जातो. तेथें तो एका मिस् नॉर्टन् नांवाच्या खालच्या दर्जाच्या तरुणीच्या प्रेमपाशांत सापडतो. मात्र तो लग्नबिग्न करीत नाही. कांही वर्षांनें त्याला आपल्या मायदेशाची आठवण होऊन तो परत येतो व माधवची गाठ घेतो. माधव आपल्या प्रोफेसरकीच्या नोकरीचें त्यागपत्र देतो आणि माधव शरयू आणि श्रीराम नवीन सामाजिक कार्याचा निश्चय करतात व कादंबरी संपते.

या कादंबरींतील वातावरण अत्यंत सभ्य, सुसंस्कृत आणि संयमित स्वरूपाचें आहे. यांतील नायक माधव व श्रीराम यांना पश्चिमेचा वारा लागला तरी ते पुरे वहकले नाहीत. इकडील संस्काराचा परिणाम त्यांच्यावर इतका होता की त्यांना स्वकर्तव्याची जाणीव वारंवार होत असे. व त्यानेंच ते दोघेहि धावरले. यांतील एकहि पात्र दुष्ट नाही. सर्वांच्या आंगीं माणुसकीचे पाझर दिसतात. पौर्वात्य हिंदु स्त्रीची पतिनिष्ठा किति उदार आणि व्यापक असते याचेंहि दर्शन आपणास होतें. पश्चिमेचा वारा प्यावयासाठी आता सर्वांना पश्चिमेकडील देशांत गेलेंच पाहिजे असें नाही. तो आता हिंदुस्थानांत आपोआपच वाहून आपणास स्पर्श करूं लागला आहे. पश्चिमेचा वारा प्रत्यक्ष अनुभवलेल्यास तिकडील सामाजिक मोकळेंपणाची जाणीव विशेष होते हें खरेंच, पण या कादंबरींत त्या मुद्यावर विशेष भर दिला नाही. संमिश्र विवाहामुळे निर्माण होणाऱ्या नवीन प्रजेची एकंदर संस्कृति व स्वरूप काय राहील व त्याचा विशिष्ट देशाच्या राष्ट्रीयतेवर काय परिणाम होईल याचाहि या कादंबरींत विचार केला नाही. येथे फक्त पश्चिमेकडील म्हणजे रशियादि देशांतील जें अर्थविषयक समतेचें नवें तत्त्वज्ञान आलें आहे त्याचाच प्रामुख्याने विचार केला आहे. ही अर्थसमता आपणालाहि अपरिहार्य आहे असें लेखकांचें प्रतिपादन आहे. मात्र त्याबरोबर ती अध्यात्म विचाराला विरोधी आहे हें पाश्चात्य मत मात्र प्रा. माटे यांना मान्य नाही. उलट पश्चिमेची अर्थसमता व हिंदुस्थानांतील संतांची आध्यात्मिक समता यांचा समन्वय होण्यांतच समाजाचें खरें कल्याण आहे. आणि त्याचा अवलंब केल्यास जातीपातींचीं भांडणेंहि राहणार नाहीत असा लेखकांचा विश्वास आहे. माधव शरयू व श्रीराम जे विधायक कार्य करूं इच्छितात तें हें होय.

कादंबरीच्या कथानकाचें हें तर्कचिंतनपर फलित अत्यंत महत्त्वाचें आहे.

कादंबरीच्या कथानकाचा काळ निश्चित कोठे दिला नसला तरी युद्धविषयक परिस्थितीची पार्श्वभूमि यांत असल्यामुळे तो ओळखतां येतो. मात्र कांही ठिकाणीं थोडा संभ्रम निर्माण व्हावा असे उल्लेख आहेत. उदा. युद्धाच्या किंचित् आरंभीं म्हणजे १९३८-३९ मध्ये अलेक्‌चा जन्म झाला असला पाहिजे. पण तो हिंदुस्थानांत येतो, शिकतो, स्कॉलरशिप मिळवितो, विलायतेस जातो व तेथून नार्वेस जातो. आज त्याचें वय १६ वर्षांचें भरतें. इतक्या लहान वयांत त्याने हें सारें केलें काय? याच काळांत हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यामुळे जो नवीन राजकीय परिस्थिति उत्पन्न झाली तिचा उल्लेख कथानकाच्या ओघाच्या दृष्टीने समुचित नव्हता काय? पण या उणीवा फार क्षुल्लक आहेत.

कादंबरीची भाषा खऱ्या अर्थाने मराठी आहे. आमच्या ज्या कित्येक मराठी लेखकांना मराठी

वाक्यांत कसेंतरी कांही इंग्रजी प्रतिशब्द घातल्या-खेरीज आपण प्रतिष्ठेचें लिहिलें असें वाटतच नाही, त्यांनी प्रा. माटे यांच्या समर्थ पण घरगुती मराठी भाषेकडे पाहावें ! मधून मधून जीं सुभाषितरूप वाक्यें आलीं आहेत व जें तत्त्वचिंतन आलें आहे तें फारच चांगलें आहे. कै. केतकरांनी मराठी कादंबरीच्या कथानकास परदेशांतून फिरवून आणलें होतें. आतां प्रा. माटे यांनीहि तसें केलें आहे. पण दोघांच्या परदेशच्या परिस्थितींत व मनोवृत्तींतहि फरक आहे.

'यापुढची अलेव्चीं कथा पुन्हा केव्हा तरी सांगायला हवी.' हें या कादंबरीचें शेवटचें वाक्य आहे. यावरून माटे यांनी आपल्याला पुढील कादंबरीलेख-नाचें अभिवचन दिलें आहे हें स्पष्ट होतें. वृद्धावस्था, रोगजर्जर शरीर व दृष्टीला आलेले मांद्य अशाहि स्थितींत माटे यांनी हा जो उद्योग केला तो नव्या पिढीस निःसंशय स्फूर्ति देणारा आहे. परमेश्वर कृपेने प्रा. बापूसाहेब माटे यांना आयुरारोग्य लाभो व त्यांच्या हातून नवनव्या ललितगंभीर कृति निर्माण होवोत अशी इच्छा प्रगट करून हा ग्रंथपरिचय संपवितों.

## सर्वस्वाचीं गद्य गाणीं

[ ले. कविभूषण प्रा. ब. ग. खापर्डे, अमरावती, मूल्य २ रु. ]

गद्य आणि गाणीं ह्या परस्परविरुद्ध संज्ञा धारण करणारें प्रस्तुत पुस्तक कविभूषण खापर्डे यांनी 'संकलित' स्वरूपांत आता प्रसिद्ध केलें आहे. 'संकलित' अशा करता की यांतील गाणीं १९१५ ते १९१७ मध्ये धर्मजागृति मासिकांत प्रसिद्ध झालीं असून १९१५ मध्ये पुस्तकरूपानेहि (भाग १ ला.) तीं अवतीर्ण झालीं होतीं. त्यानंतर १९२९-३० मध्ये वागीश्वरी मासिकांत पुढील भाग आला व त्यापुढील गाणीं अन्यत्र क्रमशः प्रकाशित झालीं. अशा रीतीनें एकूण १३५ गाण्यांचें संकलन करून हीं गाणीं आपणासमोर येत आहेत. कै. रवीन्द्रनाथ ठाकुरांच्या 'गीतांजलि' या जगप्रसिद्ध ग्रंथावरून कविभूषण खापर्ड्यांना प्रस्तुत गाणीं रचण्याबाबत कांही स्फूर्ति मिळाल्याचें त्यांनी प्रस्तावनेंत मान्य केलेलेंच आहे. पण रविबाबूंचीं मूळ बंगालीं गाणीं पद्यात्मक आहेत. कविभूषणांनी मात्र ती गद्यात्मकच लिहिलीं आहेत.

'सर्वस्व' हा शब्द मोठ्या सहेतुकपणे कवींनी योजला आहे. त्याचा अर्थ परब्रह्म हाच करावा लागतो. त्या निर्गुण निराकार व्यापक परमेश्वराला उद्देशून कवीचीं हीं आर्त गाणीं अत्यंत रोचक उमटलीं आहेत. या गाण्यांत कवीची म्हणजे 'मी' ची भूमिका कधी स्त्रीची तर कधी पुरुषाची आहे. हे स्त्रीपुरुषहि भिन्न भिन्न नात्याने व प्रकाराने गाण्यांत अवतीर्ण होतात. अशा अध्यात्मिक स्वरूपाच्या गीतांमध्ये प्रतीकानेच बोलावें लागतें. त्यामुळे तीं गाणीं क्वचित् गूढ स्वरूपाचीं वाटतात. पण प्रतीकें समजणाऱ्या सुज्ञ वाचकांस तो गूढपणा सहज सुगम होतो !

हीं गाणीं परस्पर सुटीं असूनहि त्यांत एकच सूत्र आहे, त्यामुळे तीं एखाद्या मालेसारखीं झालीं आहेत. कोणतेंहि गाणें मधूनच वाचलें तरी तें स्वयंपूर्णच आहे.

यांत भक्त व परमेश्वर यांच्या परस्पर संबंधाचा जो जिव्हाळा आहे तो अरसिकाला देखील आर्द्रता आणील इतक्या योग्यतेचा आहे. ही रचना बाह्यतः गद्य असली तरी आंत ती पूर्णपणे काव्यमय उतरली आहे.

'लोकांना ह्या माझ्या कवितासंबंधाने काय वाटतें हें मला माहीत नाही. पण मला ह्या कविता-संबंधाने काय वाटतें हें मला लोकांना सांगता येत नाही' असा उल्लेख १३५ व्या गाण्यांत कवीने दुसऱ्या एका संदर्भात केला आहे, तो फार सूचक आहे. त्यांतील पहिल्या विधानाला या रसग्रहणांत उत्तर आहे.

श्री. अण्णासाहेब खापर्डे यांची कविभूषण ही संज्ञा प्रस्तुत 'गाण्यां'त बहुगुणित सार्थ झाली आहे, यांत शंका नाही.

## मीलन

(कवि श्री. य. द. भावे, प्र. चित्रशाळा पुणें, मूल्य १ रुपया.)

मृत्यूने प्रेयसीला ओढून नेल्यामुळे प्रियकराला जें दुःख होतें त्या दुःखाचा उपशम करण्यासाठी तो

तिचें स्वरूप सर्व सृष्टींत पाहणे व अशा रीतीने त्याचें तिचें मीलन घडून येतें या कल्पनेवर हें लहानसें काव्य आधारलें आहे. छंदाची रचना नवीन पद्धतीची आणि ठाकठीक आहे. मुखपृष्ठावरील चित्र मात्र अत्यंत चांगलें आहे.

## बुद्धदेव

(लेखक : गोपीनाथ तळवलकर, प्र. चित्रशाळा, पुणें, किंमत १॥ रुपया)

श्री. तळवलकर हे बालवाङ्मयाचे साक्षेपी लेखक म्हणून प्रसिद्ध आहेत. गेल्या बुद्धजयंतीच्या निमित्ताने त्यांनी लिहिलेली ही बुद्धाची कथा मुलांसाठी फार चांगली उतरली आहे.

**ज्योतिर्विद्या परिसंस्था, पुणें**—या संस्थेचा वार्षिक वृत्तांत आमच्याकडे आला असून ज्योतिर्विद्येच्या क्षेत्रांत संस्था उपयुक्त कार्य करीत आहे हें ह्यावरून कळून येतें. जिज्ञासूंनी या संस्थेचा अवश्य लाभ घ्यावा अशी आमची शिफारस आहे.

**इंद्रधनु**—लेखक : आकाशानंद प्र. वसंतानंद, प्रकाशन–गोंदिया, किंमत ७ आणे.

हा लहान आकाराच्या सात कथांचा लहानसा संग्रह असून मुलांच्यासाठीच खास त्या कथा प्रवृत्त झाल्या आहेत. प्रयत्न उत्तेजनार्ह आहे.

**पां. कृ. सा.**

## वाङ्मय-विमर्श

(लेखक : श्री. ना. बनहट्टी; प्रकाशक : चित्रशाळा प्रेस, पुणें २)

महाराष्ट्रांतील एक ख्यातनाम अभ्यासू पंडित व मार्मिक टीकाकार प्रा. श्री. ना. बनहट्टी यांचे लेख व भाषणें खण्डशः पुस्तकरूपाने प्रकाशित करण्याचें कार्य त्यांच्या कांही विद्यार्थ्यांनी "प्रा. बनहट्टी ग्रंथ प्रकाशन मंडळ" या नांवाने अंगीकारलें आहे. प्रा. बनहट्टी यांचें लिखाण बहुविध व विपुल आहे. निरनिराळ्या मासिकांसाठी लिहिलेले साहित्यिक लेख, भिन्नभिन्न संमेलन व परिषदांत वाचलेले संशोधनात्मक निबंध, नभोवाणीवर व इतरत्र झालेलीं भाषणें, त्यांनी स्वतः सतत तीनचार वर्षें चालविलेल्या 'समाधान' साप्ताहिकांतील त्यांचे निवडक लेख, इ. भरपूर साहित्य पुनर्मुद्रित होऊन जनतेजवळ स्थायी रूपाने राहण्यायोग्यहि आहे. म्हणून त्यांची वर्गवारी करून एकूण आठ खंड प्रसिद्ध करण्याची योजना प्रस्तुत मंडळानें आखली आहे. प्रा. बनहट्टींचा "एकावळी" हा लेखसंग्रह प्रथम १९४१ मध्ये प्रसिद्ध झाला व त्याची दुसरी आवृत्ति १९५१ त निघाली. तो पहिला खण्ड मानून मंडळाने १९५५ च्या मे महिन्यांत "नाट्य व रंगभूमि" हा लेखसंग्रह दुसरा खण्ड म्हणून प्रकाशांत आणला. त्यानंतर प्रस्तुतचा "वाङ्मय-विमर्श" म्हणून तिसरा खण्ड आता बाहेर पडत आहे. नियोजित आठ खण्डांपैकी उरलेल्या पांचांची वर्गवारी "व्यक्तिविवेचन" "समाजजीवन, तत्त्वज्ञान व इतिहास" "प्रस्तावना व परीक्षणें" "नभोवाणी" आणि "आत्मनिवेदन व 'समाधान'" अशी करण्यांत आली आहे. हे सर्व खण्ड यथावकाश प्रसिद्ध होतील अशी आशा आहे.

प्रस्तुत "वाङ्मय-विमर्श"चा उपोद्घात प्रा. बनहट्टींचेच व्यासंगी विद्यार्थी, "मराठी साहित्यशास्त्र"कार "भावगंध" ख्यात प्रा. डॉ. मा. गो. देशमुख यांनी लिहिला आहे. त्यांत गुरुवर्य बनहट्टींचा "मूळ पिंड आणि प्रेरणा चिपळूणकरी प्रवृत्तीची असली तरी" तिने "'ग्रंथावर टीके'च्या मानाने विकासाचा फार लांबचा पल्ला गाठला आहे." असें सोदाहरण दाखवून दिलें आहे. त्यांच्या मतें "सारस्वताच्या सखोल आस्वादाने व आकण्ठ रसपानानें जी एक समाहित वृत्ति रसज्ञ व अभिजात वाङ्मय-विमर्शकाचे ठिकाणीं निर्माण होते" तिचा परिचय प्रा. बनहट्टी यांचे विवेचनांत घडतो. प्रा. बनहट्टींचें गद्य "सकस, प्रसन्न व अकृत्रिम" असें आहे त्यांत त्यांची "मननशील प्रवृत्ति व सखोल व्यासंग" प्रतिबिंबित झाला आहे यांत शंका नाही.

"वाङ्मय विमर्श"त एकूण आठ लेख संग्रहित झाले आहेत. त्यांपैकी पहिले पांच "परस्मैपदी" आहेत. म्हणजे इतरांनी लिहिलेल्या वाङ्मयाचें पर्यालोचन

व मीमांसा त्यांत केली आहे. अर्थात् प्रसंगोपात्त तत्वचिंतनहि त्यांत आलें असलें तरी प्रामुख्यानें तें विवेचन वस्तुनिष्ठ असेंच आहे. पुढील तीन लेख मात्र आत्मनिष्ठ आस्वादकाच्या भूमिकेवरून लिहिले असल्यामुळें "आत्मनेपदी" म्हणतां येतील. तेथे प्रा. बनहट्टींची रसिकता व साहित्यमर्मज्ञता स्पष्टपणें प्रगट झाली आहे.

पहिला लेख म्ह. "मराठी संतवाङ्मय व वैष्णव संप्रदाय" या विषयावरील लेखमाला. ही 'रत्नाकर' मासिकांत नोव्हें. १९२६ ते एप्रिल १९२७ पर्यंत प्रसिद्ध झालेली आहे. तिचे मूळ मात्र मुंबईच्या मराठी ग्रंथसंग्रहालयांत झालेलीं प्रा. बनहट्टींचीं तीन व्याख्यानें होत. त्यांचा विषय होता Some unexplored Legions of Marathi Literature (महाराष्ट्र सरस्वतीच्या महालांतील एक अज्ञात दालन). स्वत: प्रा. बनहट्टी हे निष्ठावंत वैष्णव सांप्रदायिक तसेंच मराठी संतवाङ्मयाचे गाढे अभ्यासक आहेत. तेव्हा त्यांचें लक्ष ह्या दालनाकडे वेधणें व त्यांनी इतरांचें तिकडे वेधणें साहजिकच आहे. संतवाङ्मयाच्या "प्रेममय सात्विकतेचें प्रत्ययकारक" वर्णन प्रा. बनहट्टींनी खरोखर उत्तम साधलें आहे. त्यावरून त्या वाङ्मयाशीं ते समरस झाल्याचें प्रतीत होतें.

१९३८ जुलैच्या "विहंगम" मासिकांत प्रसिद्ध झालेल्या "अनिष्ट वाङ्मयाच्या उत्पत्तीची कारणमीमांसा" ह्या दुसऱ्या लेखांत प्रा. बनहट्टींनी आधुनिक कालखंडांतील प्रवृत्तींचें विदारक पण शास्त्रीय विवेचन केलें आहे. १८९५ ते १९०८ ह्या काळांत लो. टिळकांचें दमदार राजकीय आंदोलन चालू होतें. तेव्हाचें वाङ्मय पण निकोप व उत्साहकारी असेंच होतें. टिळकांना मंडाले येथे डांबल्यावरोबर "ओजस्वी वाङ्मयाच्या निर्मितीचें चक्र एकदम बंद पडलें." लोकमान्य १९१४ मध्ये सुटले. तोंपर्यंत अनेक "माला"– मासिकें निघालीं व "सर्वत्र गचाळ, पांचट व चटोर मजकुराचा पूर लोटल्यासारखा झाला." केसरीच्या १९–५–१४ च्या अंकांत त्याचें मार्मिक वर्णन आलें आहे. लो. टिळकांच्या सुटकेनंतर महायुद्ध सुरू होतांच जनतेचें लक्ष्य पुन्हा त्या क्षुल्लक वाङ्मयावरून उडून जीवनसमस्यांवर खिळलें. "माला" मासिकें बंद पडलीं, युद्ध १९१८ मध्ये संपलें. पुढें "असहकारिता" चळवळ सुरू झाली ती १९२२ पर्यंत टिकली. ती संपताच पुन्हा अनिष्ट वाङ्मयाच्या निर्मितीस जोर चढला आहे. एवंच, क्षोभक समाजपरिस्थिति उत्तम वाङ्मयाच्या निर्मितीस पोषक आहे. हल्लीच्या अनिष्ट वाङ्मयनिर्मितीचें खरें कारण "चांगल्या वाङ्मयाची कल्पना नसलेल्या अल्पशिक्षित वाचकवर्गाची वाढ" हें आहे, असा निष्कर्ष प्रा. बनहट्टींनी काढला आहे. त्याशीं कोणीही समंजस माणूस सहमत होईल असें वाटतें.

तिसरा लेख "आधुनिक मराठी वाङ्मयाची पाठशुद्धि" हा होय. प्रा. बनहट्टींनी पाठसंशोधनशास्त्रांतील तत्वांची उपयुक्त चर्चा यांत केली असून टीकाकार हा मार्मिक अभ्यासक असावा व त्याचें लक्ष पाठशुद्धीकडे अवश्य वळलें पाहिजे असें त्यांनी प्रतिपादन केलें आहे, तेंही निबंधमाला व दुर्दैवी रंगू ह्या दोन लोकप्रिय ग्रंथांच्या नवीन आवृत्तींतील अशुद्ध पाठांचीं विपुल उदाहरणें देऊन.

१९३६ च्या इंदूरच्या महाराष्ट्र साहित्य संमेलनांतील साहित्य विभागाचें अध्यक्षीय भाषण संमेलनाच्या इतिवृत्तांत व १९३७ जाने. फेब्रु. मध्ये "महाराष्ट्र" साप्ताहिकांत प्रसिद्ध झालें होतें तेंच "साहित्याचें सर्वांगीण स्वरूप" ह्या शीर्षकाने येथे पांचवा लेख म्हणून पुनर्मुद्रित केलें आहे. प्रस्तुत भाषणांत प्रा. बनहट्टींनी संमेलनाच्या त्या विभागांत वाचलेल्या विविध विषयांवरील निबंधांचें सडेतोड परीक्षण निःपक्षपात बुद्धीने केलें आहे. त्यांत त्यांचें व्यापक वाचन, मुद्देसूद विवरण, निर्भीक मतप्रतिपादन हे विशेष दृगोचर होतात. विभागाचा समारोप करतांना साहित्यक्षेत्राची व्यापकता व त्याकडे पाहण्याची एकत्व भावनेची दृष्टि ह्यांचा निर्देश करून साहित्यशरीराचें वर्णन "ज्ञानेशाप्रमाणे पण आजच्या कल्पनांस अनुसरून" मोठ्या समर्पक रीतीनें केलें आहे. इतिहास हे पाय (गति देणारे) चरित्रें हात (क्रियाशील), टीका हें फुफ्फुस (शुद्धि करणारे) प्रबंध हें जठर (पोषक) व ललित वाङ्मय हें मस्तक (सौंदर्य दर्शक) मानून त्यांतील कादंबरी हें मुख (सुखदुःखनिवेदक), नाटक हे नेत्र (हृद्भावनिदर्शक) व सर्वशेखरीभूत काव्य हें भाळ-

प्रदेश व केशविन्यास अशी गुणानुसार योजना कल्पिली आहे. पुढे त्यांनी ललित व गंभीर वाङ्मयाच्या परस्पर प्रमाणाचा विचार वाङ्मयधुरीणांनी विशेषत: टीकाकारांनी अवश्य करावा अशी औचित्यपूर्ण सूचना केली आहे ती उपेक्षणीय नाही. सर्वच साहित्य रुचकर व कलापूर्ण असावें असें सांगतांना मराठीतील इतिहास व चरित्र वाङ्मय कसें नीरस व कलाहीन आहे हेंही त्यांनी मुद्दाम नजरेस आणून दिलें आहे. तसेंच ललित वाङ्मयासही जातांजाता त्यांनी योग्य असा इषारा दिला आहे की व्यक्तिवादापेक्षा समाजवाद उच्च व त्याहीपेक्षा मानवतावाद उच्चतर आहे. तेव्हा सर्व ललित-लेखकांनी मानवी जीवनाचें अवलोकन कसोशीने करावें. एकूण हें व्याख्यान सर्वच दृष्टींनी मार्गदर्शक आहे.

सहावा लेख "संपादणी व छाननी" हा लघुनिबंध वजा आहे. "साहित्यसंग्रह" ह्या नागपूरच्या शारदामंडळाने १९३८ सालीं प्रसिद्ध केलेल्या वार्षिकांत छापला गेला होता. भारतीय वाङ्मयांतील "आत्मशोधनाच्या वृत्तीचें साफल्य" व पाश्चात्यांकडील "अंत:शोधक वृत्तीची विफलता" यांचें उत्तम चित्र येथें दिसेल.

१९४५ च्या डिसेंबरांत दर्यापूर येथे झालेल्या नवव्या विदर्भ साहित्य संमेलनांतील अध्यक्षीय भाषण "वाङ्मयनिर्मितीची प्रेरणा" ह्या नांवाने सातवा लेख म्हणून येथे घेतलें आहे. त्यांत देखील आत्मशोधनाच्याच सूत्राचें विस्तृत विवरण आलें आहे. येथे वाङ्मयविमर्शाची "उच्चतम पातळी" गाठली आहे असें म्हणावयास बाधा नाही.

अखेरचा लेख म्हणजे "महाराष्ट्राचें पहिलें अमृतमधुर प्रेमकाव्य" हालाच्या प्राकृत "गाथासप्तशती"चें हें मार्मिक रसग्रहण होय. त्यांत प्रा. बनहट्टींची चिकित्सक वृत्ति तशीच रसज्ञता पुरेपूर प्रगट झाली आहे.

एकंदर सर्वच लेखांत प्रा. बनहट्टींची "सोज्वळ व संथ मनोवृत्ति" दिसून येते. "दुर्मत-ध्वंसनाची घडाडी आणि परमतखंडनाची हिरीरी" येथे अभावानेच तळपत असली तरी विचारांचें स्थैर्य व बुद्धीची तर्ककर्कशता जागोजागीं आढळते. त्यामुळें हा लेख-संग्रह सदैव वाचनीय व मननीयच नव्हे तर मार्गदर्शकही वाटेल असें म्हणतां येतें. फक्त पृ. १६५ वर "संस्कृत साहित्यशास्त्रकार सनातन मानवी मनोवृत्तींच्या आधारें आपले सिद्धांत बांधतात." असें सांगितल्यानंतर लगेच पुढील पानावर "संस्कृत साहित्यशास्त्रकारांची विचारसरणी सौंदर्यतत्त्वाच्या आहारीं गेलेली आहे. ...त्यांनी आपल्या विचारांचें क्षेत्रफार संकुचित करून घेतलें आहे." असें विधान केलें आहे. तें सुसंगत वाटत नाही. तसेंच पृष्ठ १९५ वरील गायेंत "निराशा-युक्त कारुण्य" आहे की प्रियकर परत आल्यावर तिला रागावणें शक्य होत नाही म्हणून ती अनुनयासही मुकते असें कवीस दाखवायचें आहे; असा संदेह शक्य आहे.

पुस्तकाचें मुद्रण सुबक व जवळजवळ निर्दोष असें आहे, पृष्ठ १४४ वर खालून ७ व्या ओळींत 'विचक्षण' चे ठिकाणीं "विलक्षण" व पृ. १४६ वर १२ व्या ओळींत "विरूप"चे ठिकाणीं "विरुद्ध" तसेंच पृ. १९५ वरील गायेंत "कस्या अपि"चे ठिकाणीं "कस्यापि" चुकून राहून गेलें असावें असें वाटतें. [ किं. ३॥ रु. पृ. संख्या २२५+१६. ]

दि. वि. व.

## बालबोध अर्थशास्त्र

[ले. प्रा. भा. ह. मुंजे प्र. विद्या, प्रकाशन, वाकर रोड, नागपूर २; मू. १॥ रु.]

आतापर्यंत अर्थशास्त्र हा विषय फक्त महाविद्यालयांतूनच शिकवीत असत. पण आता उच्चतर व उच्च माध्यमिक परीक्षेसाठीहि तो एक ऐच्छिक विषय म्हणून ठेवण्यांत आला आहे. विषय नेमला खरा, पण या विषयावर अभ्यासक्रम व मुलांच्या बुद्धिमत्तेची कक्षा लक्षांत घेऊन तयार करण्यांत आलेलें एकहि पुस्तक नव्हतें. ही गरज नागपूर विद्यापीठाचे अर्थशास्त्र-विभागाचे प्रमुख व श्री. बिं. नगर महाविद्यालयाचे एक ज्येष्ठ प्राध्यापक श्री. भा. ह. मुंजे यांनी या लहानशा पुस्तकाने भागविली आहे. कठीण विषयाची सुबोध व रोचक मांडणी याचा हें पुस्तक एक आदर्श मानतां येईल. अर्थशास्त्रीय प्रमेयाच्या यांत तपशील असणें शक्य नसलें तरी स्थूल कां होईना पण बिनचूक माहिती मिळण्यास अडचण पडत नाही. आकृत्या व प्रत्येक पाठाखाली प्रश्न दिले असल्यामुळे उपयुक्तता वाढली आहे.

पां. कृ. सा.

## लोकसाहित्याची रूपरेखा

[लेखिका—दुर्गा भागवत; प्रकाशक—वा. वि. भट, कार्यवाह, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाकुरद्वार, मुंबई २, पृ. ५४५, मूल्य रु. १०,]

जगांतील कोणत्याही समाजांत तोंडी परंपरेनें अव्याहत चालत आलेल्या अनेक कथा, गीतें, वाक्प्रचार, म्हणी, मंत्र, ओव्या इ. चे पुनर्निर्माण, संकलन व संस्करण उत्सवप्रसंग, धार्मिक विधि, सण, व्रतें, खेळ, इ. निमित्तानें सतत चालूच असतें. त्याचा परामर्श समाजशास्त्राचे अभ्यासक बहुधा घेत असतात. ललित-वाङ्मयांतही कधी कधी त्यांचे संदर्भ आलेले दिसतात. पण समाजांतील सुशिक्षित व पंडित वर्गानें ज्याची निर्मिति "साहित्य" म्हणून केली नाही व जें केवळ जनसामान्यांत उत्पन्न होऊन रूढीने टिकून राहिलें असें साहित्य–वाङ्मय म्हणणें अधिक सयुक्तिक होईल—सर्व जगभर विपुल प्रमाणांत आढळतें. अशाच साहित्याला सामान्यतः **लोकसाहित्य** म्हणतात. त्याची व्याप्ति अमर्याद आहे असें म्हणण्यास प्रत्यवाय नाही. दण्डीनें आपल्या दशकुमारचरितांत राजनीतिशास्त्राची टिंगल करणाऱ्या विहारभद्र, नामक राजा अनंतवर्म्याच्या कुमार-सेवकाच्या तोंडीं पुढील वाक्य घातलें आहे. " तत्तु किल शास्त्रं शास्त्रान्तरानुबन्धि । सर्वमेव वाङ्मयं अविदित्वा न तत्वतः अविगंस्यते।' [म्हणजे तें शास्त्र, म्ह. राजनीति, इतर अनेक शास्त्रांवर अवलंबून असतें. संपूर्ण वाङ्मयाचें आलोचन केल्याशिवाय त्याचीं तत्त्वें आकलन करतां येणार नाहीत.] हें वाक्य लोकसाहित्यास यथार्थतेनें लागू पडतें. येथे वाङ्मयाचा शब्दशःही अर्थ घेणें आवश्यक आहे हें सांगणें नकोच. कोणत्याही एका भाषेंतील अशा अफाट लोकसाहित्याचा पद्धतशीर अभ्यास करणें श्रमाचें, जिकीरीचें व कालावधीचें काम आहे. एकटयादुकटया व्यक्तीकडून तें साध्य होण्यासारखें नाही. अनेकांच्या अनेक वर्षांच्या भिन्न भिन्न क्षेत्रांतील व्यासंगाचा सर्वांगीण परामर्श घेतां येणाऱ्या अधिकारी व्यक्तीलाच " लोक–साहित्याची रूपरेखा " कळूं शकेल असें आम्हांस वाटतें.

दुर्गा भागवत ह्यांनी ह्या विषयाच्या अभ्यासकांप्रमाणेच मराठीच्या वाचकांसाठी ती "रूपरेखा" आपल्या पुस्तकांत श्रमपूर्वक चित्रित करण्याचा बराच सफल यत्न केला आहे. त्याबद्दल त्यांचें अभिनंदन करणें जरूर आहे. महाराष्ट्रांत समाजशास्त्रांच्या कांही अंगांचा व्यासंगपूर्ण अभ्यास करणारांमध्ये त्यांची गणना होते. या बाबतींत सौ. इरावती कर्वे यांच्या खालोखाल त्यांचा क्रम लागतो. म्हणूनच मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाने योजलेल्या गजेंद्रगडकर व्याख्यान-मालेमध्ये त्यांना १९५३ सालीं चार व्याख्यानें देण्याचें निमंत्रण आलें. त्याच व्याख्यानांची वाढलेली आवृत्ति हा ग्रंथ होय.

मराठी भाषेंतील लोकसाहित्याच्या अभ्यासाची अवस्था स्त्री-गीतें, पोवाडे–लावण्या, ओव्या, कथा इ. च्या संकलनापलीकडे गेलेली दिसत नाही. व तेंहि संकलन अपूर्णच आहे. त्यांतहि व्यापक दृष्टिकोनांतून

त्यांचा अभ्यास करून वर्गीकरणाचे व निष्कर्ष काढण्याचें काम फारसें झालेलें नाही. प्रस्तुत पुस्तकानें तें करण्यास स्फूर्ति मिळण्यासारखी आहे. निदान अन्यभाषाभगिनी या विषयांत जितपत गेल्या आहेत तितका तरी टप्पा मराठीला गाठतां आला पाहिजे. किंबहुना जागतिक क्षेत्रांत मराठी भाषेनें काय भर टाकली आहे याचा आढावा घेतां आला पाहिजे. अशा अभ्यासाला चालना देण्यांत प्रस्तुत पुस्तकाचें बरेंच साह्य होण्यासारखें आहे. लेखिकेनें प्रस्तावनेंत म्हटल्याप्रमाणे "या पुस्तकाचा उद्देश लोकसाहित्यशास्त्राच्या आधुनिक पद्धतीप्रमाणे भारतीय लोकसाहित्याच्या प्रमुख अंगांचा परिचय वाचकांस करून देण्याचा आहे." मग पुस्तकाचें नांव "भारतीय लोकसाहित्याची रूपरेखा" असें ठेवावयास काय हरकत होती ? फक्त पहिलें प्रकरण "जागतिक" अभ्यासक्षेत्राचें आहे; त्यांत "आधुनिक पद्धती" येऊन गेली आहे. पण संपूर्ण पुस्तकांत रूपरेखा पूर्ण भारतीय लोकसाहित्याचीच आहे. बरें असो.

भिन्न भिन्न भारतीय लोकसाहित्याचें तुलनात्मक अध्ययन करतांना लेखिकेस असें दिसून आलें आहे की "वेदकालापासून तों आतापर्यंत उपलब्ध असलेल्या लोकसाहित्याच्या प्रांगणांत ज्या भारतीय संस्कृतीचें दर्शन होतें ती संस्कृति वेदकालापासून आतापर्यंत एकाच गुणाची, वाणाची व कसाची आहे......तिचें अन्तरंग एकरूप आहे." जगांत इतरत्र धार्मिक व सामाजिक परंपरा खण्डित व उच्छिन्न झालेल्या आहेत म्हणून तेथील लोकसाहित्य अवशेषरूपच राहिलें आहे. पण भारतांत जवळ जवळ सर्वच धर्मांचा व समाजाचा संघर्ष व समन्वय आजहि चालू असल्यामुळें वैदिक, आदिवासी, बौद्ध, जैन, ख्रिस्ती, बेने इस्राइल इ० च्या "लोकसाहित्याच्या अध्ययनाचें क्षेत्र यूरोपपेक्षा कितीतरी पटीनें विशाल व अत्यंत गहन असें आहे." भारतांत या शास्त्राचें अध्ययन अर्वाचीन काळांत कोणकोणत्या पायऱ्यांनी झालें व त्याला कोणकोणतें साहित्य साधनीभूत झालें हें प्रस्तावनेंत सांगितल्यावर येथे यूरोपांतल्या अभ्यासकांप्रमाणे विशिष्ट अगर अनेक संप्रदाय उत्पन्न झाले नाहीत असें त्या म्हणतात. "सिद्धांत–परिपोषाला आवश्यक असलेल्या मूलग्राही योजनेचा अभाव" येथें असला तरी "भारतीय लोकसाहित्याचें अभ्यासक्षेत्र पूर्वग्रहांपासून अलिप्त आहे" ही आनंदाची गोष्ट होय. तरी लेखिकेनें प्रस्तावनेंत जातां जातां ह्या शास्त्राच्या अभ्यासकांस दोन इषारे दिले आहेत. एकतर झवेरचंद मेघाणी ( गुजराथी ); रामनरेश त्रिपाठी (हिंदी ), काका कालेलकर, सानें गुरुजी (मराठी), देवेन्द्र सत्यार्थी (पंजाबी हिंदी) इ० लोकसाहित्याच्या पुरस्कर्त्यांनी त्याची "उजळलेली भावनोत्कट बाजूच लोकांसमोर मांडली" आहे. पण हें विसरतां येत नाही की लोकसाहित्यांतील कला व प्रतिभा दुय्यम दर्जाची आहे. तींतील बराच मोठा भाग "हिडीस, कंटाळवाणा व जनतेच्या बुद्धीस मागे खेचणारा" आहे. म्हणून "लोकसाहित्याचा कृत्रिम उमाळा त्या विषयालाच नव्हे तर आमच्या अभिरुचीला व प्रगतीला अंतीं मारक ठरणारा आहे." स्त्रीगीतांच्या तरफदारीच्या प्रवृत्तीचें सुंदर विडंबन प्रा. पु. ल. देशपांडे यांच्या "बटाटयाच्या चाळींतील स्त्री–गीतें" ह्या लेखांत पाहावयास सापडतें. दुसरा इषारा असा की, या शास्त्राच्या अभ्यासकाचें खरें कार्य त्या साहित्याची सामाजिक पार्श्वभूमि आकलन करणें व लोकजीवनाची नाडी ओळखणें हें होय. कारण लोकसाहित्यांत तत्कालीन संस्कृतीचें दर्शन घडत नाही. एखाद्या थराचेंच दिग्दर्शन शक्य असतें. हे दोन्हीही इषारे अस्थानीं नाहीत असेंच म्हटलें पाहिजे.

प्रस्तुत ग्रंथांत एकूण १४ प्रकरणें आहेत. उद्देशाला अनुसरून "लोकसाहित्याचें जागतिक अभ्यासक्षेत्र" ह्या पहिल्या प्रकरणांत आधुनिक लोकसाहित्यशास्त्राचा आरंभ टयूटानिक परंपरेपासून झाला; त्याच्या अभ्यासाची जन्मभूमि जर्मनी होय; यूरोपांतील भिन्नभिन्न मतानुयायी शास्त्रज्ञांनी अनेक संप्रदाय स्थापन करून ह्या शास्त्राचा सर्वांगीण विकास केला; असें ऐतिहासिक व तात्त्विक विवेचन केलें आहे दुसऱ्या प्रकरणांत "भारतीय परंपरेशी ओळख" करून देतांना श्रौतविभागांतील कथा, गाथा, आख्यायिका, आख्यान, अन्वाख्यान, अनुव्याख्यान, अर्थवाद, इतिहास व पुराण या शब्दांच्या अर्थच्छटा व उदाहरणें देऊन नैरुक्तिक, दैवतवादी, सूत,

वैयाकरण, बौद्ध–जैन, गुणाढ्याची बृहत्कथा व ७ व्या ते ११ व्या शतकांतील साहित्यिक (दण्डी ते राजशेखर) यांचें ह्याविषयींचें मत विशद केलें आहे. तिसऱ्या प्रकरणांत आपल्या "पारंपरिक वाङ्मयाचे संग्राहक" यांची नामावली व कार्य दाखवितांना महीदास ऐतरेय, मार्कंडेय, वररुचि, गुणाढ्य, सोमदेव, महावीर, नैमित्तिक, बुद्धघोष, पौराणिक, कथाकार स्त्रिया, इतर परंपरेंतील संग्राहक आणि महानुभाव यांचा उल्लेख केला आहे. वरील तीन्ही प्रकरणांतील विषय मोठ्या साक्षेपाने हाताळले आहेत.

यापुढील आठ प्रकरणें दैवतकथा (उत्पत्ति, प्रलय व ज्योतिष इ. कथांसह), परीकथा, (अद्भुत), दंतकथा, कल्पितकथा, प्रहेलिका (उखाणे, कूट इ.), वाक्संप्रदाय व म्हणी, लोकव्युत्पत्ति व लोकसाहित्यांतील विनोद हे लोकसाहित्याचे भिन्न भिन्न प्रकार भारतांत कसकसे विकास पावले हें विस्तृतपणें, तौलनिक रीतीने व सोदाहरण दाखविण्यांत खर्ची पडलीं. अखेरच्या दोन प्रकरणांपैकी पहिल्या "लोक साहित्यांतील वाङ्मयीन लालित्या"चा परामर्श शास्त्रीय व रसिक दृष्टीने घेतला आहे. "एक अभावात्मक संकेत" नामक शेवटच्या प्रकरणांत भारतीय भाषांच्या प्राचीन वाङ्मयांत फुलपाखरांसारख्या काव्यमय व सर्वपरिचित जीवाचा मागमूसहि कां नसावा? याची चर्चा करून ह्या अभावाची उत्पत्ति बसविण्याचा प्रयत्न केला आहे. "भारतीय वाङ्मय संकेतबद्ध आहे. त्यामुळेच सौंदर्यपूर्ण व रसमय अशा बऱ्याच नित्यपरिचित वस्तू त्यांतून निसटल्या आहेत. जीवनालाही क्षणभंगुर मानणाऱ्या भारतीयाला क्षणभंगुर व सुखलोलुप फुलपाखरूं कसें रुचेल? शिवाय तें 'मुकें' व निःशब्दहि आहे. बन्दिस्त वातावरणांत शतकानुशतकें वाढल्यामुळे वस्तुस्थितीवर आधारलेलें कलात्मक वाङ्मय आपल्याकडे नाही. म्हणूनच फुलपाखरांचा अभाव हा भारतीय साहित्याच्या अनेक अभावांचा प्रतिनिधिक अभाव आहे असें मला वाटतें." असें लेखिकेचें मत आहे! पहा आपणास पटत असेल तर!

ग्रंथाच्या शेवटीं अभ्यासू वाचकांस उपयोगी पडण्यासारखीं अनेक परिशिष्टें जोडलीं आहेत. त्यांत पारिभाषिक संज्ञा, तसेंच संस्कृतादि, इंग्रजी व इतर भारतीय भाषांतील ह्या विषयावरील संदर्भ–साहित्य व कोषग्रंथांची विस्तृत यादी विशेष उल्लेखनीय आहे.

दुर्गाबाईंची भाषा सरळ, सुबोध व सरस आहे. कथा सांगतांना व काव्यांतील उतारे देतांना औचित्य व समर्पकता सुटत नाही. जिथे स्वतःचीं मतें मांडायचीं आहेत तेथे कळकळीमुळे भाषा धारदार झालेली दिसते. एरवी इतिहास अगर तत्त्व सांगतांना ती संथ व समतोलच वाटते. त्यांच्या एकंदर विवेचनांत अभिनिवेश असा नाहीच, त्या केवळ अभ्यासू म्हणून बोलत असल्यासारखें भासतें. माहिती, वाचन व व्यासंग यांचा पुरावा पूर्ण पुस्तकच आहे. तो तपासून पाहणें तज्ञांचें काम होय. परिचायकाचें नव्हे. इंग्रजी शब्दांचे मराठी पर्याय पुष्कळदा त्यांनी रूढ नसलेले नवीनच वापरले आहेत. पण त्यांचीं कारणेंहि निराग्रहपूर्वक स्पष्ट केलीं आहेत. उदा० Mythला पुराणकथा हा शब्द समर्पक तसाच रूढहि आहे. पण त्याला दुसराहि सांस्कृतिक व साहित्यिक अर्थ चिकटला आहे म्हणून त्यांनी दैवत कथा या पर्याय ग्रहण केला. तसेंच Survival Theory साठी योग्य प्रतिशब्द योजणें "दुर्घट" आहे. Anthropology मध्ये Survival चा अर्थ dead empty relic असा नसून existing apart from the rest असा आहे. म्हणून अवशेष शब्द न वापरतां बोजड पण सार्थ असा सजीव व शिषत्व हा शब्द ग्राह्य मानला. कांही ठिकाणीं वाक्यरचना सदोष झाली आहे (पृ. १०४ ओळ ८–११; पृ. १०८ ओळ १६–१८) चिल्लर मुद्रणदोष शुद्धिपत्रांपेक्षा पुष्कळच अधिक आहेत. उदा० पृ. ३३६ "सासूचे मडकें" बद्दल "सातूचें मडकें" पाहिजे; तसेंच पृ. १०९ "व्यासाचा पुत्र सुत" चे ऐवजी "व्यासाचा पुत्र शुक" असें हवें. तरी छपाई बरी आहे.

—दि. वि. व.

## बहिरा जातवेद व 'बहिरवी' टीका

(पान ८ वरून)

तें स्त्रीमंडळ बैसलें । जैसें कंदर्प सैन्य रचलें
कामिका वीरातें जिंतिलें । न वचे नयनि॥

× × ×

या कामातुरा राउतासि । पहिलें हाणावया दृष्टीसि
भाळीं अर्धचंद्र बाणासी । लाविलें असे ॥

भृकुटी द्वयाचेनि धनुष्यें । सिद्धचि वाईलें असे
कटाक्ष वोढि सरीसें । पेलावया बाण ॥

ते नेत्र युगुळ सित । ये मीनाकृति तळपत
तव अधरचक्र कांपित । उटि विवेकातें ॥

× × ×

आंगी रत्नजडीत कवच । आंतु शस्त्रांचा संच
तिखट लपौनि कुच । पाखया खाली ॥

ते शस्त्रें जऱ्ही लपविलीं । उभारोनि मिरविती जालीं

—अ० ८३

आजपर्यंत विरहाने अथवा विरहाच्या कल्पनेनें व्याकुळ झालेल्या स्त्रियांनी चंद्राला, वसंताला, चक्रवाकाला, कोकिळाला वगैरे दूषणें दिल्याचें आपण पुष्कळ वेळां वाचलें आहे. परंतु कोंबड्याला शिव्या दिलेल्या कधी कोणी ऐकिल्या नसतील. श्रीकृष्ण शय्या सोडून उठूं लागल्यावरोवर त्याच्या पत्न्यांनी 'कुक्कुटा'ला दिलेल्या या शिव्या पहा—

तंव उषःकाळु जाला । जें हा कुक्कुटु बोभाईला ।
त्यावरी कोपु धरीला । कामिनी तेंहीं ॥

कृष्णु म्हणे मी उठिन । कांता राहिली कवळुन
अंतरो नेदि वदनें वदन । ते शयन स्थानिं ॥

म्हणति हा कुक्कुटु । येवढिये रात्रि वाजटु
निद्रितु उगा नष्टु । असेचिना का ॥

आहारे कुक्कुटा चांडाळा । जागा केला रे सावळा
ब्रह्मा मोठे चुकला । तुज निर्माण केलें ॥

हा पूर्व जन्मीचा वैरी । वियोगु कृष्णासी करी
तुझी जातीचि संहरी । ऐसें नाही कोण्ही ॥

× × ×

ऐस्या कुक्कुटा शिव्या देती ।
आळिंगनें कृष्णा न सोडिती
जैसे योगी न विसंबती । उन्मनि अवस्था ॥

—अ० ७०

लेखाची मर्यादा संपली आहे. येथेच हा परिचय थांबवावा हें योग्य. नाही तरी पंचवीस हजारांच्यावर ओवीसंख्या असलेल्या या ग्रंथाचा परिचय एका लेखांत कितीसा करून देतां येणार ? तेव्हा शेवटीं एक दोन गोष्टी लिहून हा लेख संपवितों.

या ग्रंथाची भाषा साधी, सरळ, सोपी व ओघवती आहे. तिचें जुनेंपण एकदम कदाचित् लक्षांत येणार नाही. परंतु सागळ, टाकणें (प्राप्त होणें, पोचणें) वोडण, सोकरी, धिवसा, वासपें, कलासिलें, वितलें, हालरू, बोभाइला, निपट, सुदला, इ. शब्दांवरून व जऱ्ही, म्हणौनिया, मऱ्हाटी भाषा, आईकिजसु, जेहीं-तेहीं, जें-तें इ० रूपांवरून आणि 'जें' या अव्ययाच्या विशिष्ट उपयोगावरून वगैरे भाषेचें जुनेंपण लक्षांत येतेंच.

प्रस्तुत दशमावरील ही टीका एकेकाळीं प्रसारांत होती असें वाटतें. कवीच्या नंतर सुमारें ४०० वर्षांनी त्याच्या काव्याची नक्कल कोणी तरी करून ठेवली आहे. त्यावरून तरी हें अनुमान करतां येतेंच; परंतु याशिवाय अशा अनुमानाला आणखी एक सबळ कारण आहे. या टीकेंतील कांही ओव्यांचा अनुवाद, एकनाथ, तुकाराम, सामराज इ. कवींच्या काव्यांत झालेला आढळतो. उदाहरणार्थ—

जैई स्वधर्माची चाली मोडे । अधर्माची सिंग चढे
तई अवतार धरणें पडे । परमात्मयासि ॥

या ओवीचें नाथांच्या पुढील अभंगाशीं असलेलें साम्य पहा—

धर्माची वाट मोडे । अधर्माची शीग चढे
तैं आम्हां येणे घडे । संसार स्थिति ॥

त्याचप्रमाणें 'कृष्ण माझी माता कृष्ण माझा पिता । वहिणी बंधु चुलता कृष्ण माझा' या तुकारामांच्या प्रसिद्ध अभंगाशीं साम्य असलेल्या 'बहिरवी' टीकेंतील या ओव्या पहा—

कृष्णा तूं माझी माता । कृष्णा तूं माझा पिता
कृष्णा तूंचि भ्राता । निश्चित माझा ॥
कृष्णा तूं माझा तारूं । कृष्णा तूं माझा मेरु
कृष्णा तूं माझा आधारू । उभय कुळा ॥
कृष्णा तूं माझी माउली । कृष्णा तूं माझी वहिणुली
कृष्णा तुवां तारिली । भवनदी मज ॥ —अ. ७

चिंतामणी चिंतिलें देइल । कल्पतरु कल्पिलें पुरविल
कामधेनु कामिलें प्रसवैल । इछीतयासि ॥
—बहिरा जातवेद

कल्पद्रु हा कल्पित मात्र देतो ।
चिंतामणी चिंतित पूरवितो ॥
—सामराज

यासारख्या साम्यस्थळांवरून ही टीका लोकांच्या वाचनांत होती एवढें अनुमान करण्यास प्रत्यवाय नसावा.

कवि आपल्या टीकेच्या प्रत्येक अध्यायाच्या शेवटीं पुढीलप्रमाणे समाप्तिदर्शक वाक्य घालतो—

'इति श्रीभागवते महापुराणे दशमस्कंधे...... बहिरवी टीकायां......तमोध्यायः' यावरूनच प्रस्तुत टीकेचें 'बहिरवी' हें नांव प्रस्तुत लेखाच्या शीर्षकांत घेतलें आहे.

दशमस्कंधावरील ही मराठींतील पहिली व संपूर्ण टीका आहे. तिच्यांत काव्यगुणहि भरपूर आहेत. सुदैवाने ती आज संपूर्ण उपलब्ध आहे. तिच्या प्रकाशनाची कांही तरी व्यवस्था विदर्भ साहित्य संघ अथवा महाराष्ट्र साहित्य परिषद् यासारख्या साहित्यसंस्थांच्या कडून व्हायला पाहिजे एवढें येथे सुचवून हा लेख संपवितों.

---



अनुक्रमणिका



१७ व्या पुण्यतिथी निमित्ताने

# प्रणयपंढरीचे वारकरी माधव ज्युलियन

ल. ग. निमकर

कै. केशवसुत यांची पुण्यतिथि महाराष्ट्रांत कांही ठिकाणीं ७ नोव्हेंबर रोजीं साजरी होते. आधुनिक कविपंचकांतील पहिले केशवसुत व शेवटचे गोविंदाग्रज होत. या पंचकांतले गोविंदाग्रज १९१९ सालीं दिवंगत झाल्यावर एक पोकळी निर्माण झाल्यासारखें वाटलें. याच सुमारास अग्रभागीं चमकणारे परंतु प्रसिद्धि-विन्मुख असे भास्कररावजी तांबे हे आपलें काव्य लिहितच होते. परंतु त्यांच्या विन्मुख स्वभावामुळें त्यांचा कवितासंग्रह १९२० च्या अगोदर प्रकाशित होऊं शकला नाही. आणि याचमुळें त्यांच्या काव्याचा परिचय रसिकांना रविकिरण मंडळाच्या कवींबरोबरच होऊं लागला.

रविकिरण मंडळांत यशवंत, गिरीश, माधव-ज्युलियन्, ही कविमंडळी तर होतीच पण श्री. वा. रानडे, ग. त्र्यं. माडखोलकर, द. ल. गोखले, दिवाकर वगैरे रसिकहि होते. या मंडळांतील कवि आणि पंडित असा दुहेरी लौकिक पावलेले माधवराव हे एक असा-मान्य प्रतिभेचे कवि होते.

माधवरावांचा एक कवि म्हणूनच ह्या लेखांत ओझरता परिचय करून द्यावयाचा आहे.

कवि ह्या नात्याने त्यांची कविता उच्च दर्जाची होती. त्यांनीं तारुण्याच्या उंबरठ्यांत पाऊल ठेवणाऱ्या तरुणांच्या भावना उत्कटतेने काव्यामधून रसपूर्णतेनें प्रकट केल्यावर तें तरुणांच्या ओठांवर नाचूं लागलें. त्यांच्या काव्यांतील "प्रेम" ह्या शब्दामुळे जुन्या टीकाकारांनी त्यांच्यावर हल्ला चढविला. याच टिका-कारांपैकी कै. वा. अ. भिडे ह्यांनी त्यांना "प्रणय-पंढरीचे वारकरी" ही पदवी बहाल केली. पण ती पदवीच त्यांना दूषण न ठरतां "भूषणावह" ठरली.

सौंदर्याची ओढ ही नुसती शरीरोपभोगासाठी तडफडणारी वासना नाही तर ती एक जीवनांतील शक्ति आहे असें त्यांचें मत होतें. याच विचाराच्या अनुरोधाने ते "विरहतरंगा"च्या प्रस्तावनेंत म्हणतात--

"सौंदर्यदर्शनापासून जीवाला विश्रांति आणि मनाची उन्नति झालीच पाहिजे. उपसर्ग न पोचवितां स्वतःचें जीवन सर्वांगसुंदर करण्याचा प्रत्येकाला जन्म-सिद्ध हक्क आहे. म्हणून सौंदर्याचें अन्वेषण करून तें इतरांस प्रतीत करून देणें हें कवीचें एक कर्तव्य आहे. आणि पुढेहि लिहितात--"प्रेमवाङ्मय हें आबाल-वृद्धांसाठी नाही......प्रेम हें पुण्य आहे की पाप आहे हें हेतूवरूनच ठरवलें पाहिजे. प्रेम हें दौर्बल्य आहे का क्षोभ आहे तें इष्ट आहे की अनिष्ट आहे हें त्यापासून घडणाऱ्या परिणामावरूनच समजणार !"

आपल्या काव्यांमधून त्यांनी प्रेमाचा हेतु आणि परिणाम स्पष्ट केला आहे. प्रेमाची भावना स्वयंभू असावी, त्यांत वासनापूर्ति नसावी, याच हेतूने ते एके ठिकाणीं म्हणतात—

"प्रीतिच्या घनसंपदेंत भरूनी
त्यागात्मता राहिली
स्वार्थाची कुसुमांजलि प्रिय हिला
ती पाहिजे वाहिली
कर्तव्याचरणीं मनास मग्न हो
वा शांति वा काहिली."

कर्तव्यासाठी आपल्या प्रेमाची तमा न बाळगणारा वासू राजे त्यांनी "सुधारकांत" रेखाटला आहे. समाजांतील ढोंगांवर त्यांनी आपल्या "नकुलालंकार" मध्ये कोरडे ओढले आहेत. "महात्मा करिल काय एकला" यांत त्यांनी गांधींच्या शांतिप्रधान तत्त्वाचा पुरस्कार केला आहे. पण एवढेंच सांगून ते राहिले नाहीत तर त्यांनी लगेच लिहून टाकलें—"त्यांस सिंहबळ येई घेई जो शिर तळहातीं."

त्यांचें काव्य हें नुसतें प्रेमकाव्य नव्हतें. त्यांच्या काव्यांत राष्ट्रप्रेम व भाषेचें प्रेम ठायींठायीं ओथंबत होतें. त्यांनी अत्यंत तळमळीने म्हटलें आहे की—

मराठीस अन्याय कोठेहि झाला
स्वदेशीं विदेशीं कुणी गांजिलें
मराठी कसा मी न संताप माझा
घडाडे जरी तीव्र दुःखानलें ?

माधवरावांना "प्रणयपंढरीचे वारकरी" म्हणून हिणवणाऱ्यांना त्यांचें हें काव्य म्हणजे झणझणीत अंजन आहे. त्यांच्या उत्कृष्ट आणि सहज डोळ्यांपुढे येणाऱ्या कविता म्हणजे 'मराठी असे आमुची मायबोली' 'भ्रांत तुम्हां कां पडे' "तेथें चल राणी" "चंदा राणी" "संगमोत्सुक डोह" "फुटकळ अभंग" वगैरे होत.

त्यांचा "छंदोरचना" हा काव्यावरील ग्रंथ प्रमाणभूत मनाला जातो.

मराठी काव्यप्रांतांत माधवरावांचें नांव मोठ्या आदराने घेतलें जातें. त्यांचें काव्य ही महाराष्ट्रशारदेला अनमोल देणगी आहे. जोंपर्यंत मराठी भाषा जिवंत आहे तोंपर्यंत त्यांचें नांव चिरकाल टिकणारें आहे. कवि आणि पंडित असा दुहेरी लौकिक प्राप्त करणारे माधवराव असामान्य बुद्धीचे होते. २९ नोव्हेंबर रोजी साजऱ्या होत असलेल्या त्यांच्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने त्यांना वंदन करून त्यांच्याबद्दल वाटणारें प्रेम येथें व्यक्त करतो; माधवरावांच्या स्मृतीला सादर वंदन !

---

## साभार पोंच

**नाट्य व रंगभूमि**—लेखक प्रा. श्री. ना. बनहट्टी

**काजळी रात्र** (कादंबरी) लेखक—ना. रा. शेंडे

'The Indus Civilization
in the Ṛgveda'
By Shri P. R. Deshmukh

**मराठी महाभारताचें स्वातंत्र्य**
लेखक—डॉ. ना. गो. नांदापूरकर

**चंद्रपूरचा इतिहास**
ले०—अ. ज. राजूरकर

या ग्रंथांचा परामर्श यथावकाश घेऊं.

# विदर्भ साहित्य संघ रंगमंदिर कोनशिलान्यास समारंभ

## संघाध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे यांचें प्रास्ताविक भाषण

विदर्भ साहित्य संघाच्या प्रगतीच्या इतिहासांत आजचा दिवस महत्त्वाचा आणि संस्मरणीय आहे, हें आज आपण ज्या कार्यासाठी येथे जमलो आहोंत, त्यावरून आपल्यालाहि वाटतच आहे. १९२३ च्या मकरसंक्रांतीच्या मुहूर्तावर संघाची स्थापना झाल्यापासून संघाने जीवनांतील भरती-ओहोटीचे अनेक अनुभव घेतले आहेत. १९४९ सालीं संघ सोसायटयांच्या कायद्यान्वयें नोंदविण्यांत आला आणि १९५० मध्ये संघाचें केंद्र कार्यालय अमरावतीहून नागपुरास आणलें गेलें. त्याच वर्षी संघाला इमारतीसाठी म. प्र. सरकारने १.१२ एकर जागा दिली व वि. सा. मंदिराचें बांधकाम तीन टप्प्यांत पूर्ण करण्याचा संकल्प संघाने सोडला. पैकी मंदिराच्या कार्यालयाची इमारत बांधून झाली असून आज रंगमंदिराचें बांधकाम सुरू आहे. त्यासाठी अधिक जागेची जरूरी होती व ती जागा देऊन राज्यसरकारने संघाला आणखी उपकृत केलें. बांधून झालेली इमारत जनतेने केलेल्या आर्थिक साहाय्याने व सरकारने दिलेल्या एक तृतीयांश म्हणजे ३० ह. रु. च्या अनुदानाने उभी झाली असून, पुढील बांधकामासाठींहि संघाला आपआपल्या ऐपतीप्रमाणें व इच्छेप्रमाणे जनतेकडून साहाय्य लाभेल, असा आम्हाला विश्वास वाटतो. रंगमंदिर बांधण्याला सरकार ५० टक्के अनुदान देणार असून त्यांनी तशी तरतूद अंदाजपत्रकांत केलीहि आहे. या सर्व मदतीबद्दल संघ राज्यसरकारचा व विशेषतः मुख्य मंत्री पं. रविशंकर शुक्ल यांचा अत्यंत ऋणी आहे.

संघाचें जें कार्य चालू आहे त्यांत परीक्षा समिति, युगवाणी मासिक, सांस्कृतिक समिति गडकरी स्मारक समिति आणि नाटयसमिति यांचा प्रामुख्याने उल्लेख केला पाहिजे. परीक्षा समितीचें कार्य उत्तरोत्तर वृद्धिंगत होत असून आता वर्षाच्या दोनीहि सत्रांत मिळून परीक्षांस बसणारांची संख्या ३ ह. वर गेली आहे. सांस्कृतिक समितीकडून होणारे कार्यक्रम आणि व्याख्यानमाला यांची लोकप्रियता व उपयुक्तता आपल्या सर्वांनी अनुभवलेलीच आहे. गडकरी स्मारक समितीतर्फेहि व्याख्यानें होतात व विशेष म्हणजे तिच्या पुढाकाराने पुस्तक संग्रहालयहि सुरू करण्यांत आलें आहे. नाटय समितीतर्फें नाटय व नाटककार यांच्यावर व्याख्यानें होत असतात व येत्या डिसेंबरमध्ये नाटयमहोत्सवहि होणार आहे. भाषाविषयक संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी शिष्यवृत्ती देण्याची तरतूद संघाने केली असून पुस्तकप्रकाशनहि संघ

मधून मधून करीत असतो. संघाच्या या सर्व कार्याचा खर्च सभासद शुल्क, देणग्या व सरकारी अनुदान यांतून निभतो. सरकारी अनुदानाची रक्कम १ ह. रु. वरून वाढत वाढत वार्षिक ७॥ ह. रु. पर्यंत वाढविण्यांत आली आहे, हें नमूद करावयास हवें.

*　*

## कार्यवाह, मंदिरसमिति, श्री. नाना जोग यांचें निवेदन

सन्माननीय पाहुणे आणि उपस्थित सभ्यहो !

वि. सा. संघाच्या इमारती संबंधीची माहिती नागपुरांतील जनतेला मी अनेकदा दिली आहे. आजच्या आपल्या पाहुण्यांनी आपल्या संकल्पित रंगमंदिराच्या कोनशिलेची स्थापना करावी ही इच्छा मी त्यांचेजवळ व्यक्त केली, त्यावेळीं या रंगमंदिराची रूपरेषा कागदावर मांडली होती. त्या वेळीं केंद्रीय अंदाजपत्रकाचें लोकसभेचें अधिवेशन चालू होतें. एकाहि दिवसाची सवड त्यांना कांही महिने तरी मिळणें शक्य नाही असें त्यांचें तें उत्तर मलाहि पटलें. परंतु लौकरच त्यांनी राजसंन्यास घेऊन सवडच सवड काढली आहे हें पाहातांच एकाहि दिवसाचा विलंब न लावतां मी त्यांना पुन्हा लिहिलें. माझ्या विनंतीला मान देऊन ते तयार झाले, आणि पूर्वीच ठरल्याप्रमाणे, महाराष्ट्रांतील एक महत्त्वाचें सांस्कृतिक ठिकाण म्हणून जें उद्या नांवारूपास येऊं शकेल अशा रंगमंदिराला आज त्यांचे खऱ्या अर्थाने सुसंस्कृत हात लागले आहेत. या घटनेबद्दल आपणा सर्वांप्रमाणेच मला आनंद होत आहे आणि त्यांचा आभारी झालों आहें.

२. या रंगमंदिराची बाह्य वास्तुरचना बाजूला लावलेल्या चित्रांवरून आपल्या ध्यानांत येईल. अंतर्व्यवस्थेची माहिती मी आज प्रथमच आपणा सर्वांना थोडक्यांत देणार आहे.

३. आजचें हें व्यासपीठ ज्या ठिकाणीं आहे तिथेंच उद्या स्टेज किंवा रंगपीठ राहणार आहे. या व्यासपीठाखाली, तळघरांत, ग्रीनरूम किंवा रंगपट रहाणार आहे. पडदे, देखावे, गुंडाळावे न लागतां जसेच्या तसे वर जातील किंवा खाली येतील अशी उंच मंडपी वर राहणार आहे. एका देखाव्याची चौकट, जरूर पडल्यास, पांच सेकंदांच्या आंत बाजूला सरकून दुसरी चौकट त्या ठिकाणीं येऊन उभी होईल असा शकट या रंगपीठावर राहणार आहे. भरत मुनीने घोडे, उंट, कुत्रे अशासारखे अमानुष प्राणी रंगभूमीवर आणूं नयेत असा दंडक घालून दिला असला तरी एखाद्या नाटकांतला नायक, नायिका, किंवा त्यांचा शोफर या रंगभूमीवर मोटार घेऊन येऊं शकेल. या संकल्पित रंगपीठाच्या वरच्या बाजूस नाट्य मंडळांची उतरण्या–राहण्याची दोन मोठीं दालनेंहि राहतील.

४. आपण आमच्यासमोर ज्या ठिकाणीं बसलां आहांत तिथे प्रेक्षागृह राहणार आहे. प्रेक्षागृहांत बसलेल्या, उच्चश्रेणीच्या किंवा उंच मस्तक असलेल्या समोरच्या प्रेक्षकाची, मागे बसलेल्या माझ्यासारख्या ठेंगण्या माणसाला अडचण होऊं नये ही दक्षता घेऊन प्रेक्षागृहाची

रचना होणार आहे. वर मागल्या बाजूस दोनशें प्रेक्षक बसतील अशी बाल्कनी किंवा सज्जा रहाणार आहे. त्याखाली उपाहारगृह रहाणार आहे. १ हजारांच्या जवळपास खुर्च्या मावतील एवढें विस्तृत हें प्रेक्षागृह होणार आहें. शुद्धिकरणाचीं साधनें अशा ठिकाणीं ठेवण्यांत येणार आहेत की तिथून परततांना कोणालाहि पुन्हा चिखल तुडवून प्रेक्षागृहांत यावें लागूं नये.

५. या सर्व सोयी आणि त्यांचा विस्तार, नागपूर इंप्रुव्हमेंट ट्रस्टच्या नियमांच्या चौकटींत तो बसविण्याचा मेटाकुटीचा प्रयत्न करून ठरवण्यांत आला आहे. त्या नियमांचीं बंधनें नसतीं तर संकल्पित रंगमंदिर थोडें मोठेहि करतां आलें असतें.

६. विदर्भ साहित्य मंदिराच्या दोन्ही बाजूला भव्य इमारती चुटकीसरशा उभ्या झाल्या परंतु त्यांच्यामधे उभें असलेलें हें आजचें आपलें निकृष्ट दिसणारें मंदिर ज्यांना खवखत नसेल --असे उद्‌गार काढणारे बरेच आहेत--त्यांच्यावरच आपलें हें संकलित रंगमंदिर व दोन्ही मिळून एक उत्कृष्ट इमारत उभी करून दाखवण्याची जबाबदारीहि ओघाने येते.

७. मध्यम श्रेणींतल्या अनेक लोकांकडे जाऊन एकेक रुपयापासून देणगी गोळा करण्याचें कार्य मी जवळ जवळ एक वर्षभर करीत आलों. त्यांत तर मला अपेक्षेबाहेर सहकार्य मिळालें. या अशा लहान लहान रकमांची बेरीजहि पांच हजार रुपयांच्या वर झाली आहे. कोणताहि नियम सिद्ध करण्यासाठी ज्या अपवादांची गरज असते असे एक-दोन अपवाद वगळले—नव्हे ते अपवाद जमेस धरले—तर मला कुठेहि नकार मिळाला नाही. आपण होऊन आपलें लहान-सेंच पण शक्तीपलिकडलें बळ खर्चीं घालणाऱ्या कांही उदार व्यक्तींशीं माझा परिचय झाला. आणि कधीहि कोणालाहि गळ न घालण्याचा नियम पाळत असूनहि मी रोहिल्यासारखा वागतों आहे अशी कल्पनाहि त्यांच्या तुलनेने मला आली अशा साऱ्या अनुभवाच्या भरवशावर हें रंगमंदिर लौकरच उभारलें जावें अशी प्रत्येकाची अपेक्षा व मनीषा राहील असें मी समजतों.

८. या संकल्पित रंगमंदिराचा निम्मा खर्च अनुदान म्हणून देण्याचा, आजच्या मध्य-प्रदेश सरकारकडून, निर्णय झालेला आहे. आणि खर्च होणाऱ्या जवळ जवळ तीन लक्ष रुपयांच्या, दीड लक्षाच्या अर्ध्या वाटयापैकी पन्नास हजार याच चालू महिन्यांत आम्हाला मिळण्याची शक्यता आहे. याचें कारण आम्ही आतापर्यंत केलेलें बांधकाम, आमच्या जवळ असलेला सिमेंट-पोलाद-विटा वगैरे माल, आणि बँकेंत शिल्लक असलेली रकम यांची बेरीज पन्नास हजार रुपये होऊं शकली हें आहे. उद्याच्या द्विभाषी राज्याकडून दुसरीच भाषा ऐकावी लागणार नाही असें आम्ही आज तरी मानतों.

*   *

## श्री. चिंतामणरावजी देशमुख यांच्या भाषणांतील महत्त्वाचे विचार

मराठी नाटयवाङ्मय व रंगभूमि याचा गेल्या शतकांतील इतिहासाचा धावता उल्लेख करून श्री. देशमुख म्हणाले--

अनुक्रमणिका

'नाटक हा सर्वांत जास्त गुंतागुंतीचा वाङ्मयप्रकार असून त्याची उन्नति वा अवनति प्रेक्षकांच्या अभिरुचीवर अवलंबून आहे. म्हणून नाटयवाङ्मय चांगलें व्हावयाचें असेल तर प्रेक्षकाची मूळ अभिरुचीच सुसस्कृत केली पाहिजे. समाजाचा नैतिक स्तर वाढला की नाटय-वाङ्मय आपोआपच चांगलें होईल.' कालिदासाने देखील 'आपरितोषाद् विदुषां न साधु मन्ये प्रयोग विज्ञानम्' असें म्हटलें आहे. अर्थात् त्याने प्रेक्षकांना 'विद्वान' हें विशेषण लावलें हें लक्षांत घेण्यासारखें आहे.

आता नटाची सामाजिक प्रतिष्ठा वाढली आहे. त्यांच्या कलानैपुण्याबद्दल त्यांना शासना-कडून पारितोषकेंहि मिळत आहेत. हौशी नटांनीच आजपर्यंत रंगभूमीच्या प्रगतीला हातभार लावला हें खरें असलें तरी त्यांनीहि सवंग लोकप्रियता किंवा लोकानुरंजन यांच्या मागे न लागतां प्रेक्षकाची अभिरुचि सुसंस्कृत करणें हेंच आपलें कर्तव्य मानलें पाहिजे. नट व प्रेक्षक यांच्या अशा सहकार्यानेच नाटयकला ऊर्जितावस्थेस येईल.

भरत मुनीने नाटयाचे नियम केले पण आज आपण फार पुढे येऊन पोचल्यामुळे ते जसेच्या तसेच आजच्या रंगभूमीला लावतां येणार नाहीत. भरताने उंटाला रंगभूमीवर मज्जाव केला, तेव्हां उंटावरचे शहाणेहि अर्थातच येथे येणार नाहीत हें ठीक आहे. पण आजची मराठी रंगभूमि बव्हंशीं इंग्रजीचा वारसा घेऊन जन्माला आली आहे हें विसरतां येणार नाही.

आपल्या देशांत स्थानिक स्वराज्याचा आणि खऱ्या अर्थाने नाटकाचा उगम एकदमच १८८० मध्ये झाला हेंहि मोठें सूचक आहे.

---

## विदर्भ साहित्य संघाची व्याख्यान माला

विदर्भ साहित्य संघाची सांस्कृतिक कार्यक्रम समिति दरवर्षी एक व्याख्यान-माला सादर करीत असते. यावर्षी समितीने व्याख्यानमालेवरील जनतेचा लोभ पाहून तीन नामवंत साहित्यिकांचीं व्याख्यानें नियोजित केलीं आहेत. या तीन व्याख्यानमालेंतून नोव्हेंबरच्या १०–११ तारखांना **सौ. मालतीबाई बेडेकर**, डिसेंबरच्या १-२-३ तारखांना **प्रा. ना. सी. फडके** आणि जानेवारी १९५७ च्या १९ ते २३ तारखांच्या सुमारास **आचार्य प्र. के. अत्रे** ह्या तीन सुप्रसिद्ध साहित्यिकांचीं व्याख्यानें नागपूरच्या रसिकांना ऐकावयास मिळतील. व्याख्यानांचे विषय, निश्चित तारखा आणि इतर तपशील व्याख्यानांपूर्वीं पुरेशा वेळेआधी वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होईल.

अनुक्रमणिका

# सं घ वा र्ता

(प्रा.) श्री. गो. काशीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ
यांजकडून

## केंद्रवृत्त, नागपूर

### कार्यकारी मंडळाची सभा

विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारी मंडळाची ५वी सभा वि. सा. संघाच्या केंद्रीय कार्यालयांत ३०-९-५६ रोजीं सकाळीं ९-३० वाजतां संघाध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे यांच्या अध्यक्षतेखाली भरली.

गतसभेचा अहवाल वाचून दाखविल्यानंतर सरचिटणीसांनी आपलें षण्मासिक निवेदन सादर केलें व तें किरकोळ प्रश्नोत्तरानंतर सर्वानुमतें मंजूर झालें. यंदाचें वार्षिक संमेलन आमगाव येथे भरणार आहे. ह्याकरितां डिसेंबर ७ व ८ तारखा कितपत सोयीच्या होतील ह्यासंबंधीं प्राथमिक विचार झाला व गोंदिया शाखेशी विचारविनिमय करून निश्चित दिवस ठरवावेत असें ठरलें. यानंतर वि. सा. संघशाखासंबंधीचे उपनियम किरकोळ दुरुस्त्यांसह सर्वानुमतें सम्मत झाले. (सम्मत झालेले नियम याच अंकांत अन्यत्र दिले आहेत.)

वि. सा. संघ कर्मचारी यांचे वेतनवृद्धि व नियम यांसाठी एक उपसमिति नेमण्यांत आली. नंतर आगरकर-टिळक जन्मशताब्दी महोत्सवाचा जमाखर्च सर्वानुमतें सम्मत झाला. त्याचप्रमाणे वि. सा. संघ परीक्षा समितीचें काम एक महिना सरचिटणिसांनी पाहावें व एक महिन्याने दि. २८-१०-५६ ला ह्याच कामासाठी सभा बोलवावी असें ठरलें. नंतर प्रा. माणिक के. बैतुले यांचे आभाराचा पुढील ठराव प्रा. पां. कृ. सावळापूरकर यांनी मांडला. प्रा. श्री. गो. काशीकर यांनी त्यास अनुमोदन दिलें व हा ठराव एकमताने सम्मत करण्यांत आला.

ठराव—"श्री. प्रा. माणिक के. बैतुले यांनी एप्रिल १९५६ ते ऑक्टोबर १९५६ या अवधींत परीक्षा समितीचे संचालक या नात्याने जें भरीव, निरलस व निस्वार्थ कार्य केलें व परीक्षा समितीला जी प्रतिष्ठा मिळवून दिली याबद्दल ही सभा त्यांना धन्यवाद देते व आपली कृतज्ञता व्यक्त करते. नवीन संचालकांच्या कारकीर्दींत देखील प्रा. बैतुले हे वेळोवेळीं सल्लामसलत व सहकार्य देत राहतील, असा विश्वास ही सभा व्यक्त करीत आहे."



अनुक्रमणिका

## मंदिर समिति

विदर्भ साहित्य संघाच्या रंगमंदिराचा कोनशिला समारंभ वि. सा. संघाच्या मागील भागाच्या पटांगणांत दि. १८-१०-५६ रोजीं सकाळीं ७-३० वाजतां केंद्रीय सरकारचे माजी अर्थमंत्री व युनिव्हर्सिटी ग्रँटस् कमिशनचे अध्यक्ष श्री. चिंतामणराव द्वारकानाथ देशमुख यांचे हस्तें झाला. कार्यक्रमाकरितां भव्य शामियाना उभारण्यांत आला होता. संघाध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे यांच्या प्रास्ताविक भाषणानंतर श्री. देशमुख यांचे हस्तें धार्मिक विधिपूर्वक कोनशिलेची प्रतिष्ठापना करण्यांत आली. त्यानंतर श्री. नानासाहेब जोग, मंदिर समिति कार्यवाह, यांचें रंगमंदिराच्या कार्याची कल्पना देणारें भाषण झालें व श्री. देशमुखांचे नाटयगृहाविषयीं आणि नाटयसंस्थांविषयीं अभ्यासपूर्ण भाषण झालें. वि. सा. संघ उपाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी आभार मानल्यावर सौ. कुसुम मोहनी यांनी "वंदेमातरम्" म्हटलें व हा कार्यक्रम संपला. (ह्या कार्यक्रमांतील भाषणें ह्याच अंकांत अन्यत्र दिलीं आहेत.) कार्यक्रमाकरितां शामियाना व संघाचें संपूर्ण प्रांगण नागपुरांतील सुविद्य व साहित्यप्रेमी स्त्री-पुरुष नागरिकांनी फुलून गेलें होतें.

## गडकरी स्मारक समिति

विदर्भ साहित्य संघाच्या गडकरी स्मारक समितीची सभा दि. १९-१०-५६ रोजीं सायंकाळीं गडकरी स्मारकांत भरली. सभेंत श्रीमती बकुळाताई अभ्यंकर, पुणें, यांनी गडकरी स्मारक समितीला जी उदारपणें ५०० रु.ची देणगी दिली त्याबद्दल त्यांचे आभार मानण्यांत आले. ग्रंथालय सुरू करण्याचे दृष्टीने नियम करण्यासाठी श्री. द. रा. गोमकाळे यांना आमंत्रक नेमून एक समिति नेमण्यांत यावी असें ठरलें. तसेंच दि. २३ जानेवारी १९५७ ला कै. गडकरी स्मृतिदिनाचे वेळीं निबंधवाचन करण्यासाठी प्रा. भ. श्री. पंडित यांची नियुक्ति करण्यांत आली.

## सांस्कृतिक कार्यक्रम समिति

विदर्भ साहित्य संघ सां. का. समितीतर्फे आयोजित केलेल्या प्राध्यापकीय व्याख्यानमालेंत अमरावतीचे विद्वान प्राध्यापक व संस्कृतचे पंडित श्री. ग. त्र्यं. देशपांडे यांचीं "संस्कृत साहित्यशास्त्रांतील सौंदर्यविचार" या विषयावर दिनांक २९-३० सप्टेंबर व १-२ ऑक्टोबर असे चार दिवस सतत सायंकाळीं ठीक ५॥ वाजतां गडकरी स्मारकगृहांत भाषणें झालीं.

दि. २१-१० रोजीं सायंकाळीं ६-१५ वाजतां वि. सा. संघाच्या गडकरी स्मारक गृहांत 'महाराष्ट्रदर्शन' व्याख्यानमालेचें उद्घाटन साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास यांच्या भाषणाने झालें. त्या प्रसंगीं या व्याख्यानमालेंतील पहिलें व्याख्यान म्हणून साहित्याचार्यांनी "महाराष्ट्राची संस्कृति" या विषयावर भाषण केलें.

या व्याख्यानमालेंतीतील दुसरें व्याख्यान प्रा. म. अ. चान्सरकर यांनी 'महाराष्ट्राची अर्थव्यवस्था' ह्या विषयाने दि. २३-१० ला गुंफलें,

अनुक्रमणिका

दि. २६–१० ला पुण्याच्या सौ. शांताबाई गोखले यांचें 'संतांचें महाराष्ट्राला वरदान' ह्या विषयावर व्याख्यान झालें. महाराष्ट्राचा सर्वांगीण परिचय करून देणारी ही व्याख्यानमाला अत्यंत समयोचित व उद्‌बोधक झाली.

## प्रचारकार्य

या महिन्यांत श्री. य. गो. मालोदे, चिटणीस, वि. सा. संघ, यांनी यवतमाळ व पुसद या ठिकाणीं शाखा स्थापन करण्याचे दृष्टीने दौरा केला. यवतमाळ येथे श्री. शरच्चंद्र टोंगो, श्री. राम शेजवलकर, श्री. दामले वकील, श्री. देशमुख वकील, श्री. महाजन वकील इत्यादि साहित्यिक तथा विद्वान लोकांशीं विदर्भ साहित्य संघाची यवतमाळ येथे शाखा स्थापण्यासंबंधी विचार-विनिमय केला. लवकरच यवतमाळ येथे शाखा निघेल असा विश्वास वाटतो.

पुसद येथेहि श्री. जकाते वकील, श्री. सरनाईक, श्री. केसकर, श्री. अत्रे आदि प्रमुख व्यक्तींच्या भेटी घेऊन शाखा स्थापन करण्यासंबंधीं विनंती केली. त्याप्रमाणे पुसद येथे २९ सभासद झाले असून तेथे शाखा स्थापन करण्यासंबंधीचें पत्रहि श्री. केसकर यांचेकडून आलें आहे.

*     *

## शाखावृत्त–खामगांव

येथील जीवन विकास मंडळाच्या वतीने कोल्हटकर स्मारकाच्या मदतीकरितां वि. सा. संघाच्या खामगांव शाखेचे कार्यवाह प्रा. पद्‌माकर डावरे यांनी लिहिलेल्या "मृत्युंजय" या नाटकाचा यशस्वी प्रयोग झाला. प्रयोगाचे खर्च वजा जातां राहिलेले ३४१ रु. कोल्हटकर स्मारकास देण्यांत आले.

*     *

## गोंदिया

येथील लोकप्रिय उद्योगपति व संघशाखेचे उपकारकर्ते श्री. मनोहरभाई पटेल हे नुकत्याच गोंदिया येथील नगरपालिकेच्या झालेल्या निवडणुकींत बहुमताने नगराध्यक्ष म्हणून निवडून आले. त्याप्रीत्यर्थ त्यांचा व निवडून आलेल्या त्यांच्या इतर सहकाऱ्यांचा स्वागत समारंभ रविवार दि. ३०–९–५६ रोजीं येथील शाखेतर्फे सायंकाळीं ६ वाजतां सरस्वति महिला विद्यालयाचे इमारतीमध्ये संघ शाखाध्यक्ष श्री. छोटुसाभाई यांचे अध्यक्षतेखाली करण्यांत आला. प्रथम श्री. पातुरकर यांनी स्वागतपर सुंदर ओवीबद्ध गीत म्हटलें. शाखेतर्फे श्री. तेलंग वकील यांनी स्वागतपर भाषण करून सर्वांचें अभिनंदन केलें. नंतर सर्व सभासदांना व नगराध्यक्षांना हारतुरे सन्मानार्थ अर्पण करण्यांत आले. श्री. मनोहरभाई यांनी आपल्या भाषणांत हिंदीबरोबरच मराठी भाषा व साहित्य यांचे अभिवृद्धीकरिता त्यांची सदैव मदत राहील असें आश्वासन दिलें. श्री. छोटुसाभाई यांनी

समारोपाचें भाषण केलें. श्री. देशमुख वकील यांनी शाखेतर्फे सर्वांचे आभार मानल्यावर हा समारंभ पार पडला.

यंदाचें वि. सा. संघाचें अधिवेशन आमगांव येथे बहुधा दि. ७ व ८ डिसेंबरच्या सुमारास भरविण्याचा विचार चालू आहे व त्या दृष्टीने प्रयत्न चालू आहे.

* *

## गोंडवन शाखा

### लोकनायक बापूजी अणे यांची गोंडवन शाखेला भेट

दि. ७-१०-५६ रोजीं सायंकाळीं ५-३० वा. पू. लो. ना. बापूजी अणे यांनी वि. सा. संघ, गोंडवन शाखा चांदा, या संस्थेस भेट दिली. श्री. अ. ज. राजूरकर कृत "चंद्रपूरचा इतिहास" व श्री. भगवती प्रसाद मिश्र कृत "बुद्ध और गांधी" या दोन पुस्तकांचें प्रकाशन त्यांचेंच हस्तें करण्यांत आलें. त्यानिमित्त त्यांनी कळकळीचें उपदेशपर भाषण केलें.

श्री. अ. ज. राजूरकर हे चांद्याचे नवोदित साहित्यिक व संशोधक आहेत. त्यांनी लिहिलेल्या ४०० पानांच्या प्रस्तुत "चंद्रपूरचा इतिहास" या ग्रंथांत अगदी प्राचीन काळापासून तों थेट वर्तमानकाळापर्यंत चंद्रपूरचा सुसंबद्ध इतिहास देण्यांत आला आहे.

पं. भगवती प्रसादजी मिश्र हेहि चांद्याचेच साहित्यिक आहेत. "योग्य वेळीं योग्य पुस्तक प्रसिद्ध होत आहे" अशा शब्दांत त्यांच्या 'बुद्ध और गांधी' या ग्रंथाचा लो. ना. अणे यांनी उल्लेख केला.

वैदर्भीय साहित्यांत बहुमोल भर घातल्याबद्दल उभय लेखक धन्यवादास पात्र आहेत.

* *

## विदर्भ साहित्य संघाचे नवीन आजीव सभासद

१ श्री. कालिदास मोरेश्वर पारधी, नागपूर १


२ श्री. के. बाळमुकुन्द, नागपूर १

## विदर्भ साहित्य संघाला देणग्या

१ श्रीमती बकुळाताई अभ्यंकर, पुणें, ५०० रु.

२. श्री. बाळासाहेब आठवले, १० रु.

# विदर्भ साहित्य संघ, गोण्डवन शाखा, चांदा



लोकनायक बापूजी अणे यांनी शाखेला दिलेल्या भेटीच्या वेळीं शाखेच्या कार्यकर्त्यांसह घेतलेलें छायाचित्र

अनुक्रमणिका

# विदर्भ साहित्य संघाच्या शाखांसंबंधीं उपनियम

## (घटना नियम १९ ऐ अन्वयें)

### [अ] शाखारचना

(१) ज्या गावीं विदर्भ साहित्य संघाचे कमींत कमी २५ सभासद आहेत तेथील कमींत कमी १५ सदस्यांनी विनंती केल्यास केंद्रीय कार्यकारी मंडळ त्या गावीं शाखा निर्माण करील.

(२) शाखेच्या क्षेत्रांत राहणारे विदर्भ साहित्य संघाचे सर्व सभासद मिळून त्या शाखेची साधारण सभा होईल. घटनेंतील केंद्रीय साधारण सभेबद्दलच्या कलम १० प्रमाणे यथाशक्य ह्या साधारण सभेचेंहि कार्य चालेल. मात्र शाखा साधारण सभेकरितां कमींतकमी १५ सदस्यांची गणसंख्या राहील.

(३) प्रत्येक शाखेचें कार्यकारी मंडळ राहील. त्यांत १ अध्यक्ष, निवडलेले ४ सभासद, शाखेच्या अध्यक्षाने नेमलेला १ सभासद व केंद्रीय अध्यक्षाने नेमलेला १ सभासद, असे एकूण ७ सभासद राहतील. शाखेची सभासदसंख्या कमींत कमी ५० झाल्यास त्या शाखेच्या कार्यकारी मंडळांतील निवडलेल्या सभासदांची संख्या ८ व एकूण सभासद संख्या ११ राहील.

(४) शाखा कार्यकारी मंडळाचा कार्यकाल १ वर्षाचा राहील.

(५) १५ दिवसांची पूर्वसूचना देऊन घेण्यांत येणाऱ्या शाखा साधारण सभेच्या बैठकींत अध्यक्ष व निवडावयाचे सभासद यांची बहुमताने निवड होईल. उमेदवारांचीं नांवें बैठकीपूर्वी ४ दिवस अगोदर शाखेच्या कार्यालयांत पोचलीं पाहिजेत. निवडणुकीकरितां एखाद्या सभासदाने मागणी केल्यास गुप्तमतदान घेण्यांत येईल. संघाचे सभासद होऊन ज्यांना कमींत कमी १ वर्ष झालें आहे व ज्यांचेकडे कोणतीहि वर्गणी थकित नाही अशांनाच उमेदवार म्हणून निवडणुकींत भाग घेतां येईल. तसेंच संघाचे सभासद होऊन ज्यांना कमींतकमी ३ महिने झाले आहेत व ज्यांचेकडे कोणतीहि वर्गणी थकित नाही अशांनाच मतदार म्हणून निवडणुकींत भाग घेतां येईल.

(६) शाखा कार्यकारी मंडळ स्वतःच्या सभासदांमधून १ उपाध्यक्ष, १ कोषाध्यक्ष व एक किंवा दोन चिटणीस असे पदाधिकारी निवडील.

(७) शाखा कार्यकारी मंडळाची सभा कमींत कमी ३ महिन्यांतून एकदा तरी भरेल. सभेला निदान ३ दिवसांची पूर्वसूचना देण्यांत येईल. कार्यकारी मंडळाची सदस्यसंख्या ७ असल्यास गणसंख्या ४ व अधिक असल्यास गणसंख्या ५ राहील.

(८) शाखा कार्यकारी मंडळाने आपल्या कार्याचा अहवाल दर महिन्यास व शाखेचा वार्षिक अहवाल वार्षिक सभेनंतर एक महिन्याचे आंत केंद्रीय कार्यालयाकडे पाठविला पाहिजे.



अनुक्रमणिका

## [ब] आर्थिक

(९) शाखेचा द्रव्यनिधि पुढीलप्रमाणे राहील.

**(अ) चालू निधि**—१. घटना नियम १९ प्रमाणे मिळणारें अंशदान.

२. अंशदानाइतकेंच केंद्रीय कार्यालयाकडून मिळणारें अनुदान.

३. घटना नियम ७ मधील अ ते ऊ वर्गांच्या स्थानिक सभासदांच्या वर्गणीपैकी १/६० रक्कम.

४. शाखा समितीने मिळविलेल्या देणग्या व विशेषनिधि.

५. कायम निधीवरील व्याज.

**(आ) कायम निधि**-१. घटना नियम ७ मधील अ ते ऊ वर्गांच्या स्थानिक सभासदांच्या वर्गणीपैकी १/१० रक्कम.

२. शाखा कार्यकारी मंडळाने ठरविलेली इतर रक्कम.

(१०) शाखा सभेने स्वतः कांही स्थावर मालमत्ता मिळविल्यास ती संघाच्या विश्वस्त मंडळाचे नांवें करून दिली पाहिजे. ह्या मालमत्तेचा कारभार पाहण्याकरितां तीन जणांचें व्यवस्थापक मंडळ राहील. त्यांत केंद्रीय विश्वस्त मंडळाने नियुक्त केलेला १ प्रतिनिधि व स्थानिक शाखेच्या साधारण सभेने बहुमताने नियुक्त केलेला १ सभासद राहील. यांचा कार्यकाल ३ वर्षांचा राहील. त्याशिवाय शाखेचे अध्यक्ष हे पदसिद्ध सदस्य राहतील.

(११) शाखा सभेचें कार्य पाहण्याकरितां व हिशेब तपासण्याकरितां पदाधिकारी पाठविण्याचा केंद्रीय कार्यालयाला अधिकार राहील.

(१२) नागपूरकरितां स्वतंत्र शाखा राहणार नाही.

———

# विदर्भ साहित्य संघाचे उद्देश आणि गरजा

१. विदर्भ साहित्य मंदिराची इमारत पूर्ण करणें व नाटयगृह बांधणें.

२. वि. सा. संघाच्या परीक्षांना व्यापक आणि सर्वोपयोगी स्वरूप देणें.

वि. सा. सं. चें मुखपत्र **युगवाणी** आर्थिक दृष्टीने स्वावलंबी करून उत्तरोत्तर त्याचें स्वरूप सर्वांगीण करणें.

४. वि. सा. सं. च्या वतीने दुर्मिळ ऐतिहासिक, शैक्षणिक व वाङ्मयीन ग्रंथांचें प्रकाशन

५. मराठी भाषेच्या हिताचें प्रातिनिधिक स्वरूपाचें कार्य करणें.

मराठी-प्रेमी जनतेने तनमनधनाने विदर्भ साहित्य संघाला मदत करावी अशी नम्र विनंती आहे.

**'युगवाणी' सदस्यांना विनामूल्य. ✳ सभासदत्वाचें वार्षिक शुल्क फक्त तीन रुपये**

अनुक्रमणिका

# परीक्षा समिति

## महत्त्वाच्या सूचना

(१) आगामी परीक्षा दि. १९ आणि २० जानेवारी १९५७ रोजीं होतील.

(२) सर्व केंद्राधिकाऱ्यांनी परीक्षार्थी आवेदनपत्रें १० डिसेंबर १९५६ पर्यंत 'परीक्षा समिति' कार्यालयाकडे पाठवावींत.

(३) केंद्राधिकाऱ्यांनी परीक्षार्थ्यांकडून ५ डिसेंबरपर्यंत आवेदनपत्रें भरून घ्यावींत.

(४) आवेदनपत्रांची आवश्यक मागणी केंद्राधिकाऱ्यांनी 'परीक्षा समिति' कार्यालयाकडे करून केंद्रसाहित्य त्वरित मागवावें.

(५) नवें केंद्र ज्यांना उघडावयाचें असेल त्यांनी केंद्रविषयासंबंधीची जुजबी माहिती मागवून केंद्र स्थापन करण्याकरितां आवेदनपत्र भरावें. नवीन केंद्र उघडण्याकरितां कमींतकमी १५ परीक्षार्थी परीक्षेस बसविले पाहिजेत.

(६) एम्. ए. समकक्ष 'साहित्य पारंगत' ही परीक्षा केवळ जानेवारींत इतर परीक्षांबरोबरच घेतली जाते. चालू वर्षी परीक्षेला बसूं इच्छिणारांनी १० नोव्हेंबरच्या आंत आपलीं सशुल्क आवेदनपत्रें पाठवावींत. या परीक्षेच्या अभ्यासक्रमपत्रकासाठी ८ आण्याचें पोस्टेज पाठवावें.

(७) 'मराठी प्रवेश' ते 'साहित्य स्नातक' या परीक्षांचे वर्ग दि. ७ नोव्हेंबर ५७ पासून सायंकाळीं ५॥ ते ७॥ विदर्भ साहित्य मंदिरांत सुरू होतील. गरजूंनी याकरिता परीक्षा समितीच्या कार्यालयांत येऊन वर्गविषयक माहितीची पृच्छा करावी आणि या निःशुल्क वर्गव्यवस्थेचा लाभ घ्यावा.

प्रा. श्री. गो. काशीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ, नागपूर १

हें मासिक श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे यांनी वि. सा. संघाकरितां नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर १ येथे मुद्रित करून संघ-कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, सीताबर्डी, नागपूर १ येथे प्रकाशित केलें.